ISSN 0973 - 8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

भारतीय सौर ज्येष्ठ – अश्विन १९३०
• जुलै–सप्टेंबर २००८ / खंड ३२, अंक २




- जागतिक मानव विकास अहवाल २००६ भारतापुढील आव्हाने
- भारतीय राजस्व – अलीकडील प्रवृत्ती
- जागतिकीकरणाने भारतातील उच्च शिक्षणापुढे निर्माण केलेली आव्हाने
- भारताचा सार्वभौम संपत्ती निधी – आवश्यकता की स्वप्न ?
- स्वयंसहाय्यता गट – ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन
- मराठवाड्यातील स्त्री–पुरूष गुणोत्तराची अधोगती
- औद्योगिकरण – पर्यावरणीय समस्या
- किनवट तालुक्यातील आदिवासी उप–योजना

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
लोकचर्चाविचारार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर २००८,/खंड ३२,अंक २

**प्रमुख संपादक**
जगन्नाथ शामराव पाटील

**सहायक संपादक**
संतोषकुमार बबनराव यादव

**सल्लागार मंडळ**
(२००६-०९)
अवधूत नाडकर्णी
अ.ब.देवगिरीकर
किशोर वाघमारे
जयश्री देवदत्त खांबेटे

**संपादकीय पत्रव्यवहार**
जगन्नाथ शामराव पाटील
शांती प्लाझा, बी-९,
८८०/८८१, शनिवार पेठ,
सातारा, ४१५ ००२
मो.९४२३२६१७९६

## । अ नु क्र म णि का ।

* जागतिक मानव विकास अहवाल २००६ भारतापुढील आव्हाने
सर्वोत्तम न. कुलकर्णी . . . . . . . . . . ९३

* भारतीय राजस्व-अलीकडील प्रवृत्ती
जे.एफ.पाटील, संतोष यादव . . . . . . . . . . १००

* जागतिकीकरणाने भारतातील उच्च शिक्षणापुढे निर्माण केलेली आव्हाने आणि संधी
जीवन वि. पवार . . . . . . . . . . ११५

* भारताचा सार्वभौम संपत्ती निधी-आवश्यकता की स्वप्न?
विनायक म. गोविलकर . . . . . . . . . . १२३

* स्वयंसहाय्यता गट-ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन
जे.बी.मोरे, बी.एल.महाजन . . . . . . . . . . १३२

* मराठवाड्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तराची अधोगती
रामकृष्ण एस.सोळुंके,दीपक एम.भारती . . . . . . . . . . १४०

* औद्योगिकरण-पर्यावरणीय समस्या-इचलकरंजी शहरातील औद्योगिकरणाचा सूक्ष्म अभ्यास
सौ.एस.एस.पाटील,एस.बी.पाटील . . . . . . . . . . १५०

* किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजना
मारोती वीरभद्र बेगमपूरे . . . . . . . . . . १६०

* पीएच.डी.प्रबंधाचा सारांश
सौ.तेजस्विनी बी.मुडेकर . . . . . . . . . . १७१

* अर्थ शब्दांची वाट पाहे
जे.एफ.पाटील. . . . . . . . . . . १८०

* ग्रंथपरिक्षण-१ – ऑक्ट्रॉय
मंजुषा मुसमाडे . . . . . . . . . . १८१

* ग्रंथपरिक्षण-२– अर्थशास्त्राच्या असामान्य आकाशगंगेचे [illegible] अर्थशास्त्रज्ञ लेविट
शि.ना.माने . . . . . . . . . . १८४

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ(२००८-०९)

अध्यक्ष
**विनायक भगवानराव भिसे (औरंगाबाद)**

कार्याध्यक्ष
**ज. फा पाटील(कोल्हापूर)**

कार्यवाह-खजिनदार
**अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)**

प्रमुख संपादक अर्थसंवाद
**जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)**

सदस्य
१) हिरालाल चव्हाण(जळगाव)
२) प्रशांत काटोळे (अमरावती)
३) अविनाश निकम (शहादा)
४) कृष्णराव पाटील (नागपूर)
५) सुभाष टकले (हिंगोली)
६) माधव गायकवाड (औरंगाबाद)
७) तानाजी गिते (पुणे)
८) बाळासो पाटील (सांगली)
९) बबनराव खामकर (सिंधुदूर्ग)
१०) अंभोरे एस.एस. (औरंगाबाद)
११) मोहन चौधरी (पुणे)
१२) आत्माराम पोळ (कडेगांव)

अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टीप : म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.)

कार्यालयीन पत्रव्यवहार
**(आजीव सदस्य नोंदणी, वर्गणी, जाहिरात पाठविणे)**
**अनिल बाबुराव सूर्यवंशी**
**कार्यवाह - खजिनदार - मराठी अर्थशास्त्र परिषद,**
**"गोदाई" शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,**
**बार्शी ४१३ ४११. जि.सोलापूर**
**दूरध्वनी (०२१८४) २२४२९४ मो.९०११२३९९०६**

परिषदेचे प्रमुख कार्यालय :
**मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस प्लॉट क्र.६ एफ. ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सहकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, बांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१**

**वर्गणी :**

| | |
|---|---|
| अ) परिषदेचे सदस्य : | |
| आजीव सदस्य (एकरकमी) | : रू. १५०० |
| साधारण सदस्य | : रू.३०० (वार्षिक) |
| आ) संस्था सदस्य | |
| शैक्षणिक संस्था | : रू.२५० (वार्षिक) |
| व्यावसायिक संस्था | : रू.२५० (वार्षिक) |
| इ) अर्थसंवाद वर्गणीदार | |
| ग्रंथालये | : रू.२५० (वार्षिक) |
| ई) वर्षगणना | १ एप्रिल ते ३१ मार्च |

* संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
* कृपया आजीव सदस्य वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.
* अर्थसंवादची वर्गणी डिमांड ड्राफ्टनेच मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने प्रमुख संपादकांकडे पाठवावी.

# जागतिक मानव विकास अहवाल २००६ -
# भारतापुढील आव्हाने

**सर्वोत्तम न. कुलकर्णी**

मानद प्राध्यापक,

विकास अध्ययनातील संशोधन संस्था,

नाशिक - ४२२००६.

## १. प्रास्ताविक :

कोणत्याही विकासाचा केंद्रबिंदू मानव असतो हा विचार आता सर्वमान्य झालेला आहे. भौतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक प्रगतीचा अंतिम लाभार्थी माणूसच असतो. अशा प्रगतीतून माणसाचे कल्याण झाले नाही तर ती प्रगती अर्थशून्य ठरते. आर्थिक विकासाने मानवाचा विकास साधला गेला तरच आर्थिक प्रगती खऱ्या अर्थाने फलदायी झाली असे मानता येईल. एखादा देश आर्थिक दृष्ट्या संपन्न असूनही समाजाच्या तळागाळातील लोक हालाखीचे जीवन जगत असतील तर ती अनेकांच्या दुःखाचे कारण ठरणारी मोजक्या लक्ष्मीपुत्रांची चंगळ होईल. देशाचा आर्थिक विकास झाला ही केवळ भ्रामक कल्पनाच वाटेल. हा विचारच १९५५ पासून काढल्या जाणाऱ्या जागतिक मानव विकास अहवालांमागे आहे.

## २. मानव विकास :

संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमांतर्गत सदस्य राष्ट्रांसाठी १९५५ पासून दरवर्षी मानव विकास अहवाल प्रसिध्द केले जातात. प्रत्येक सदस्य देशाचा विकास निर्देशांक काढून देशांची मानव विकासानुसार क्रमवारी लावणे हे या अहवालाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. मानव विकास अहवाल विशिष्ट निकषांच्या आधारे तयार केला जातो. यातील तीन निकष निरनिराळ्या कसोट्यांच्या आधारे तपासले जातात. हे निकष आहेत-

१. लोकांचे सरासरी (जन्मापासूनचे) आयुर्मान

२. शैक्षणिक पातळी - जी साक्षरता प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील संयुक्त प्रवेश प्रमाणावरून ठरविली जाते, आणि

३. मूलभूत क्रयशक्ती (राहणीमान पातळी),जी स्थूल देशांतर्गत दरडोई वास्तव उत्पादन पातळीच्या निकषावर मोजली जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर दरडोई उत्पन्न पातळीची तुलना शक्य व्हावी म्हणून प्रथम सर्वच देशांचे उत्पन्न अमेरिकन डॉलर मध्ये मोजले जाते. नंतर प्रत्येक देशातील डॉलर उत्पन्नाचे मूल्य काढले जाते. ही अवघड गणिती कसरत करूनच निरनिराळ्या देशांच्या दरडोई वास्तव उत्पन्नाची तुलना शक्य होते.

वरील तिन्ही घटकांना समान भारांक देऊन त्यावरून एकत्रित मानव विकास निर्देशांक काढला जातो.निर्देशांक मूल्यानुसार जगातील १७५UNO सदस्य देश व मोजक्या सदस्येतर देशांचे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. हे वर्गीकरण मानव विकासातील संबंधित देशांच्या लक्ष्यप्राप्तीनुसार केले जाते. ज्या देशांचा मानव विकास निर्देशांक ०.८०० अथवा अधिक असेल ते उच्च मानव विकासाचे देश, ज्यांचा मा.वि.नि. ०.५०० ते ०.७९९, ते मध्यम मानव विकासाचे देश आणि ज्यांचा मा.वि.नि.०.५०० पेक्षा कमी असेल ते अल्प मानव विकासाचे देश असे मानले जाते. ज्यांच्यासाठी प्रतिवर्षी मानव विकास अहवाल प्रकाशित होतो असे देश आजपर्यंत १७७ आहेत.

आतापर्यंत प्रसिध्द झालेल्या मानव विकास अहवालांत १९९५ सालचा मानव विकास अहवाल विशेष गाजला. या अहवालात प्रथमच मानवविकासातील स्त्री पुरूष विषमतेवर प्रखर प्रकाश झोत टाकला. लोकांच्या निवडीचे क्षेत्र विस्तारित करण्याचे मूलभूत उद्दिष्ट मानव विकास अहवालातून वारंवार मांडले गेले आहे. त्यांची तीन आवश्यक अंगे पुढीलप्रमाणे मांडण्यात आली.

१. समाजातील सर्व व्यक्तींना समान संधी

२. पिढी-दर पिढी ही समानता कायम स्वरूपी टिकून रहावी.

३.लोकांचे अशा तऱ्हेने सक्षमीकरण करावे की ते विकास प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील आणि त्याचे लाभार्थी देखील असू शकतील.

स्त्री पुरूषांना समान संधी हा विचार जागतिक स्तरावर तत्त्वत: सर्वांनाच मान्य आहे. व्हीएन्ना येथे १९९३ मध्ये झालेल्या मानवी हक्कावरील जागतिक परिषदेस हजर असणाऱ्या १७१ देशांनी समान संधीचा हा जाहीरनामा स्वीकारला. या जाहीरनाम्याचे विविध पैलू आहेत.

* शिक्षण व आरोग्यासारख्या मुलभूत सामाजिक सेवांच्या उपलब्धीत समानता.

* राजकीय आणि आर्थिक निर्णय प्रक्रियेतील सहभागाची समान संधी

* समान कामासाठी समान मोबदला.

* कायद्याने सर्वांना संरक्षण

* लिंगभेदामुळे स्त्रियांना संधी नाकारली जाऊ नये.स्त्रियांवर अत्याचार केले जाऊ नयेत.

* जीवनाच्या सर्व क्षेत्रात नागरिकांना समान अधिकार असावेत. घरात, घराबाहेर आणि कामाच्या ठिकाणी देखील.

स्त्री पुरूष समानतेचा या परिषदेने उपस्थित केलेला मुद्दा गुलामगिरीतून मुक्ततेइतका अथवा विदेशी राजवटीने मूळ वासियांवर लादलेल्या गुलामगिरी इतकाच महत्त्वाचा आहे. अशा गुलामगिरीतून मुक्तता व्हावी म्हणून जगभरातील महिला संघटित होत आहेत. "मानव विकास लिंगभेद विरहित झाला नाही, तर मानव विकास

झाला असे म्हणणे धाडसाचे ठरेल". म्हणजेच स्त्रिया, विशिष्ट जाती-जमातीचे लोक, तळागाळातील गरीब जनता मानव विकासाच्या संधीपासून वंचित राहिली, विशेषत: आर्थिक आणि राजकीय सत्तेपासून, तर ती संधी वाटपाची अन्याय्य पध्दत मानली जाते.

१९९५ चा मानव विकास अहवाल सप्टेंबर १९९५ मध्ये बीजिंग येथे होणाऱ्या जागतिक महिला परिषदेच्या पार्श्वभूमीवर तयार झाला. ते वर्ष आज 'महिला सक्षमीकरण वर्ष' म्हणून ओळखले जाते. १९९५ च्या अहवालापासून मानवविकासातील लिंगभेदाचे मापन केले जात आहे. निराळ्या शब्दांत, स्त्रियांचा पुरूष -सापेक्ष आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाची मापके विकसित करून असा निष्कर्ष काढला की, "जगातील कोणत्याच समाजातील स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार मिळालेले नाहीत" लिंगाधारित विकास निर्देशांक (GDI) ही मानवविकास निर्देशांकापेक्षा निराळी संकल्पना तीन भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी; प्रा.अमर्त्यसेन, सुधीर आनंद आणि मेघनाद देसाई यांनी विकसित केली. १९९५ मध्ये जगातील १७४ देशांच्या क्रमवारीत भारताचा मानव विकास निर्देशांक १३४ क्रमांकावर होता. आपले शेजारी देश, पाकिस्तान (१२८) आणि मॅनमार (१३२) भारतापेक्षा आघाडीवर होते. बांगलादेश, नेपाळ आणि भूतान हे देश भारतापेक्षा खालच्या क्रमवारीवर होते. त्यावर्षी भारत पाकिस्तानसह आपले इतर शेजारी देश 'अल्प मानव विकासाचे देश' या प्रवर्गात गणले गेले. आर्थिक विकास दरडोई उत्पन्न वाढीच्या दराने मोजला जातो. मात्र दरडोई उत्पन्न अधिक असणारा देश मानवविकासाबाबत ही अग्रेसर असेलच असे नाही. त्यासाठी दरडोई उत्पन्नानुसार देशांची क्रमवारी आणि मानव विकासाच्या निर्देशांकाची क्रमवारी यांची तुलना अतिशय रंजक सिध्द होते. उदा. एखाद्या देशाच्या दरडोई उत्पन्नाची क्रमवारी बरीच वर असूनही त्याचा मानव विकास निर्देशांकातील क्रम खालचा असू शकतो. त्याचा सरळ अर्थ एवढाच होतो की त्या देशाचे सरकार आणि जनता यांनी भौतिक विकासाची जेवढी काळजी घेतली, तेवढी मानवी कल्याणाची घेतलेली नाही. १९९५ मध्ये भारताचा दरडोई उत्पन्नानुसार १४५ वा क्रमांक असतांना मानव विकास निर्देशांक त्यापेक्षा ९ अंकानी वरचा अथवा १३४ होता.

१९९५ ते २००३ दरम्यान पाकिस्तान व श्रीलंकेचा अपवाद वगळता बहुतेक अशियाई देशांचा मानव विकास क्रम चढता होता.मात्र त्यातल्या त्यात भारत आणि चीनचे क्रम अतिवेगाने सुधारले. त्या खालोखाल नेपाळ आणि बांगला देशात सुधारणा दिसून आली. मॅनमारमध्ये मानव विकास जवळ जवळ स्थितिशील होता. याच काळात पाकिस्तानचा मानव विकास निर्देशांक क्रम १२.५ टक्यांनी व श्रीलंकेचा २.१ टक्यांनी घटला.

२००३ ते २००६ या अलीकडील काळात मानव विकासातील सर्वाधिक सुधारणा चीनमध्ये (२८.४%) व सर्वात कमी भारत व मॅनमार मध्ये (०.८%) घडून आली. चीन पाठोपाठ पाकिस्तान (७.५%) व श्रीलंका (६.५%) या देशांत मानव विकास सुधारला. बांगलादेश आणि नेपाळ मध्ये नगण्य सुधारणा झाल्या. एवढे असूनही मानव विकासातील आंतरकालीन तुलना सर्वसाधारण सुधारणाच दाखवते. सर्वच देशांच्या मानव विकास सुविधांमध्ये शुध्द संख्येच्या स्वरूपात वाढच झाली आहे. तुलनेने कमी अधिक इतकेच.

**३. लिंगाधारित विकास निर्देशांक** (Gender related development Index-GDI) :

जेव्हा एकूण मानव विकासातील स्त्री-पुरूषांचा सापेक्ष वाटा आपण बघतो, तेव्हा स्त्री-पुरूषांदरम्यानची विषमतेची दरी अधोरेखित होते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जगभरात स्त्रियांना पुरूषांच्या तुलनेत विकासाच्या संधी कमीच मिळाल्या आहेत, या स्थितीचा आढावा घेण्यासाठी लिंगाधारित विकास निर्देशांक विकसित केला आहे. या निर्देशांकाने असे दाखवून दिले आहे की उच्च दरडोई उत्पन्न असलेले देश स्त्री-पुरूष समानतेबाबत मात्र तितके जागृत नाहीत. जगातील सर्वाधिक श्रीमंत देश मानव विकासाबाबत ८ व्या क्रमांकावर आणि लिंगाधारित विकासाबाबत ५ व्या क्रमांकावर आहे. याउलट स्वीडन हा देश अमेरिकेच्या तुलनेत कमी श्रीमंत असूनही लिंगाधारित विकास निर्देशांकाबाबत तो पहिल्या क्रमांकावर आहे. विकसित आणि विकसनशील या दोन्ही प्रकारच्या देशांत अशी उदाहरणे आढळतात (फिनलँड, नॉर्वे, डेन्मार्क, हाँगकाँग, सिंगापूर,उरूग्वे इ.). या सर्व देशांची लिंगाधारित विकास श्रेणी मानव विकासश्रेणीपेक्षा श्रेष्ठ आहे. मात्र एक निर्विवाद सत्य असेही आहे की अलीकडे प्रत्येक देश महिलांची क्षमता वाढविण्याचा अथक प्रयास करीत आहे. त्याचे दृष्य परिणाम पुढीलप्रमाणे दृष्टोत्पत्तीस आले आहेत.

* १९७५ ते १९९५ या दोन शतकांत स्त्रियांचे सरासरी आयुर्मान पुरूषांच्या तुलनेत २०% नी जलद वाढले आहे. याच काळात स्त्रियांची जननक्षमता, जी स्त्रियांच्या उपक्रमशीलतेवर बंधने आणते, प्रती माता ४.७ बालकांवरून ३ बालके इतकी घटली.

* विकसनशील देशांतील ५० टक्क्यांपेक्षा अधिक विवाहित स्त्रिया अथवा त्यांचे जोडीदार १९९० मध्ये गर्भप्रतिबंधक साधने वापरत होते. १९८० मध्ये हे प्रमाण जेमतेम २५ टक्के होते.

* १९७० ते १९९० या काळात विकसनशील देशांतील स्त्री-पुरूषांदरम्यानची साक्षरता प्रमाणातील तफावत निम्याने कमी झाली. स्त्रियांचे साक्षरता प्रमाण ५४ टक्क्यांवरून ७४ टक्क्यांपर्यंत वाढले. आतापर्यंत शिक्षणात मागासलेली गणली जाणारी अरब राष्ट्रे अलीकडे शिक्षणात आगेकूच करीत आहेत. विशेषत: स्त्री शिक्षणाबाबत या राष्ट्रातील स्त्रियांचे साक्षरता प्रमाण १९७० ते १९९० या वीस वर्षात दुप्पट झाले.

* सर्व स्तरातील स्त्रियांचे शैक्षणिक प्रवेश प्रतिवर्षी १.७% दराने तर पुरूषांचे १.२% दराने वाढले. मुलींचे प्राथमिक व माध्यमिक शालेय प्रवेश (एकत्रित) १९७० मध्ये ३८ टक्के होते. ते १९९२ मध्ये ६८ टक्के इतपत झाले.

१९७०-९० या काळात विकसनशील देशांत उच्च शैक्षणिक प्रवेशातील स्त्रियांची नोंदणी ५० टक्क्यांपेक्षा कमी वरून ७० टक्क्यांपर्यंत वाढली. जगातील ३२ विकसनशील देशांत ही प्रवृत्ती आढळली.

शिक्षण आणि आरोग्य सेवांची दारे महिलांसाठी बऱ्यापैकी खुली झाली. मात्र आर्थिक व राजकीय सहभागात स्त्रियांसाठी दारे किलकिलतीच उघडली. याची काही बोलकी आकडेवारी १९९५ च्या मानव विकास अहवालात अशी आहे.

* जगातील दरिद्री लोकांत ७० टक्के स्त्रिया आहेत.

* १९७०-९० या दोन शतकांत स्त्रियांचा श्रम-सहभाग २६ टक्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत म्हणजे जेमतेम ४ टक्क्यांपर्यंत वाढला.

* बँका व वित्तसंस्था स्त्रियांना कमी कर्जे देतात.लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन देशातील

स्त्रियांचा बँक कर्जातील वाटा ७ ते ११ टक्के इतपतच होता.

* बिगर कृषी व्यवसायात स्त्रियांना पुरूषांच्या जेमतेम २/३ वेतन दर मिळतो. हे सुमारे ५५ देशांच्या आकडेवारीवरून सिध्द झाले आहे.

* जगातील जवळजवळ सर्वच प्रांतात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये बेकारीचे प्रमाण अधिक आहे.

* व्यवस्थापकीय आणि प्रशासकीय जबाबदारीच्या पदांमध्ये स्त्रियांचा वाटा १/७ पेक्षाही कमी आहे.

* लोकसभेतील खासदारकीची पदे भूषविणाऱ्या व कॅबिनेट दर्जाची मंत्रीपदे भूषविणाऱ्या स्त्रिया अत्यल्प आहेत. एकूण पदांपैकी अनुक्रमे १०% आणि ६ % एवढीच पदे स्त्रियांच्या वाट्याला आली होती.

१९९० पर्यंतची ही परिस्थिती नंतर संथ गतीने सुधारत असली तरी स्त्री-पुरुष संधी वाटपातील ही विषमता आजही टिकून आहे.

लिंगाधारित विकास निर्देशांकात भारताचा क्रम १९९५ मध्ये १३० देशांत ९९ होता. २००३ मध्ये तो १०३ क्रमांकावर घसरला. परंतु पुन्हा २००६ मध्ये तो ९६ पर्यंत वर चढला. आज दक्षिण आशियाई देशांपेकी बांगलादेश, पाकिस्तान आणि नेपाळ भारतापेक्षा खालच्या क्रमांकावर आहेत. श्रीलंका आणि चीन भारताच्या तुलनेत बऱ्याच क्रमांकांनी वर आहेत.

लिंगाधारित विकास निर्देशांकाचे तीन घटक आहेत. जन्मापासूनचे स्त्री-पुरूष सापेक्ष सरासरी आयुर्मान, सापेक्ष साक्षरता प्रमाण आणि सापेक्ष अर्जित उत्पन्न. या तिन्ही घटकांना समान भारांक देऊन त्यांच्या आधारे एकत्रित लिंगाधारित विकास निर्देशांक काढला जातो. २००६ च्या मानव विकास अहवालात नॉर्वे हा सर्वोच्च लिंगाधारित विकासाचा देश ठरला आहे. या देशांच्या लिंविनि चे मूल्य ०.९६२ आहे.अर्थात हा एक उच्च मानव विकास गटातील (६३पैकी) एक देश आहे. या उलट नायगर हा अल्प मानव विकास गटातील सर्वात शेवटचा (१७७ वा) देश असून त्याच्या लिंविनिचे मूल्य ०.२९२ आहे.

दक्षिण आशियातील आपण आणि आपली सर्व शेजारी राष्ट्रे मध्यम मानव विकास गटातील आहोत. यात स्त्री-पुरूष साक्षरतेबाबत मॅनमार, श्रीलंका आणि चीन आघाडीवर आहेत. पाकिस्तान सुमारे १० टक्क्यांनी भारतामागे आहे. नेपाळमधील साक्षरता प्रमाण भारतापेक्षा कमी तर बांगलादेशाच्या साक्षरतेची आकडेवारीच नाही.

सरासरी स्त्री-पुरूष सापेक्ष आयुर्मानात सर्वच देशांत स्त्रियांचे सरासरी आयुर्मान पुरूषांपेक्षा अधिक आहे. मात्र दक्षिण आशियात श्रीलंकेतील स्त्री-पुरूष सर्वाधिक दीर्घायुषी आहेत. त्या पाठोपाठ चीन आणि भारताचा क्रम लागतो. पाकिस्तान भारताच्या तुलनेत बऱ्याच खालच्या क्रमांकावर आहे. बांगलादेशातील स्त्री-पुरूष साक्षरता प्रमाणाची आकडेवारी २००६ वर्षासाठी उपलब्ध झाली नाही. मात्र २००३ मध्ये तेथील स्त्रियांचे साक्षरता प्रमाण पुरूषांपेक्षा आणि पाकिस्तानातील स्त्रियांपेक्षा अधिक होते.

अर्जित उत्पन्नातील स्त्री-पुरूषांमधील विषमता ही एक जागतिक समस्या आहेच. जगातील पहिल्या क्रमांकाचा देश नॉर्वे असो की शेवटच्या क्रमांकाचा नायगर अर्जित उत्पन्नात तफावत आहेच. नॉर्वेत स्त्रियांचे उत्पन्न पुरूषांच्या ७५% आणि नायगर मध्ये ५७% आहे. आशियाई देशातील स्त्रियांचे पुरूष-सापेक्ष अर्जित उत्पन्न पुढील प्रमाणे.

**पत्रक १**

**स्त्रियांचे पुरूष सापेक्ष उत्पन्न**

| | | |
|---|---|---|
| १. | चीन | ६४.१% |
| २. | श्रीलंका | ४१.६% |
| ३. | मॅनमार | उ.ना |
| ४. | भारत | ३१% |
| ५. | पाकिस्तान | २८.७% |
| ६. | बांगलादेश | ४६.०% |
| ७. | नेपाळ | ४९.९% |

या सात देशांच्या गटात मॅनमारच्या अर्जित उत्पन्नाची आकडेवारी उपलब्ध नाही. चीन मधील स्त्रियांचे पुरूषांपेक्षा उत्पन्न ६४.१% नेपाळ मध्ये सुमारे ५० %, बांगलादेश ४६ % आणि श्रीलंका ४१.६% होते. स्त्रियांचा एवढाही आर्थिक सहभाग भारत आणि पाकिस्तानात नसणे ही परिस्थिती निश्चितच समाधानकारक नाही.

आर्थिक उपक्रमातील स्त्री–पुरूष सहभागाचे आणखी एक विशेष म्हणजे अल्प उत्पादन आणि कमी प्राप्तीच्या उपक्रमात पुरूषांपेक्षा स्त्रिया अधिक असतात. याउलट कमी कष्टाच्या व भरपूर प्राप्ती असलेल्या व्यवसायात स्त्रियांपेक्षा पुरूष अधिक असतात. १०० % साक्षरता आणि उदंड शैक्षणिक प्रगती साधलेल्या विकसित देशांत देखील याला अपवाद सापडत नाही. स्त्री–पुरूषांच्या आर्थिक उपक्रमातील सहभागाची २००३ व २००६ या वर्षाची अर्जित उत्पन्नाची माहितीच चीन आणि भारताने पाठविली नाही. मात्र २००३ ची सांख्यिकी माहिती उपलब्ध आहे. ती असे दर्शविते की चीनमध्ये स्त्रियांचे अर्जित उत्पन्न पुरूषांच्या तुलनेत ६५.७ % आणि भारतात ३७.६% होते. या दोन्ही देशांतील स्त्रियांचा आर्थिक कार्य सहभाग २००६ पर्यंत किंचित घटलाच आहे.

यावरून असे स्पष्ट होते की १९९५ नंतर जरी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला असला तरी अद्याप अनेक क्षेत्रात स्त्रियांना त्यांचा न्याय्य वाटा मिळालेला नाही. केवळ विषमतेची दरी काही प्रमाणात कमी झाली.

### ४. महिला सक्षमीकरण मापक (Gender Empowerment Measure) :

जगातील महिलांचे सक्षमीकरण पुढील तीन निकषांच्या आधारे मोजले जाते. १) लोकसभेत स्त्रियांनी भूषविलेल्या पदांची टक्केवारी २) महिला आमदार, वरिष्ठ अधिकारी व तंत्रज्ञ यांची टक्केवारी आणि ३) पुरूषांच्या अर्जित उत्पन्नाशी स्त्रियांच्या अर्जित उत्पन्नाची टक्केवारी. या तिन्हींना समान भारांक देऊन त्याचे सरासरी मूल्य काढले जाते. आर्थिक व राजकीय सत्तेत स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने सहभाग मिळाला तर महिला सक्षमीकरण मापकाचे मूल्य १ येते. पण अशी समानता १९९५ मध्ये नव्हतीच, आजही नाहीच.

१९९५ मध्ये या मापकात स्वीडन पहिल्या क्रमांकावर होता (०.७५७). पण २००३ व २००६ मध्ये नॉर्वे पहिल्या क्रमांकावर आला. स्वीडनचा क्रम घसरला. दक्षिण आशियाई राष्ट्रात १९९५ मध्ये चीन २३ व्या क्रमांकावर आणि नेपाळ व भारत अनुक्रमे ७३ आणि १०१ व्या क्रमांकावर होते. यावर्षी बांगलादेश भारतापेक्षा २१ क्रमांकानी तर श्रीलंका २२ क्रमांकांनी भारताच्या वर होते. पाकिस्तान भारतापेक्षा १३ क्रमांकाने खाली होता. २००३ मध्ये भारत, मॅनमार, नेपाळ आणि चीनने महिला सक्षमीकरणाची माहिती पाठवली नाही व पुढे २००६ मध्ये पण पाठवली नाही. यावेळी पाकिस्तानने मोठी झेप घेऊन एकदम ५८ व्या क्रमांकावर आघाडी घेतली. बांगला देश ६९ व्या क्रमांकावर आणि श्रीलंका ६७ व्या क्रमांकावर आले. यापैकी पाकिस्तानची २००६ पर्यंत मोठी आणि

श्रीलंकेची २ क्रमांकांनी घसरण झाली (६७ वरूण ६९) आणि बांगलादेश दोन क्रमांकांनी वर चढला (६९ वरून ६७) यावरून एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट होते. आर्थिक विकासाबाबत जरी भारत पाकिस्तान आणि बांगलादेशापेक्षा सरस असला तरी मानव विकासाबाबत, विशेषत: मानव विकासातील लिंग-भेद कमी करण्याबाबत पुरेसा जागृत नाही. या दिशेने बांगलादेश सरकार मात्र जाणीवपूर्वक कठोर परिश्रम घेत असल्याचे स्पष्ट होते. स्त्री सक्षमीकरणाच्या निरनिराळ्या निकषांबाबत दक्षिण आशियात काय परिस्थिती आहे तिचा थोडक्यात मागोवा घेऊ.

१९९५ मध्ये भारतात लोकसभेची जेमतेम ७.५ % पदे स्त्रियांच्या वाट्याला आली होती. विधायक, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि व्यवस्थापक वर्गात जेमतेम २.३ टक्के महिला आणि व्यावसायिक व तंत्रज्ञ वर्गात २०.५ टक्के स्त्रिया होत्या. पाकिस्तानी स्त्रियांची अवस्था या पेक्षा केविलवाणी होती. परंतु बांगलादेश महिला सक्षमीकरणात आरंभापासूनच भारताच्या पुढे आहे. बांगलादेशी स्त्रियांनी मात्र १०.५% लोकसभेतील पदे, ५% प्रशासक व व्यवस्थापकीय पदे आणि २३% व्यावसायिक व तंत्रज्ञांच्या जागा भरल्या. भारतात गेली अनेक वर्षे लोकप्रतिनिधित्वाच्या ३०% जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्याचे विधेयक राजकीय पक्षांच्या गदारोळात सातत्याने डावलले जात आहे.

स्त्रियांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व २००३ मध्ये ९.३ टक्के व शेवटी २००६ मध्ये ९.२ टक्के इतपत नाममात्र बदलले. १९९५ मध्ये अर्जित उत्पन्नातील स्त्रियांचा वाटा भारतात १९.२ टक्के असताना बांगलादेशात मात्र २२.८ टक्के होता. २००६ मध्येही अशीच परिस्थिती होती. भारतीय स्त्रीचा उत्पन्नातील वाटा ३१ टक्के, पण बांगलादेशी स्त्रीचा वाटा मात्र ४६ % होता. बांगलादेशी स्त्री भारतीय स्त्रीपेक्षा अधिक स्वतंत्र असल्याचे यावरून स्पष्ट होते. मानव विकास, लिंगाधारित विकास आणि महिला सक्षमीकरण या तिन्ही निर्देशांकाचे मूल्य सतत वाढते राहावे यासाठी अनेक देश सातत्याने प्रयत्नशील असताना भारताने या अहवालासाठी आवश्यक असलेली माहिती पाठविण्याची टाळाटाळ करावी हे लाजीरवाणे आहे. विकसित देशांची बरोबरी करण्यासाठी पुढे काही दशके उलटावी लागतील हे खरे. परंतु बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ आणि अन्य अशियायी व अन्य प्रदेशातील अनेक विकसनशील देश मानव विकासासाठी ज्या आत्मीयतेने प्रयत्न करतांना दिसतात, तशी आस्था भारतात दिसत नाही. हे जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून मिरवणाऱ्या भारताला भूषणावह खासच नाही.

स्वातंत्र्योत्तर साठ वर्षे टिकून राहिलेले लोकसंख्येतील निरक्षरतेचे प्रचंड प्रमाण, स्त्री शिक्षणाकडे गंभीर दुर्लक्ष, पिण्यासाठी स्वच्छ आणि सुरक्षित पाणी टंचाई, स्त्रियांचा आर्थिक व राजकीय सहभाग वाढवण्याची गरज ही आपल्या भावी मानव विकासापुढील, पर्यायाने भौतिक विकासापुढील आव्हाने आहेत. ती आपण कितपत समर्थपणे पेलू शकतो; यावरच आपल्या विकासाची दिशा आणि गती अवलंबून असेल. हे शक्य झाले, तरच दक्षिण आशियायी देशांचे नेतृत्व आपल्याकडे चालून येईल.

**References :**

1) UNDP Human Development Report 1995 p. 116
2) UNDP Human Development Report 2006 p. 275
3) UNDP Human Development Report 2003

***

# भारतीय राजस्व - अलीकडील प्रवृत्ती

**जे.एफ.पाटील**
कार्याध्यक्ष व भूतपूर्व अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद,
कोल्हापूर. मो.९४२२०४६३८२

**संतोष यादव**
भारती विद्यापीठाचे,
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कोल्हापूर मो.९९२११६०२०८

## १.१ प्रास्ताविक :

या लेखामध्ये भारतीय राजस्वातील अलीकडच्या काही प्रवृत्ती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या सांख्यिकीची एकत्रित मांडणी प्रकर्षाने केली जाईल,याचेच वर्णन राष्ट्रीय राजस्व या शब्दात करता येईल. महसूल, खर्च, तूट आणि संघराज्यीय वित्तासंबंधी माहिती लक्षात घेतली जाईल. लेखातील सर्व सांख्यिकी भारत सरकारच्या २००६-०७ च्या आर्थिक सर्वेक्षणातून (Economic Survey) घेतलेली आहे. काही विशिष्ट ठिकाणी २००७-०८ च्या आर्थिक सर्वेक्षणाचाही आधार घेतलेला आहे.

## १.२ महसूल आणि खर्च :

तक्ता क्र. १ मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या जमा आणि खर्चाबद्दल एकत्रित माहिती दिलेली आहे. आर्थिक सर्वेक्षणाच्या शब्दात याचे वर्णन ''एकत्रित सर्वसाधारण सरकार'' (Consolidated General Government) या शब्दात केले जाते. संबंधित तक्ता काळजीपूर्वक लक्षात घेतल्यास पुढीलप्रमाणे निरीक्षणे करता येतील.

१. नवे आर्थिक धोरण सुरू झाल्यानंतरच्या कालखंडात करमहसूलाचे स्थूल देशी उत्पन्नाशी असणारे प्रमाण १९९०-९१ मध्ये १५.४ टक्के होते. ते २००१-०२ मध्ये १३.८ टक्के झाले. पण नंतर २००६-०७ मध्ये ते वाढून १६.८ टक्के झाले. भारतातील करव्यवस्थेची उर्ध्वहरणशीलता लक्षणीय

प्रमाणात वाढली आहे, हे यातून सूचित होते. आंतरराष्ट्रीय तुलना लक्षात घेता यात आणखी वाढ होण्याची गरज आहे.

२. १९९०-९१ मध्ये भारत सरकारच्या एकूण खर्चाचे स्थूल देशी उत्पन्नाशी असलेले प्रमाण २८.८टक्के होते,ते२००३-०४ मध्ये३०.९टक्के झाले.परंतु२००६-०७मध्ये हे प्रमाण२७.६टक्के झाले.शासनाचाअर्थव्यवस्थेतील सहभाग (हस्तक्षेप) कमी होण्याची प्रवृत्ती यातून व्यक्त होते का ?

३. करेतर महसूलाच्या बाबतीत समाधानकारक बदल दिसतात. एकूण रकमांच्या माध्यमात हे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. यामध्ये मुख्यत: सार्वजनिक, आर्थिक प्रकल्पांच्या नफ्याचा हिस्सा मोठा आहे. करेतर महसूलाचे प्रमाण १९९०-९१ मध्ये स्थूल देशी उत्पन्नाच्या ३.२ टक्के होते, ते २००२-०३ मध्ये ३.९ टक्के झाले, २००५-०६ मध्ये ४ टक्के झाले, तर २००६-०७ मध्ये ३.६ टक्के झाले. १९९० पूर्वीच्या

**तक्ता क्र. १**

**केंद्र आणि राज्य सरकारांची एकत्रित जमा आणि खर्च**

(रु.कोटीत)

| | १९९०-९१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ सुधारित अंदाज | २००६-०७ अंदाजपत्रकीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. एकूण जमा (अ+ब) | १५२,२४५ | ६५१,०३९ | ७२६,४३५ | ८६०,०९० | ९४७,९३० | १०२७,५४७ | ११,३७,२४५ |
| अ. महसूली जमा | १०५,७५७ | ४००,१६२ | ४५२९६९ | ५१८,५४६ | ६१५,६४३ | ७३२,८४८ | ८३५,४६९ |
| i. कर महसूल | ८७५६४ | ३१३८४४ | ३५७३४२ | ४१३९८१ | ४९२४८१ | ५९१६४१ | ६८८१०३ |
| ii. करेतर महसूल पैकी | १८१९३ | ८६८१८ | ९५६९७ | १०४५६५ | १२३१६२ | १४१२०७ | १४७३६६ |
| व्याज उत्पन्न | ५९७५ | १७१६४ | १७७८१ | १८८५६ | ११०६३ | ९०४१ | ७५२९ |
| ब. भांडवली जमा पैकी | ४६४८८ | २५०८७७ | २७३४६६ | ३४१५४४ | ३३२२८७ | २९४६९९ | ३०१७७६ |
| i. निर्गुतवणूक उत्पन्न | - | ३६४६ | ३१५१ | १६९५३ | ४४२४ | २३५६ | ४८४० |
| ii. वसूल कर्जे | ३२३३ | १४५१४ | १२९१६ | २६३१८ | १४९६९ | ११२६५ | ६१३७ |
| २. एकूण खर्च (अ+ब+क) | १६३५२० | ६५२९६७ | ७२६७०६ | ८५५,०७१ | ९२९,२४३ | १०३६,९३६ | ११३१,५१५ |
| अ. महसूली | १२९,६२८ | ५५९,५११ | ६१५,९६० | ६७७,९५३ | ७३०,४०३ | ८४१९५२ | ९२१९८२ |
| ब. भांडवली | २२३०४ | ६७०४८ | ८८३५३ | १४५,४२७ | १७२७९३ | १६९५९७ | १९०११० |
| क. कर्जे आणि देयता | ११५८८ | २६४०८ | २२३९३ | ३१६९१ | २६०४७ | २५३८७ | १९४२३ |
| ३. महसूली तूट | २३८७१ | १५९,३५० | १६२,९९० | १५९,५०० | ११४,७६० | १०१,१०५ | ८६,५१३ |
| ४. एकूण राज्यवित्तीय तूट | ५३,५८० | २२६,४२५ | २३४,९८७ | २३४,५०२ | २३४,७१९ | २६३,११५ | २५७,०८८ |

(तक्ता क्र. १ चालू स्थूल देशी उत्पादनाशी टक्केवारी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. एकूण जमा (अ+ब) | २६.८ | २८.५ | २९.६ | ३१.१ | ३०.३ | २८.८ | २७.७ |
| अ. महसूली उत्पन्न (i+ii) | १८.६ | १७.५ | १८.४ | १८.८ | १९.७ | २०.५ | २०.४ |
| i) कर उत्पन्न | १५.४ | १३.८ | १४.५ | १५.० | १५.८ | १६.६ | १६.८ |
| ii) करेतर उत्पन्न पैकी | ३.२ | ३.८ | ३.९ | ३.८ | ३.९ | ४.० | ३.६ |
| व्याज उत्पन्न | १.१ | ०.८ | ०.७ | ०.७ | ०.४ | ०.३ | ०.२ |
| ब. भांडवली उत्पन्न पैकी | ८.२ | ११.० | ११.१ | १२.४ | १०.६ | ८.३ | ७.४ |
| i) निर्गुंतवणूक उत्पन्न | ०.० | ०.२ | ०.१ | ०.६ | ०.१ | ०.१ | ०.१ |
| ii) वसूल कर्जे | ०.६ | ०.६ | ०.५ | १.० | ०.५ | ०.३ | ०.१ |
| २. एकूण खर्च(अ+ब+क) | २८.८ | २८.६ | २९.६ | ३०.९ | २९.७ | २९.१ | २७.६ |
| अ. महसूली | २२.८ | २४.५ | २५.१ | २४.५ | २३.४ | २३.६ | २२.५ |
| ब. भांडवली | ३.९ | २.९ | ३.६ | ५.३ | ५.५ | ४.८ | ४.६ |
| क. कर्जेआणि देयता | २.० | १.२ | ०.९ | १.१ | ०.८ | ०.७ | ०.५ |
| ३. महसूली तट | ४.२ | ७.० | ६.६ | ५.८ | ३.७ | ३.१ | २.१ |
| ४. एकूण राज्यवित्तीय तूट | ९.४ | ९.९ | ९.६ | ८.५ | ७.५ | ७.४ | ६.३ |

टीप : १. २००६-०७ साठीचे (अंदाजपत्रकीय अंदाज ) स्थूल देशी उत्पादनाशी प्रमाण केंद्रीय सांख्यिकी संस्थेच्या सुधारित अंदाजावर आधारित आहे. १९९९-२००० पूर्वीचे चालू बाजार किंमतीनुसार स्थूल देशी उत्पादन १९९३-९४ श्रेणीवर आणि १९९९-२००० पासूनचे नव्या १९९९-२००० च्या श्रेणीवर अवलंबून आहे.

२. २००४-०५ (लेखा) २००५-२००६(सुधारित अंदाज)आणि २००६-०७(अंदाज)या संबंधातील आकडेवारी २९ राज्य सरकारांची आहे. ही सांख्यिकी प्रारंभिक स्वरूपाची आहे.

स्त्रोत :- आर्थिक सर्वेक्षण २००६-०७, पृष्ठ क्र.४८

काळात ज्या सार्वजनिक क्षेत्रामध्ये सरकारने मोठी गुंतवणूक केली, त्या व्यवस्थेची नव्या धोरणाच्या काळात कार्यक्षमता वाढल्यामुळे, विशेषत: किंमत धोरण अधिक वास्तववादी केल्यामुळे नफा निर्माण करण्याची क्षमता वाढली हे स्पष्ट आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग-व्यापाराच्या बाबतीत 'देर है लेकिन अंधेर नहीं' असेच म्हणावे लागेल.

४.उत्पादकता वाढ, विकास दराची वाढ, आर्थिक नियोजन यासंदर्भात विचार करता सर्वसाधारण भारत सरकारच्या महसूली खर्चाचे प्रमाण भांडवली खर्चापेक्षा लक्षणीय प्रमाणात मोठे आहे. स्थूल देशी उत्पन्नाशी तुलना करता १९९०-९१ मध्ये महसूली खर्चाचे प्रमाण २२.८ टक्के, तर भांडवली खर्चाचे प्रमाण ३.९ टक्के होते. संबंधित आकडे २००६-०७ मध्ये २२.५ टक्के आणि ४.६ टक्के झाले.

५.सरकारच्या जमेकडील रकमांमध्ये व्याजाच्या स्वरूपात जमा होणाऱ्या रकमांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटलेले दिसते. १९९०-९१ मध्ये जमा व्याजाचे स्थूल देशी उत्पन्नाशी १.१ टक्का असणारे प्रमाण २००६-०७ मध्ये फक्त ०.२ टक्के झाले.

६.स्थूल देशी उत्पन्नाशी तुलना करता निर्गुंतवणूक जमेचे प्रमाण २००३-०४ मध्ये ०.६ टक्के होते. ते नंतरच्या काळात प्रत्येक वर्षी ०.१ टक्के इतकेच दिसते. मधल्या काळातील निर्गुंतवणूक धोरणावर शहाणपणाचे किंवा सावधगिरीचे नियंत्रण आले असावे, असा याचा अर्थ लागतो.

## १.३ केंद्र सरकारची जमा आणि खर्च :

तक्ता क्र. २ मध्ये केंद्र सरकारची जमा आणि खर्च यासंबंधी सांख्यिकी दिलेली आहे. सर्वसाधारणपणे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या एकत्रित आकडेवारीतून व्यक्त होणाऱ्या प्रवृत्ती याही ठिकाणी व्यक्त होतात. तथापि, उपलब्ध आकडेवारी काळजीपूर्वक तपासल्यास काही विशेष निरीक्षणे प्रकर्षाने लक्षात घ्यावी लागतात.

१.केंद्र सरकारच्या खर्चामध्ये व्याज खर्चाचे चित्र भडक होत चालले आहे. एकूण रकमा व स्थूल देशी उत्पन्नाशी प्रमाण या दोन्ही अर्थाने व्याज खर्च मोठा होत चालला आहे. १९९०-९१ मध्ये केंद्र सरकारचा व्याज खर्च २१४९८ कोटी रू. होता. तो २००१-०२ मध्ये १,०७,४६० रू. झाला. नंतरही तो वाढतच आहे. स्थूल देशी उत्पन्नाशी केंद्र सरकारच्या व्याज खर्चाचे प्रमाण १९९०-९१ मध्ये ३.८ टक्के, २००१-०२ मध्ये ४.७ टक्के, २००२-

**तक्ता क्र .२**

**केंद्र सरकारची जमा आणि खर्च** (रू.कोटीत)

| | ९०-९१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ अंदाजपत्रकीय अंदाज | ०५-०६ तात्पुरते | ०६-०७ अंदाजपत्रकीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. महसुली जमा(अ+ब) | ५४९५४ | २०१३०६ | २३०८३४ | २६३८१३ | ३०६०१३ | ३५१२०० | ३४३८८३ | ४०३४६५ |
| अ. कर उत्पन्न | ४२९७८ | १३३५३२ | १५८५४४ | १८६९८२ | २२४७९८ | २७३४६६ | २६९९९२ | ३२७२०५ |
| ब. करेतर उत्पन्न | ११९७६ | ६७७७४ | ७२२९० | ७६६३१ | ८१२१५ | ७७७३४ | ७३८९१ | ७६२६० |
| २. महसुली खर्च | ७३५१६ | ३०१४६८ | ३३८७१३ | ३६२०७४ | ३८४३५१ | ४४६५१२ | ४३८५२७ | ४८८१९२ |
| अ. व्याज देणी | २१४९८ | १०७४६० | ११७८०४ | १२४०८८ | १२६९३४ | १३३९४५ | १३१७५७ | १३९८२३ |
| ब. अनुदाने | ९५८१ | ३०४४७ | ४०७१६ | ४३५३५ | ४२४८४ | ४६३५८ | ४४२२० | ४४७९२ |
| क. संरक्षण खर्च | १०८७४ | ३८०५९ | ४०७०९ | ४३०२३ | ४३८६२ | ४८६२५ | ४८२९७ | ५१५४२ |
| ३. महसुली तूट(२-१) | १८५६२ | १००१६२ | १०७८७९ | ९८२६१ | ७८३३८ | ९५३१२ | ९४६४४ | ८५७२७ |
| ४. भांडवली जमा (अ+ब+क) | ३१९७१ | १६१००४ | १८२४१४ | २०७३९० | १११६६९ | १६३१४४ | १६००२५ | १६०५२६ |
| अ. वसूल कर्जे | ५७१२ | १६४०३ | ३४१९१ | ६७१६५ | ६२०४३ | १२००० | १२०९७ | ८००० |
| ब. इतर जमा (मुख्यत:) सार्वजनिक उपक्रम निर्गुंतवणूक | ० | ३६४६ | ३१५१ | १६९५३ | ४४२४ | ० | १५८०. | ३८४० |
| क. कर्जेआणि इतर देयता | २६२५९ | १४०९५५ | १४५०७२ | १२३२७२ | १२५२०२ | १५११४४ | १४६३४८ | १४८६८६ |
| ५. भांडवली खर्च | २४७५६ | ६०८४२ | ७४५३५ | १०९१२९ | ११३३३१ | ६७८३२ | ६५३८१ | ७५७९९ |
| ६. एकूण खर्च | ९८२७२ | ३६२३१० | ४१३२४८ | ४७१२०३ | ४९७६८२ | ५१४३४४ | ५०३९०८ | ५६३९९१ |
| अ. योजना खर्च | २८३६५ | १०११९४ | १११४७० | १२२२८० | १३२२७६ | १४३४९७ | १४०१३८ | १७२७२८ |
| ब. बिगर योजना खर्च | ६९९०७ | २६११६ | ३०१७७८ | ३४८९२३ | ३६५४०६ | ३७०८४७ | ३६३७७० | ३९१२६३ |
| ७. राज्य वित्तीय तूट | ३७६०६ | १४०९५५ | १४५०७२ | १२३२७२ | १२५२०२ | १५११४४ | १४६३४८ | १४८६८६ |
| ८. प्राथमिक तूट(७-२ अ) | १६१०८ | ३३४९५ | २७२६८ | -६१६ | -१७३२ | १७१९९ | १४५११ | ८८६३ |
| अ. प्राथमिक तूट उपभोग | ६३५८ | ३६१८० | ३८६०७ | २६०३७ | -२९८ | ३०४ | १६७० | -१६८६४ |
| ब. प्राथमिक तूट गुंतवणूक | ९७५० | -२६८५ | -११८५३ | -२५८५३ | -१४३४ | १६८९५ | १२९३१ | २५७२७ |

तक्ता क्र. २ चालू स्थूल देशी उत्पन्नाशी टक्केवारी

| | ९०-९१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ अंदाजपत्रकीय अंदाज | ०५-०६ तात्पुरते | ०६-०७ अंदाजपत्रकीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. महसूली जमा(अ+ब) | ९.७ | ८.८ | ९.४ | ९.५ | ९.८ | ९.८ | ९.६ | ९.८ |
| अ. कर उत्पन्न | ७.६ | ५.९ | ६.४ | ६.८ | ७.२ | ७.७ | ७.६ | ८.० |
| ब. करेतर उत्पन्न | २.१ | ३.० | २.९ | २.८ | २.६ | २.२ | २.१ | १.९ |
| २. महसूली खर्च | १२.९ | १३.२ | १३.८ | १३.१ | १२.३ | १२.५ | १२.३ | ११.९ |
| अ. व्याज देणी | ३.८ | ४.७ | ४.८ | ४.५ | ४.१ | ३.८ | ३.७ | ३.४ |
| ब. अनुदाने | १.७ | १.३ | १.७ | १.६ | १.४ | १.३ | १.२ | १.१ |
| क. संरक्षण खर्च | १.९ | १.७ | १.७ | १.६ | १.४ | १.४ | १.४ | १.३ |
| ३. महसूली तूट | ३.३ | ४.४ | ४.४ | ३.६ | २.५ | २.७ | २.७ | २.१ |
| ४. भांडवली जमा (अ+ब+क) | ५.६ | ७.१ | ७.४ | ७.५ | ६.१ | ४.८ | ४.५ | ३.९ |
| अ. वसूल कर्जे | १.० | ०.७ | १.४ | २.४ | २.० | ०.३ | ०.३ | ०.२ |
| ब. इतर जमा (मुख्यतः सार्वजनिक उपक्रम निर्गुंतवणूक) | ०.० | ०.२ | ०.१ | ०.६ | ०.१ | ०.० | ०.० | ०.१ |
| क. कर्जे आणि इतर देयता | ४.६ | ६.२ | ६.९ | ४.५ | ४.० | ४.२ | ४.१ | ३.६ |
| ५. भांडवली खर्च | ४.४ | २.७ | ३.० | ३.९ | ३.० | १.९ | १.६ | १.८ |
| ६. एकूण खर्च | १७.३ | १५.९ | १६.८ | १७.० | १५.९ | १४.४ | १४.१ | १३.८ |
| अ. योजना खर्च | ५.० | ४.४ | ४.५ | ४.४ | ४.२ | ४.० | ३.९ | ४.२ |
| ब. बिगर योजना खर्च | १२.३ | ११.४ | १२.३ | १२.६ | ११.७ | १०.४ | १०.२ | ९.५ |
| ७. राज्य वित्तीय तूट | ६.६ | ६.२ | ५.९ | ४.५ | ४.० | ४.२ | ४.१ | ३.६ |
| ८. प्राथमिक तूट | २.८ | १.५ | १.१ | ०.० | -०.१ | ०.५ | ०.४ | ०.२ |
| अ. प्राथमिक तूट उपभोग | १.१ | १.६ | १.६ | ०.९ | ०.० | ०.० | ०.० | -०.४ |
| ब. प्राथमिक तूट गुंतवणूक | १.७ | -०.१ | ०.५ | -०.९ | ०.० | ०.५ | ०.४ | ०.६ |
| इतर घटक | | | | | | | | |
| अ. व्याज जमा | ८७३० | ३५५३८ | ३७६२२ | ३८५३८ | ३२३६४ | २५५०० | २०५६४ | १९२६३ |
| ब. लाभांश आणि नफा | ५६४ | ७९४० | १०९१० | १२३२६ | १५९३४ | १३४३७ | १८२११ | १८९६१ |
| क. बिगर योजना महसूली खर्च | ६०८९६ | २३९८११ | २६७१४४ | २८३४३६ | २१६८५६ | ९३०५३० | ३२६६३५ | ३४४४३० |

स्रोत : आर्थिक सर्वेक्षण २००६-०७ पृ. २१ सांख्यिकी संबंधातील इतर टीपा मूळ संदर्भातून पाहाव्यात.

०३ मध्ये ४.८ टक्के आणि त्यानंतर ३.४ टक्के असे दिसते.

२.१९९०-९१ नंतरच्या काळात प्रमुख अंशदानांचे महसूली खर्चातील प्रमाण वाढलेले दिसते. १९९०-९१ मध्ये प्रमुख अंशदानांचा खर्च (अन्न,खते व ऊर्जा) खर्च ९५८१ कोटी रू. होता. तो २००१-०२ मध्ये ३०,४४७ कोटी रू. झाला व २००६-०७ मध्ये हा खर्च ४४,७९२ कोटी रू. होता. स्थूल देशी उत्पन्नाशी तुलना करता हे प्रमाण १.१ टक्के ते १.३ टक्के या कक्षेत आढळते.

३.योजना खर्च आणि योजनेतर खर्च यातील प्रवृत्तीही तपासून पाहण्याची गरज आहे. योजना खर्चाशी तुलना करता केंद्र सरकारचा योजनेतर खर्च अनेक पटींनी वाढला. १९९०-९१ मध्ये स्थूल देशी उत्पन्नाशी तुलना करता योजना खर्च ५ टक्के होता. तो २००६-०७ मध्ये ४.२ टक्के झाला. याच काळात योजनेतर खर्च ९०-९१ मध्ये स्थूल देशी उत्पन्नाच्या १२.३ टक्के होता. तो २००६-

०७ मध्ये ९.५ टक्के झाला. योजनेतर खर्च किती मोठ्या प्रमाणात वाढतोय, हे एका बाजूला लक्षात घेता व दुसऱ्या बाजूस योजना खर्चाचे घटते प्रमाण लक्षात घेता भारतीय अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राचे वाढते महत्त्व व शासनाचा वाढता काढता पाय या दोन्हीही गोष्टी स्पष्ट होतात.

४.तक्ता क्र. २ मधील आकडेवारी काळजीपूर्वक लक्षात घेतल्यास कोणत्याही अभ्यासकाने तीन प्रवृत्तींची खास नोंद घ्यावी. या तीन प्रवृत्ती पुढीलप्रमाणे –

अ) व्याज जमेचे वाढते प्रमाण.

ब) लाभांश आणि नफ्याच्या जमेचे वाढते प्रमाण आणि

क) योजनेतर खर्चातील प्रचंड वाढ.

## १.४ राज्य सरकारांच्या जमा आणि खर्च :

तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील घटक राज्यांच्या जमा व खर्चाबद्दल सांख्यिकी दिलेली आहे. आर्थिक सर्वेक्षणाच्या निरीक्षणाप्रमाणे ''घटक राज्यांचे राजस्व काहीशा अंतराने केंद्र सरकारच्या राजस्वाप्रमाणेच बदलत जाते''. म्हणजेच थोड्या विलंबाने हा बदल होतो. परंतु बदलाची दिशा आणि जैविक रचना भारत सरकारच्या राजस्वाप्रमाणेच

### तक्ता क्र. ३
### राज्य सरकारांची जमा आणि खर्च

(कोटी रूपये)

| | ९०-९१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ सुधारीत अंदाज | ०६-०७ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.एकूण जमा (अ+ब) | ९११६० | ३७३८८६ | ४२५०७३ | ५२७०९७ | ५८२९१० | ६१६३९७ | ६६५२६० |
| अ. महसूली जमा (i+ii) | ६६४६७ | २५५६७५ | २८०३३९ | ३१६५३५ | ३७२०७५ | ४५४१५२ | ५१३१६६ |
| i) कर उत्पन्न | ४४५८६ | १८०३१२ | १९८७९८ | २२६९९९ | २६७६८३ | ३१७५०२ | ३६०८९८ |
| राज्यांचे स्वत:चे कर उत्पन्न | ३०३४४ | १२८०९७ | १४२१४३ | १५९९२१ | १८९१३२ | २२४७८० | २५२५०३ |
| ii) करेतर उत्पन्न | २१८८१ | ७५३६३ | ८१५४१ | ८९५३६ | १०४३९२ | १३६६५० | १५२२६८ |
| व्याज जमा | २४०३ | ९२०५ | ९५०२ | ८६१७ | ९४७० | ९६६६ | ९६४८ |
| ब. भांडवली जमा | २४६९३ | ११८२११ | १४४७३४ | २१०५६२ | २१०८३५ | १६२२४५ | १५२०९४ |
| वसूल कर्जे | १५०१ | ७७६६ | ३९०५ | १६४१४ | ८५६८ | ७४५६ | ४८१३ |
| २. एकूण खर्च (अ+ब+क) | ९१०८८ | ३७७३११ | ४२०४६१ | ५२६०२३ | ५७२३५४ | ६१०७५१ | ६५९५३० |
| अ. महसूली | ७१७७६ | ३१४८६३ | ३३५४५० | ३७७६८१ | ४०८४९७ | ४७१४३७ | ५१४९५२ |
| ब. भांडवली | १३५५६ | ५०१४५ | ७०६६४ | १२२४२९ | १४४०१४ | १२०४९५ | १२९८४६ |
| क. कर्जे | ५७५६ | १२३०३ | १४३४७ | २५९१३ | १९८४३ | १८८१९ | १४७३० |
| ३. महसूली तूट | ५३०९ | ५९१८८ | ५५१११ | ६११४५ | ३६४२३ | १७२८४ | १७६६ |
| ४. स्थूल राज्यवित्तीय तूट | १६७९७ | ९५९१४ | १०२१२३ | १२३०७० | १०९२५६ | ११३९९८ | १०५६९५ |

तक्ता क्र. ३ चालू स्थूल देशी उत्पादनाशी टक्केवारी

| | ९०-९१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ सुधारीत अंदाज | ०६-०७ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.एकूण जमा (अ+ब) | १६.० | १६.४ | १७.३ | १९.१ | १८.६ | १७.३ | १६.२ |
| अ. महसूली जमा (i+ii) | ११.७ | ११.२ | ११.४ | ११.४ | ११.९ | १२.७ | १२.५ |
| i) कर उत्पन्न | ७.८ | ७.९ | ८.१ | ८.२ | ८.६ | ८.९ | ८.८ |
| राज्यांचे स्वत:चे कर उत्पन्न | ५.३ | ५.६ | ५.८ | ५.८ | ६.० | ६.३ | ६.२ |
| ii) करेतर उत्पन्न | ३.८ | ३.३ | ३.३ | ३.२ | ३.३ | ३.८ | ३.७ |
| व्याज जमा | ०.४ | ०.४ | ०.४ | ०.३ | ०.३ | ०.३ | ०.२ |
| ब. भांडवली जमा | ४.३ | ५.२ | ५.९ | ७.६ | ६.७ | ४.५ | ३.७ |
| वसूल कर्जे | ०.३ | ०.३ | ०.२ | ०.६ | ०.३ | ०.२ | ०.१ |
| २. एकूण खर्च (अ+ब+क) | १६.० | १६.५ | १७.१ | १९.० | १८.३ | १७.१ | १६.१ |
| अ. महसूली | १२.६ | १३.८ | १३.६ | १३.७ | १३.१ | १३.२ | १२.६ |
| ब. भांडवली | २.४ | २.२ | २.९ | ४.४ | ४.६ | ३.४ | ३.२ |
| क. कर्जे | १.० | ०.५ | ०.६ | ०.९ | ०.६ | ०.५ | ०.४ |
| ३. महसूली तूट | ०.९ | २.६ | २.२ | २.२ | १.२ | ०.५ | ०.० |
| ४. स्थूल राज्यवित्तीय तूट | ३.३ | ४.२ | ४.२ | ४.५ | ३.५ | ३.२ | २.६ |

स्रोत : आर्थिक सर्वेक्षण : २००६-०७, पृ. ४४ सांख्यिकी संबंधातील इतर टीपा मूळ संदर्भातून पहाव्यात.

दिसते. तक्ता क्र. ३ मधील सांख्यिकी लक्षात घेता पुढील निरीक्षणे मांडता येतात.

१.१९९०-९१ शी तुलना करता घटक राज्यांच्या स्वत:च्या कर महसूलात अलीकडच्या काळात लक्षणीय प्रमाणात व टिकावू वाढ झालेली दिसते. घटक राज्यांचा कर महसूल आणि स्थूल देशी उत्पन्न असे गुणोत्तर काढल्यास ते १९९०-९१ मध्ये ५.३ टक्के होते, व २००६-०७ मध्ये हे प्रमाण ६.२ टक्के झाले.

२.घटक राज्यांच्या बाबतीत देखील एकूण रकमेमध्ये करेतर महसूल मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्थूल देशी उत्पन्नाशी हे प्रमाण या काळात ३.७ ते ३.८ टक्के या कक्षेत असलेले दिसते.

३.घटक राज्यांच्या बाबतीत खर्चाचे स्थूल देशी उत्पन्नाशी प्रमाण १९९०-९१ मध्ये १६ टक्के होते, ते २००३-०४ मध्ये १९ टक्क्यापर्यंत वाढले. त्यानंतर मात्र भारत सरकार किंवा केंद्र सरकारप्रमाणेच खर्चाचीही पातळी १६.१ टक्क्यावर घसरली. समाजाच्या सामाजिक, आर्थिक जीवनातून सरकार वाढत्या प्रमाणात अंग काढून घेत आहे; असा एक अर्थ त्याचा लावता येतो.

४.केंद्र सरकारप्रमाणेच घटक राज्यांच्या बाबतीत देखील महसूली खात्यावरील खर्चाची वाढ भांडवली खात्यावरील खर्चाच्या वाढीपेक्षा अधिक आहे. भांडवली खर्चाचे महसूली खर्चाशी प्रमाण काढल्यास ते साधारणत: २० टक्के दिसते.

### १.५ केंद्रीय कर महसूलाची रचना :

तक्ता क्र. ४ मध्ये केंद्र सरकारच्या कर महसूलाची एकूण महसूलाशी शेकडा प्रमाण, स्थूल देशी उत्पन्नाशी शेकडा प्रमाण आणि एकूण रकमा अशी माहिती दिलेली आहे. यावरून पुढील प्रकारची निरीक्षणे मांडता येतात.

१.सर्वच करांच्या बाबतीत महसूलांमध्ये लक्षणीय वाढ आहे.

२.१९९०-९१ मध्ये एकूण महसूलामध्ये प्रत्यक्ष करांचे प्रमाण १९.१ टक्के होते, ते २००६-०७ मध्ये ४७.६ टक्के झाले. एकूण महसूलामध्ये प्रत्यक्ष कर महसूलाचे प्रमाण वाढत गेल्यास एकूण कर व्यवस्थेतील अन्याय, प्रतिगामीपणा आणि अतिरिक्त करभार या गोष्टी कमी होत जातात.

३.विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या प्रत्यक्ष करांपैकी निगम कर हा प्राप्तीकरांपेक्षा अधिक महत्त्वाचा, उत्पन्नाचा स्रोत ठरला आहे. १९९०-९१ मध्ये प्राप्तीकर आणि निगम कर दोन्हीचे एकूण महसूलाशी

**तक्ता क्र ४**

**कर उत्पन्नाचे स्रोत**

(आकडे रूपये कोटीत)*

| | ९०-९१ | ९५-९६ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ तात्पुरते | ०६-०७ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रत्यक्ष कर (अ) | ११०२४ | ३३५६३ | ६९११७ | ८३०८५ | १०५०९० | १३२१७२ | १६०११९ | २१०६८४ |
| व्यक्तिगत उत्पन्न कर | ५३७१ | १५५९२ | ३१३४७ | ३६८६६ | ४१३८७ | ४९२५१ | ६०४४० | ७७४०९ |
| प्रमंडळ कर | ५३३५ | १६४८७ | ३६६०९ | ४६१७२ | ६३५६२ | ८२६८० | ९९४३३ | १३३०१० |
| अप्रत्यक्ष कर(ब) | ४५१५८ | ७६८०६ | ११६१२५ | १३११२८४ | १४७२९४ | १७०९३६ | १९९३५१ | २३०५६६ |
| सीमा शुल्क | २०६४४ | ३५७५७ | ४०२६८ | ४४८५२ | ४८६२९ | ५७६११ | ६५०७० | ७७०६६ |
| अबकारी कर | २४५१४ | ४११८७ | ७२५५५ | ८२३१० | ९०७७४ | ९९१२५ | १११२२६ | ११९००० |
| सेवा कर | ० | ८६२ | ३३०२ | ४१२२ | ७८९१ | १४२०० | २३०५५ | ३४५०० |
| स्थूल कर उत्पन्न | ५७५७६ | १११२२४ | १८७०६० | २१६२६६ | २५४३४८ | ३०४९५८ | ३६५८७४ | ४४२१५३ |
| स्थूल कर उत्पन्नाशी कर उत्पन्नाचे प्रमाण | | | | | | | | |
| प्रत्यक्ष कर (अ) | १९.१ | ३०.२ | ३७.० | ३८.४ | ४१.३ | ४३.३ | ४३.८ | ४७.६ |
| व्यक्तिगत उत्पन्न कर | ९.३ | १४.० | १७.१ | १७.० | १६.३ | १६.२ | १६.५ | १७.५ |
| प्रमंडळ कर | ९.३ | १४.८ | १९.६ | २१.३ | २५.० | २७.१ | २७.२ | ३०.१ |
| अप्रत्यक्ष कर(ब) | ७८.४ | ६९.१ | ६२.१ | ६०.७ | ५७.९ | ५६.१ | ५४.५ | ५२.१ |
| सीमा शुल्क | ३५.९ | ३२.१ | २१.५ | २०.७ | १९.१ | १८.९ | १७.८ | १७.४ |
| अबकारी कर | ४२.६ | ३६.१ | ३८.८ | ३८.१ | ३५.७ | ३२.५ | ३०.४ | २६.९ |
| सेवा कर | ०.० | ०.८ | १.८ | १.९ | ३.१ | ४.७ | ६.३ | ७.८ |
| स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी कर उत्पन्नाचे प्रमाण | | | | | | | | |
| प्रत्यक्ष कर (अ) | १.९ | २.८ | ३.० | ३.४ | ३.८ | ४.२ | ४.५ | ५.१ |
| व्यक्तिगत उत्पन्न कर | ०.९ | १.३ | १.४ | १.५ | १.५ | १.६ | १.७ | १.९ |
| प्रमंडळ कर | ०.८ | १.४ | १.८ | १.८ | २.३ | २.६ | २.८ | ३.२ |
| अप्रत्यक्ष कर(ब) | ७.९ | ६.५ | ५.१ | ५.३ | ५.३ | ५.५ | ५.६ | ५.६ |
| सीमा शुल्क | ३.६ | ३.० | १.८ | १.८ | १.८ | १.८ | १.८ | १.९ |
| अबकारी कर | ४.३ | ३.४ | ३.२ | ३.३ | ३.३ | ३.२ | ३.१ | २.९ |
| सेवा कर | ०.० | ०.१ | ०.१ | ०.२ | ०.३ | ०.५ | ०.६ | ०.८ |
| एकूण | १०.१ | ९.४ | ८.२ | ८.८ | ९.२ | ९.८ | १०.३ | १०.८ |

टीप : सांख्यिकी संबंधातील टीपा मूळ संदर्भातून पाहाव्यात

स्रोत : आर्थिक सर्वेक्षण :२००६-०७, पृ.२३

प्रमाण ९.३ टक्के होते. परंतु २००६-०७ मध्ये निगम कराचे प्रमाण ३०.१ टक्के, तर प्राप्तीकराचे प्रमाण १७.५ टक्के असे चित्र दिसते.

४.केंद्र सरकारच्या अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत दोन महत्त्वपूर्ण निरीक्षणे समर्थनीय ठरतात.(अ) आयात-निर्यात कर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क या दोन्ही बाबतीत सापेक्ष प्रमाण ३५.९ टक्क्यांवरून १७.४ टक्के आणि ४२.६ टक्क्यांवरून २६.९ टक्के असे घसरलेले दिसते.(ब)१९९४ नंतर प्रथमच सेवा कर लागू करण्यात आला आणि हा कर बघता बघता ११० पेक्षा अधिक सेवांवर वाढत्या दराने बसविला गेला व या कराचे महसूल प्राधान्य २००६-०७ मध्ये एकूण उत्पन्नात ७.८ टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते.

## १.६अर्थसंकल्पीय तूट :

तक्ता क्र. ५ मध्ये केंद्र सरकारच्या संबंधात तुटीच्या वेगवेगळ्या संकल्पनांच्या माध्यमात १९९०-९१ ते २००६-०७ ची माहिती दिलेली आहे. अर्थसंकल्पीय तूट (Fiscal deficit) महसूली तूट (Revenue Deficit) यांचा विचार करता पुढील निरीक्षणे मांडता येतात अर्थसंकल्पीय तूट हा मराठी शब्द इंग्रजी Fiscal deficit व Budgetory deficit या बाबतीत संभ्रम निर्माण करू शकेल. म्हणून प्रस्तुत लेखकांच्या मते,Fiscal Deficit साठी अधिक योग्य प्रतिशब्द राज्य वित्तीय तूट असा होऊ शकतो.

१) १९९०-९१ ते २००२-०३ या काळात महसूली तूटीचे राज्यवित्तीय तूटीशी असणारे प्रमाण ७४.४ टक्क्यांपर्यंत वाढत गेले. परंतु २००३ नंतर मात्र हे राज्यवित्तीय तूटीचे प्रमाण कमी होत गेले आहे. त्याचे कारण मुख्यत: राज्यवित्तीय जबाबदारी व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा (FRBMA) २००३ मध्ये सापडते.

२) भारत सरकारची राज्यवित्तीय तूट या संपूर्ण कालखंडात स्थूल देशी उत्पन्नाच्या ७ टक्के ते ४ टक्के या कक्षेतच बदललेली दिसते.

३) महसूली तूट देखील स्थूल देशी उत्पन्नाच्या २ टक्के ते ४ टक्के या कक्षेतच बदललेली दिसते.

राज्य सरकारांच्या बाबतीत महसूली तूट आणि राज्यवित्तीय तूट यांची आकडेवारी तक्ता क्र.३ मध्ये दिलेली आहे. १९९०-९१ मध्ये घटक राज्यांची महसूली तूट स्थूल देशी उत्पन्नाच्या ०.९ टक्के होती. ती २००१-०२ मध्ये २.६ टक्के झाली. परंतु नंतर मात्र ती कमी होत गेली व घटक राज्यांच्या बाबतीत महसूली तूटीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण शून्य टक्के झाले. हाही एका अर्थाने राज्यवित्तीय जबाबदारी व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्याचा

**तक्ता क्र. ५**

**केंद्र सरकारच्या तूटीचा कल**

(स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी टक्केवारी)

| वर्ष | महसुली तूट | प्राथमिक तूट | राज्यवित्तीय तूट | राज्यवित्तीय तूटीशी महसुली तूटीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९९०-९१ | ३.३ | २.८ | ६.६ | ४९.४ |
| १९९१-९२ | २.५ | ०.७ | ४.७ | ५२.७ |
| १९९२-९३ | २.५ | ०.६ | ४.८ | ५१.७ |
| १९९३-९४ | ३.८ | २.२ | ६.४ | ५९.२ |
| १९९४-९५ | ३.१ | ०.४ | ४.७ | ६४.६ |
| १९९५-९६ | २.५ | ०.० | ४.२ | ५९.२ |

तक्ता क्र. ५ चालू

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९९६-९७ | २.४ | -०.२ | ४.१ | ५८.२ |
| १९९७-९८ | ३.१ | ०.५ | ४.८ | ६३.५ |
| १९९८-९९ | ३.८ | ०.७ | ५.१ | ७४.८ |
| १९९९-२००० | ३.५ | ०.७ | ५.४ | ६४.६ |
| २०००-०१ | ४.१ | ०.९ | ५.७ | ७१.७ |
| २००१-०२ | ४.४ | १.५ | ६.२ | ७१.१ |
| २००२-०३ | ४.४ | १.१ | ५.९ | ७४.४ |
| राज्यवित्तीय जबाबदारी आणि अंदाजपत्रकीय व्यवस्थापन कायद्यानंतर | | | | |
| २००३-०४ | ३.६ | ०.० | ४.५ | ७९.७ |
| २००४-०५ | २.५ | -०.१ | ४.० | ६२.६ |
| २००५-०६ | २.७ | ०.४ | ४.१ | ६४.७ |
| २००६-०७ (अंदाजपत्रकीय अंदाज) | २.१ | ०.२ | ३.८ | ५७.० |

स्रोत : आर्थिक सर्वेक्षण : २००६-०७ पृष्ठ १९ सांख्यिकी संबंधातील इतर टीपा मूळ संदर्भातून पहाव्यात

## तक्ता क्र ६ सेवा कर

| वर्ष | सेवांची संख्या | करदात्यांची संख्या | करदर टक्के | महसूल (को.रू.) | वाढ (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| १९९४-९५ | ३ | ३९४३ | ५.०० | ४०७ | -- |
| १९९५-९६ | ३ | ४८६६ | ५.०० | ८६२ | १११.८ |
| १९९६-९७ | ६ | १३९८२ | ५.०० | १०५९ | २२.९ |
| १९९७-९८ | १५ | ४५,९९१ | ५.०० | १५८६ | ४९.८ |
| १९९८-९९ | २६ | १०७,४७९ | ५.०० | १९५७ | २३.४ |
| १९९९-०० | २६ | ११५,४९५ | ५.०० | २१२८ | ८.७ |
| २०००-०१ | २६ | १२२,३२६ | ५.०० | २६१३ | २२.८ |
| २००१-०२ | ४१ | १८७,५७७ | ५.०० | ३३०२ | २६.४ |
| २००२-०३ | ५२ | २३२,०४८ | ५.०० | ४१२२ | २४.८ |
| २००३-०४ १४ मे २००३ पासून | ६० | ४०३,८५६ | ८.०० | ७८९१ | ९१.४ |
| २००४-०५ १०सप्टें. २००४ पासून | ७५ | ७४०,२६७ | १०.०० | १४,२०० | ८०.०० |
| २००५-०६ प्रारंभिक | ८४ | ८०५,५९१ | १०.०० | २३,०५५ | ६२.४ |
| २००६-०७ १८ एप्रिल २००६ पासून | ९९ | -- | १२.०० | ३४,५०० | ४९.६ |

स्रोत : आर्थिक सर्वेक्षण : २००६-०७ पृष्ठ २९ सांख्यिकी संबंधातील इतर टीपा मूळ संदर्भातून पहाव्यात.

प्रभाव असावा असे म्हणता येईल.

### १.७ सेवा कर

अगोदरच आपण असे स्पष्ट केले आहे की केंद्र सरकारच्या कर महसूलात सेवा कर वाढत्या उत्पन्नाचा घटक होत आहे. तक्ता क्र. ६ मध्ये ही माहिती दिली आहे. २००६-०७ च्या आर्थिक सर्वेक्षणा प्रमाणे १९९४-९५ च्या अर्थसंकल्पामध्ये सुरू करण्यात आलेल्या सेवाकराचा प्रमुख उद्देश 'एकूण कर व्यवस्थेत वस्तू व सेवांच्या कर आकारणीत निर्माण झालेली सरूपता नष्ट करणारी व गैर प्रभाव निर्माण करणारी व्यवस्था' दुरूस्त करण्याचा होता. १९९४-९५ ते २००८-०९ या काळात करपात्र सेवांची संख्या ३ वरून १११ पर्यंत वाढली व कराच्या दरात लक्षणीय वाढ झाली. त्याचबरोबर सेवाकर दात्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली. तक्ता क्र. ६ मधील माहितीवरून आपण खालील विधाने करू शकतो.

१) सेवाकर पात्र सेवांची संख्या ३ वरून ९९ (२००६-०७) पर्यंत वाढली.

२) सेवाकर दर २००% पेक्षा अधिक वाढला.

३) सेवा कर दात्यांची संख्या ३९४३ (१९९४-९५) वरून ८०५५९१ (२००५-०६) इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली.

४) १९९४-९५ मध्ये सेवा करांचा महूसल केवळ ४०७ कोटी रूपये होता तो २००६-०७ मध्ये ३४५०० कोटी रूपये इतक्या अवाढव्य प्रामणात वाढला.

५) सेवा कराच्या महसूलात वार्षिक वाढ किमान २०% ते कमाल १००% इतकी दिसते.

### १.८ केंद्र सरकारची शिल्लक देणी (Outstanding Liabilities) :

तक्ता क्र. ७ मध्ये केंद्र सरकारच्या शिल्लक देण्यांची (सार्वजनिक कर्ज) आकडेवारी दिलेली आहे. यावरून अशी विधाने करता येतील की,

१) १९९०-९१ मध्ये केंद्र सरकारचे अंतर्गत कर्ज २,८३,०३३ कोटी रू. होते, ते २००६-०७ मध्ये २३,९६,८४६ कोटी रू. झाले. म्हणजे स्थूल देशी उत्पन्नाशी हे प्रमाण या कालखंडात ४९.८ टक्यावरून २००४-०५ मध्ये ६१.८ टक्के आणि २००६-०७ मध्ये ५८.७ टक्के झाले. गेल्या १५-२० वर्षात केंद्र

**तक्ता क्र ७**

**केंद्र सरकारची शिल्लक देणी**

(मार्च अखेर)
(आकडे रूपये कोटीत)

| | ९०-९१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ सुधारीत अंदाज | ०६-०७ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. अंतर्गत देयता | २८३,०३३ | १२९४,८६२ | १४९९,५८९ | १६९०,५५४ | १९३३,५४४ | २१२६,९९५ | २३९६,८४६ |
| (अ) अंतर्गत कर्ज | १५४,००४ | ९१८,०६१ | १०२०,६८८ | ११४१,७०६ | १२७६,९७१ | १३५५,९४३ | १५२२,०३० |
| (i) बाजार कर्जे | ७०,५२० | ५१६,५१७ | ६१९,१०५ | ७०७,९६५ | ७५८,९९५ | ८६७,३६८ | ९८४,६४५ |
| (ii) इतर | ८३,४८४ | ३९६,५४४ | ४०१,५८३ | ४३३,७४१ | ५१६,९७६ | ४८८,५७५ | ५३७,३८५ |
| (ब) इतर अंतर्गत देयता | १२९,०२९ | ३८१,८०१ | ४७८,९०१ | ५४८८,४८ | ६५७,५७३ | ७७१,०५२ | ८७४,८१६ |
| २. बहिर्गत कर्ज | ३१,५२५ | ७१,५४६ | ५१,६१२ | ४६१,२४ | ६०,८७८ | ६८,३९२ | ७६,७१६ |
| ३. एकूण देयता (१+२) | ३१४,५५८ | १३६६,४०८ | १५५९,२०१ | १७३६,६७८ | १९९४,४२२ | २१९५,३८७ | २४७३,५६२ |
| ४. --- | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० |
| ५.निव्वळ देयता(३-४) | ३१४,२५८ | १३६६,१०८ | १५५८,९०१ | १७३६,३७८ | १९९४,१२२ | २१९५,०८७ | २४७३,२६२ |

तक्ता क्र.७ चालू स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी शेकडा प्रमाण

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. अंतर्गत देयता | ४९.८ | ५६.८ | ६१.० | ६१.१ | ६१.८ | ५९.६ | ५८.७ |
| (अ) अंतर्गत कर्ज | २७.१ | ४०.० | ४१.५ | ४१.३ | ४०.८ | ३८.० | ३७.१ |
| i. बाजार कर्जे | १२.४ | २२.६ | २५.२ | २५.६ | २४.३ | २४.३ | २४.० |
| ii. इतर | १४.७ | १७.४ | १६.३ | १५.७ | १६.५ | १३.७ | १३.१ |
| (ब) इतर अंतर्गत देयता | २२.७ | १६.७ | १९.५ | १९.८ | २१.० | २१.८ | २१.३ |
| २. बहिर्गत कर्ज | ५.५ | ३.१ | २.४ | १.७ | १.९ | १.९ | १.९ |
| ३. एकूण देयता | ५५.३ | ५९.९ | ६३.४ | ६२.८ | ६३.८ | ६१.५ | ६०.३ |
| इतर बाबी | | | | | | | |
| (अ) बहिर्गत कर्ज (को.रू.) | ६६,३१४ | १९९,८६९ | १९६,०४३ | १८४,१७७ | १९१,१८२ | १९४,०७८ | - |
| (स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण) | ११.७ | ८.८ | ८.० | ६.७ | ६.१ | ५.४ | - |
| (ब) एकूण देयता (को.रू.) | ३४९,३४७ | १४९४,७३१ | १६९५,६३२ | १८७४,७३१ | २१२४,७२६ | २३२१,०७३ | - |
| (स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण) | ६१.४ | ६५.५ | ६९.० | ६७.८ | ६८.० | ६५.१ | - |
| (क)अंतर्गत देयता (को.रू.) | २०८,९७८ | ११४२,६९६ | १३३७,७५२ | १५२९,५७१ | १७७१,११७ | १९६४,०७० | २२३४,०३१ |
| (स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण) | ३६.७ | ५०.१ | ५४.४ | ५५.३ | ५६.६ | ५५.१ | ५४.५ |
| (ड)प्रमुख देयता (को.रू.) | २७६,२९२ | १३४२,५६७ | १५३३,७९५ | १७१३,७४८ | १९६२,२८९ | २१५८,१४८ | - |
| (स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण) | ४८.४ | ५९.९ | ६२.४ | ६२.० | ६२.८ | ६०.५ | - |
| (इ)केंद्र सरकारची आकस्मिक देयता(को.रू.) | - | ९५,८५९ | ९०,६१७ | ८७,७८० | १०७,९५७ | - | - |
| (स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण) | - | ४.२ | ३.७ | ३.२ | ३.५ | - | - |
| (ई) एकूण मालमत्ता (को.रू.) | २३६,७४० | ७६०,५९२ | ८४०,७६८ | ९०३,५५८ | १०८३,४२२ | ११८९,३४० | १३८१,२८९ |
| (स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण) | ४१.६ | ३३.३ | ३४.२ | ३२.७ | ३४.७ | ३३.३ | ३३.७ |

स्त्रोत : आर्थिक सर्वेक्षण : २००६-०७ पृष्ठ ३४ सांख्यिकी संबंधातील इतर टीपा मूळ संदर्भातून पहाव्यात.

सरकारचे अंतर्गत कर्ज साधारणपणे राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५० ते ६० टक्के असलेले दिसते.

२) १९९०-९१ मध्ये केंद्र सरकारचे आंतरराष्ट्रीय कर्ज (देणे) रू. ३१५२५ कोटी होते. ते २००६-०७ मध्ये रू. ७६,७१६ कोटी झाले. स्थूल देशी उत्पन्नाशी प्रमाण काढल्यास १९९०-९१ ला परकीय कर्ज ५.५ टक्के व २००६-०७ मध्ये १.९ टक्के असे दिसते. स्थूल देशी उत्पन्नाशी प्रमाण या स्वरूपात भारताचे आंतरराष्ट्रीय कर्ज घटत आहे. ही बाब बदलाची स्वागतार्ह दिशा दाखवते. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय कर्जाचे एकत्रित चित्र काढल्यास १९९०-९१ ला हे कर्ज ३१४५५८ कोटी रू. होते, (५५.३ टक्के) तर २००६-०७ मध्ये हे एकूण कर्ज २४७३५६२ कोटी रू. (६०.३टक्के) होते, हे स्पष्ट आहे.

## १.९ इतर महत्त्वाचे राज्यवित्तीय आयाम :

या ठिकाणी आपण भारत सरकारच्या, ज्यांच्याकडे निरीक्षकांचे लक्ष अधिक केंद्रित होत आहे; अशा काही इतर राजवित्तीय आयामाबद्दल निरीक्षणे करणार आहोत.

१) पूर्वी कर वसूल करण्याचा खर्च यासंबंधी

आकडेवारी संकलित केली जायची. ॲडम स्मिथच्या कर कसोट्या प्रमाणे करमहसूल गोळा करण्याचा खर्च महसूलाच्या शेकडेवारीत कमीत कमी ठेवणे हे आदर्श कर व्यवस्थेचे एक लक्षण मानले जाते. २००६-०७ च्या आर्थिक सर्वेक्षणाप्रमाणे (पृष्ठक्रमांक २५) कर खर्च ही नवी संकल्पना मांडण्यात आली आहे. कर गोळा करण्यासाठी सवलती आणि प्रेरके यामुळे जो करमहसूल सोडावा लागतो, त्याला कर खर्च म्हटलेले आहे. २००६-०७ मध्ये असा कर खर्च १०११४७ कोटी रू. तर २००५-०६ मध्ये असा कर खर्च २०६७०० कोटी रू. इतका अवाढव्य होता.

**२)अंशदाने-** आवश्यक वस्तूंचा (अन्न) बाजारव्यवस्थेमुळे निर्माण होणारा न्यून उपभोग दुरूस्त करण्यासाठी सरकारला अशा वस्तूंच्या आवश्यक पातळीच्या उपभोगासाठी अंशदानांचा वापर करावा लागतो.सध्याच्या धोरणाची गरज किंवा आवश्यकता आणि बाह्य प्रभाव अंशदाने कमी केली जावीत अशी दिशा दाखवितात, असे असून देखीलअन्न,खते आणि पेट्रोल यांच्या वरील अंशदानांची पातळी २००६-०७ मध्ये ४४७९२ कोटी रू. २००५-०६ मध्ये ४४२०० कोटी रू. आणि २००२-०३ मध्ये ४०,७१६ कोटी रू. असे दिसून

येते. म्हणजेच अंशदाने कमी होण्याऐवजी वाढलेली दिसतात.

३) वसूली दर (Collection Rate) तक्ता क्र. ८ मध्ये वसूलीचे दर या नव्या संकल्पनेच्या संदर्भात आकडेवारी दिलेली आहे. विशिष्ट वर्षासाठी सर्व आयातकरांचा सरासरी प्रभावी दर म्हणजे वसूली दर. म्हणजेच आयात करापासून मिळालेल्या महसूलाचे आयात मालाच्या मूल्याशी शेकडा प्रमाण. नव्या अर्थिक धोरणाच्या नंतर,वाढते जागतिकीकरण तसेच जगातिक व्यापार संघटनेचे परिणाम म्हणून आयातकराचा कमाल दर याचा टप्प्याटप्प्याने १५० टक्क्यांवरून (१९९१-९२) १५ टक्यांवर (२००५-०६) खाली आणण्यात आला. सर्व

**तक्ता क्र ८ निवडक आयातीच्या संबंधात वसूली दर** टक्के

| वर्ष | वस्तू गट | ९०-९१ | ९५-९६ | ००-०१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अन्न उत्पादन | ४७ | २३ | ३१ | ४० | ३० | १९ | २२ | ३२ |
| २ | पेट्रोलियम ऑईल ॲण्ड ल्यूब्रिकंट | ३४ | ३० | १६ | १० | ११ | ११ | १० | ०६ |
| ३ | रासायनिक द्रव्ये | ९२ | ४४ | ३८ | २९ | २८ | २४ | २२ | २० |
| ४ | मानवनिर्मित धागे | ८३ | ३६ | ४९ | ३१ | ३१ | ४६ | ३९ | ३४ |
| ५ | कागद | २४ | ८ | ८ | ६ | ७ | ७ | ७ | ९ |
| ६ | नैसर्गिक धागे | २० | १२ | १८ | ८ | १० | १३ | ११ | १२ |
| ७ | धातू | ९५ | ५२ | ४८ | ३६ | ३६ | ३२ | २६ | २५ |
| ८ | भांडवली वस्तू | ६० | ३३ | ३६ | २८ | २३ | १९ | १६ | १२ |
| ९ | इतर | २० | १३ | १२ | ९ | ९ | ८ | ६ | ५ |
| १० | पेट्रोलियम ऑईल आणि ल्यूब्रिकंट खेरीज | ५१ | २८ | २३ | १९ | १७ | १४ | १२ | ११ |
| ११ | एकूण | ४७ | २९ | २१ | १६ | १५ | १४ | ११ | १० |

स्त्रोत : आर्थिक सर्वेक्षण : २००६-०७ पृष्ठ ३८ सांख्यिकी संबंधातील इतर टीपा मूळ संदर्भातून पहाव्यात.

वसूली दर म्हणजे आयात करापासून मिळालेल्या महसूलाचे आयात मालाच्या एकूण किमतीशी असणारे प्रमाण

प्रकाराच्या वस्तूंच्या आयातीच्या सरासरी कराचे वसूली दर ९०-९१ मध्ये ४७ टक्के होते, ते २००५-०६ मध्ये १० टक्के झाले.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढत्या खुलेपणाचे हे वस्तूनिष्ठ निदर्शक स्वरूप आहे.

## १.१० निवृत्ती वेतन सुधारणा

परवाच्या विश्वासदर्शक ठरावानंतर अनेक तज्ञांनी असे अंदाज व्यक्त केले आहेत की,विमा, बँका आणि निवृत्ती वेतन या क्षेत्रात सरकार मोठ्या प्रमाणात बदल करेल. २००६-०७ च्या आर्थिक सर्वेक्षणाप्रमाणे (पान नं.४१)

"In the years to come, poverty amongst the elderly may be the dominant form of poverty in the country.Given the breakdown of the joint family, increasing life expectancy, increasing migration flows of labour within the country, and the limited effectiveness of poverty- alleviation programmes such as employment gnarantee schemes-in targeting the elderly A modern pension system will lay sound foundations of financial portfolios through which individuals will be able to obtain in come support in old age."

नव्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन व्यवस्थेचे मुख्य घटक पुढीलप्रमाणे असतील.

१) कर्मचाऱ्याला मूळ वेतन +महागाई भत्ता याच्या १० टक्के वर्गणी द्यावी लागेल.

२) यावर जादा रक्कम कर्मचारी वर्गणी म्हणून देऊ शकतील त्याला सरकारी सहभाग असणार नाही. ही जादा रक्कम कर्मचाऱ्याला गरजेप्रमाणे काढता येईल. पण साधारण भविष्य निर्वाह निधीची योजना रद्द होईल.

३) वयाच्या ६० व्या वर्षी कर्मचारी आपली ४०% निवृत्ती वेतन संपत्ती उर्वरित काळासाठी विशिष्ट वार्षिक उत्पन्न विकत घेण्यासाठी वापरतील.उर्वरित ६०% रक्कम कर्मचाऱ्याला रोख स्वरूपात मिळेल.

४) ६० वर्षापूर्वी निवृत्त होणाऱ्यास निवृत्ती वेतन संपत्तीचे मूल्यमापन ८०% संबंधित कालखंडांच्या प्रमाणात मोजण्यात येईल.

५) अशा निवृत्ती वेतन व्यवस्थेची केंद्रीय नोंद व्यवस्था आणि लेखा व्यवस्था असेल.

६) या राष्ट्रीय निवृत्ती वेतन व्यवस्थेचे नियंत्रण करण्यासाठी पेन्शन फंड रेग्युलेटरी ॲण्ड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी स्थापन करण्यात येईल. संबंधित विधेयक सध्या भारत सरकारच्या विचारार्थ आहे.

## १.११ वर्धित मूल्य कर:

राज्य पातळीवर भारतामध्ये वर्धित मूल्य कर पध्दतीचा स्वीकार ही अलीकडच्या काळातील भारतीय राजस्वातील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. राज्यांच्या अर्थमंत्र्यांची सक्षमीकृत समिती १८/०६/२००४ ला अशा निष्कर्षाप्रत आली की, १ एप्रिल २००५ पासून सर्व घटकराज्यात वर्धित मूल्य कर पध्दती सुरू करावी. आतापर्यंत ३२ घटकराज्ये केंद्रशासित प्रदेशांनी वर्धित मूल्य कर पध्दत सुरू केलेली आहे.उपरोक्त सक्षमीकृत समितीने तयार केलेले प्रारूप लक्षात घेता वर्धित मूल्य कर पध्दतीची मुख्य वैशिष्ट्ये
पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सर्व राज्यात वर्धित मूल्य कराचा दर एकच असेल.

२) हे दर ४ टक्के,१२.५ टक्के, १ टक्के (मौलिक धातू) आणि २० टक्के (इंधन तेले)अशा स्वरूपाचे असतील.

३) मूलभूत गरजा आणि निर्यातींना करमुक्त ठेवण्यात आले आहे.

४) वर्धित मूल्य कर व्यवस्था सुरू झाल्यानंतर राज्यपातळीवरील खरेदी विक्रीवरचे इतर सर्व कर रद्द केले जातील.

५) उत्पादन घटकांच्या वरील कराची भरपाई करता

येईल.

६) वर्धित मूल्य कर व्यवस्था चालू केल्यामुळे महसूल घट होणाऱ्या राज्यांना २००५-०८ या काळासाठी केंद्र सरकारकडून नुकसान भरपाई दिली जाईल.

७) केंद्रीय विक्री कर क्रमश: कमी करत पूर्णत: रद्द करण्यात येईल.

व्यापक अर्थाने नजीकच्या भविष्यकाळात केंद्रीय वर्धित मूल्य कर आणि राज्य वर्धित मूल्य कर या मार्गाने राष्ट्रीय पातळीवर वस्तू आणि सेवा कर (GST) समान पध्दतीने लागू करण्याचे वातावरण निर्माण होईल.

### १.१२ काही प्रश्न :

अलीकडच्या काही दिवसापासून काही राज्यवित्तीय प्रश्नांवर राजकीय व अर्थशास्त्रीय पातळीवर चर्चा सुरू आहे. पहिला प्रश्न संघराज्यीय व्यवस्थेत राजस्व अधिकारांची विभागणी किंवा त्यांचा एकत्रित वापर कसा केला जावा, हा आहे. अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर आपण आता कुठे वस्तू कर आकारणीच्या बाबतीत(Commodity) सुसंवादी वातावरण निर्माण करू शकलो आहोत. राजकीय इच्छाशक्ती दृढ झाल्यास संपूर्ण राष्ट्रभर वस्तू व सेवा कर एकाच स्वरूपात लवकरच राबविला जाण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. अर्थात संघराज्यीय भावना सुरक्षित ठेवून अशा पध्दतीचा सर्व घटकराज्यांच्या साठी एकच वस्तू व सेवा कर आर्थिक व राजकीय दृष्ट्या व्यवहार्य ठरेल का हा खरा प्रश्न आहे. ते शक्य झाल्यास अशा करापासून मिळणारा महसूल केंद्राकडे आणि घटकराज्ये यांच्यात कसा वाटला जावा आणि घटक राज्यांचा हिस्सा राज्या-राज्यांमध्ये कसा वाटला जावा त्याबद्दल वित्त आयोगाला काय जबाबदारी देता येईल यासारखे प्रश्न निर्माण होतात. दुसऱ्या बाजूस केंद्रीय वर्धित मूल्य कर वेगळा व घटक राज्यांचा वर्धित मूल्य कर वेगळा असे करायचे झाल्यास केंद्र सरकारकडे कोणत्या वस्तू आणि सेवा ठेवायच्या आणि घटक राज्यांना कोणत्या वस्तू आणि सेवा द्यायच्या हेही महत्त्वाचे ठरते. २४ जून २००८ च्या इकॉनॉमिक टाइम्समधील Debate या सदरात याबद्दल काही तज्ञांनी भूमिका व्यक्त केली आहे. त्यावरून घटक राज्यांना अधिक अधिकार द्यावेत या बाजूंकडे कल दिसून येतो. दुसरा महत्त्वाचा प्रश्न प्रत्यक्ष कर आकारण्याच्या बाबतीतील आहे. काही ठिकाणी अशी मागणी केली जात आहे की, अचानक लाभ कर(Wind fall Tax) विशेषत:इंधन तेल कंपन्याच्या संदर्भात लागू करण्यात यावा.अर्थात तेल खात्याचे मंत्री या विचाराच्या विरोधात दिसतात. कारण अशा करामुळे खनिज तेलाचा शोध, खुदाई, शुध्दीकरण या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक घटण्याची शक्यता आहे.याउलट,काही मोजक्या मोठ्या औद्योगिक कंपन्यांना आंतरराष्ट्रीय बाजारात आलेल्या काही महत्त्वाच्या बदलामुळे जर अवाढव्य नफा होत असेल, तर त्याठिकाणी अचानक लाभ कर बसवून तो महसूल आरोग्य, शिक्षण आणि परिसेवा विकास यांसाठी वापरला जावा, असाही विचार मांडला जात आहे .एकंदरीत पाहता, नव्या आर्थिक धोरणानंतरच्या कालखंडात भारतीय राजस्वामध्ये मूलगामी, दूरगामी व सामाजिक हिताला पोषक, न्याय करव्यवस्थेला वर्धक असे बदल होताना दिसताहेत.

***

# जागतिकीकरणाने भारतातील उच्चशिक्षणापुढे निर्माण केलेली आव्हाने आणि संधी

**जीवन वि. पवार**
अर्थशास्त्र विभाग,
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,
उस्मानाबाद
भ्रमणध्वनी : ९९६०८२१२०७

## प्रास्ताविक :

बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि या बदलाबरोबर नवनवीन संधी तसेच नवनवीन समस्या व आव्हाने निर्माण होत असताना अशा प्रकारच्या बदलाचा एक भाग म्हणून जागतिकीकरणाची संकल्पना उदयास आली.

रूसी मोदीच्या मते ''मुक्त स्पर्धा किंवा खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे म्हणजे जागतिकीकरण होय.'' तर मॅलकॉम एस.ॲडशियस यांच्या मते ''जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी जागतिक दृष्टिकोन निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' (Globalization of the economy may be defined as global dimenasion of the involiving world economy.) जागतिकीकरणाच्या संकल्पनेच्या उदयाबरोबर विश्वाच्या कल्याणासाठी, समृध्दीसाठी नवनवीन संधी उदयास आल्या आहेत. या संधीबरोबरच या संकल्पनेने विश्वातील राष्ट्रांच्या पुढे नवनवीन आव्हाने किंवा समस्या निर्माण केल्या आहेत. उदारीकरण व खाजगीकरण ही जागतिकीकरणाची प्रमुख साधने आहेत. जागतिकीकरणाला चालना देण्यासाठी अनेक बदल व उलथापालथी होऊन जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आली. कालांतराने या संघटनेत शिक्षण सेवेचा अंतर्भाव करण्यात आला. शिक्षणसेवेच्या जागतिकीकरणात भारतासारख्या विकसनशील राष्ट्रापुढे काही संधी तर काही आव्हाने उभी राहिली आहेत.

## जागतिक व्यापार संघटना (WTO) :

बहुउद्देशीय व्यापारी करारांद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने १९४७ मध्ये व्यापार व जकातीविषयक सर्वसाधारण करार (GATT) अस्तित्वात आला. या कराराची अंमलबजावणी ९ जुलै

१९४८ पासून सुरू झाली. या कराराच्या प्राथमिक २३ सदस्य राष्ट्रापैकी भारत एक होता. १९४७ ते १९९४ या दरम्यान गॅटच्या सदस्य राष्ट्रांमध्ये चर्चेच्या वेगवेगळ्या आठ फेऱ्या झाल्या. जिनेव्हा फेरी १९४७, अॅनेसीफेरी १९४९, टॉर्केफेरी १९५०-५१, जिनेव्हाफेरी १९५५-१९५६, जिनेव्हा डिलन फेरी १९५९-६२, जिनेव्हा-केनेडी फेरी १९६३-१९६७, जिनेव्हा टोकीयोफेरी १९७३-७९, ऊरूग्वे फेरी १९८६-९०.

गॅटची चर्चेची ८ वी फेरी सप्टेंबर १९८६ मध्ये 'ऊरूग्वे' मधील 'पुटाडेलईस्ट' येथे सुरू झाली. त्यामुळे चर्चेच्या या फेरीस 'ऊरूग्वे राऊंड' असेही म्हणतात. गॅटचे तत्कालीन सरसंचालक आणि व्यापार चर्चा समितीचे अध्यक्ष ऑर्थर डंकेल यांनी डिसेंबर १९९१ मध्ये जकात व व्यापरविषयक एक सर्वसमावेशक प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव मान्य करण्यासाठी १५ डिसेंबर १९९३ ही अंतिम तारीख ठरविण्यात आली होती. गॅटचे तत्कालीन सरसंचालक पीटर सुंदरलॅण्ड यांनी अनेक पातळ्यांवर केलेल्या प्रयत्नांना यश येऊन नंतरच्या काळात गॅटच्या बहुतेक सर्व सदस्य राष्ट्रांनी काही दुरूस्त्या सुचवून या प्रस्तावास मान्यता दिली. त्यामुळे त्याचे रूपांतर करारामध्ये झाले आहे. १५ एप्रिल १९९४ रोजी भारतानेही डंकेल प्रस्तावावर स्वाक्षरी केली हे या ठिकाणी लक्षात घेणे अगत्याचे आहे.

१ जोनवारी १९९५ रोजी गॅटचे रूपांतर जागतिक व्यापार संघटनेत (World Trade Organization) करण्यात आले. २३ एप्रिल २००४ पर्यंत १४७ सदस्य राष्ट्र असलेली ही संघटना आता जागतिक मुक्त व्यापाराच्या उद्दिष्टाने प्रेरित होऊन कार्यरत झाली आहे.

## जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये -

गॅटची उद्दिष्ट्ये अधिक कार्यक्षमपणे पार पाडण्याच्या दृष्टीने जागतिक व्यापार संघटना स्थापन करण्यात आली आहे. गॅटच्या मूळ उद्दिष्टांसोबत बदललेल्या परिस्थितीनुरूप काही नवीन उद्दिष्ट्ये यामध्ये स्वीकारली आहेत ती म्हणजे-

* सदस्य राष्ट्रांतर्गत मुक्त व योग्य व्यापाराची वृध्दी करणे.
* आंतरराष्ट्रीय व्यापारातील भेदात्मक पध्दती दूर करणे.
* व्यापार पध्दतीच्या पुनर्विलोकनासाठी, प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मदत करणारी प्रणाली म्हणून कार्य करणे.
* राहणीमान उंचावणे.
* पर्यावरण संरक्षण व स्थायी विकासाचे प्रयत्न करणे इ.

जागतिक व्यापार संघटनेच्या कराराची पूर्ण अंमलबजावणी १ जानेवारी २००५ पासून करण्यात आली आहे.

## व्यापार सेवांचा सर्वसामान्य करार (GATS)

२१ व्या शतकाच्या उदयाच्यावेळी सीमारेषा विस्तारल्या गेल्या. त्याचबरोबर ज्ञान, वित्त, भांडवल आणि दळणवळण या क्षेत्रांनी सीमारेषा ओलांडल्या. त्यांचे परिणाम दिसून येण्या पूर्वीच त्यामुळे होणारे नुकसान दिसून आले. शिक्षणसेवेतील मुक्त व्यापाराबाबतच्या चर्चेला अत्यधिक महत्त्व आहे. कारण शिक्षण ही एक अशी सेवा आहे की जिच्या मध्ये बळाचा वापर करण्याची क्षमता आहे आणि जोपर्यंत देश दहशतीला तोंड देण्यास समर्थ होत नाही आणि या गोष्टी संधीमध्ये रूपांतरित करत नाही तोपर्यंत राष्ट्रीय शिक्षण पध्दतीवर आघात होत राहील अशी अपेक्षा आहे. म्हणून शिक्षणसेवा क्षेत्रातील स्पर्धात्मकता वाढीस लावण्यासाठी काही गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी एक दहशतवादास तोंड देऊन त्या संधीमध्ये परिवर्तन करणे.यातील दुसरा

विभाग हा सैध्दांतिक रचनेवर आधारित असून तो विकसनशील अर्थव्यवस्थेची स्पर्धात्मक शैक्षणिक पद्धती असावी असे सुचवितो. ज्या कोर्सेसमध्ये स्पर्धात्मक संधी आहेत अशा कोर्सेसमधून विशेषीकरणाचा विकास करावा. जेणेकरून विद्यार्थ्यांना आकर्षित करता येईल. तिसरा भाग हा **GATS** अंतर्गत स्पर्धेच्या विषयी आहे. विभाग चौथ्या अंतर्गत उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारून त्या अद्यावत करून उच्च शिक्षणाची मागणी निर्माण करण्यासाठी विद्यापीठे आणि उद्योगात संबंध निर्माण करणे.

ज्या वेगवेगळ्या चार प्रकाराद्वारे सेवा क्षेत्राचा व्यापार केला जाऊ शकतो अशा चार प्रकाराद्वारे GATS ची व्याख्या करण्यात येते या चार प्रकारांना पुरवठ्याचे मार्ग (Modes of Supply)म्हणतात. सरहद्दविरहीत शिक्षण (borderless education) ग्रहीत धरून खालील चार प्रकारात पुरवठ्याच्या चार मार्गाचा आढावा घेता येईल (Kininght J. [2002])

**१) सरहद्दीपलीकडून होणारा पुरवठा (Cross Border Supply) :**

ज्या सेवा सरहद्द ओलांडून पलीकडे (दुसऱ्या राष्ट्रात) जातात अशा सेवांचा यात समावेश होतो (उपभोक्त्याच्या शारीरिक हालचाली या ठिकाणी विचारात नाहीत) यामध्ये प्रामुख्याने.

-दुरस्थ शिक्षण :- (Distance education)

-इ-लर्निंग :- E-Learning.

-माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा जास्तीत-जास्त उपयोग

(Maximum use of information & communication Technology [ICT])

-इंटरनेट सेवांचा/सुविधांचा उपयोग (Using Internet Facilities)

**२) विदेशातून प्राप्ती/उपभोग** (Consumption Abroad) :

या प्रकारच्या सेवांमध्ये उपभोक्त्याच्या शारीरिक हालचाली राष्ट्राच्या पुरवठ्याच्या दृष्टिकोनातून विचारात घेतल्या जातात.

**३) व्यापारी अस्तित्व/दृष्टिकोन (Commercial Presence) :**

यामध्ये सेवा भाड्याने अथवा सेवा विकण्याच्या उद्देशाने उपलब्ध करून देणाऱ्याकडे व्यापारी दृष्टिकोन असतो.

- स्थानिक शाखा किंवा उपग्रह परिसर (Local Branch or Satellite campesses)
- स्थानिक संस्थांशी भागीदारी (Partnership with Local Institution) या गोष्टींचा अंतर्भाव होतो.

**४) नैसर्गिक व्यक्तीचे अस्तित्व (Presence of Natural Person) :**

यामध्ये विदेशात सेवा पुरवण्यासाठी/उपलब्ध करून देण्यासाठी व्यक्ती काही काळासाठी विदेशात प्रवास करतात. यात प्रामुख्याने


- प्राध्यापक
- शिक्षक
- संशोधक
- व्यावसायिक
- प्रशिक्षणार्थी इ. यांचा अंतर्भाव होतो.

अशा प्रकारे GATS ची व्याख्या केली जाते.

**जागतिकीकरणाचे ज्ञानाचे स्वरूप :**

२१ व्या शतकात ज्ञानाला वस्तू स्वरूप प्राप्त झाले असून वस्तूंच्या बाजारपेठेत ज्याप्रमाणे वस्तूंची किंमत ही त्या वस्तूसाठी असलेली मागणी व त्या वस्तूचा पुरवठा यावरून ठरते. त्याप्रमाणे शिक्षणाच्या जागतिकीकरणामध्ये ज्ञानरूपी वस्तूची किंमत ही पुढील आलेखात दाखविल्याप्रमाणे

ठरणार आहे.




आकृतीत दाखवल्याप्रमाणे 'इ' या बिंदूच्या ठिकाणी ज्ञानरूपी वस्तूची किंमत निर्धारित होणार आहे. कारण 'इ' या बिंदूच्या ठिकाणीच त्या ज्ञानासाठी असलेली मागणी व तिचा पुरवठा यांचा समतोल साधला गेला आहे. 'इ' या बिंदूच्या ठिकाणी जी किंमत आहे त्या किंमतीपेक्षा कमी किंमत घेणे हे संबंधीत ज्ञान विकणाऱ्या व्यक्तीला परवडणारे नाही. तसेच 'इ' या बिंदूच्या ठिकाणी असणाऱ्या किंमतीपेक्षा जास्त किंमत देणे हे संबंधित ज्ञान विकत घेणाऱ्याला परवडणारे नाही. म्हणून त्यांचा समतोल हा 'इ' या बिंदूपाशीच साधला जाईल. ज्ञानरूपी वस्तूची किंमत निर्धारित करताना संबंधित वस्तूंची मागणी व पुरवठा हे घटक जेवढे महत्त्वाचे ठरणार आहेत; तेवढीच ज्ञानरूपी वस्तूच्या गुणवत्तेची भूमिकाही महत्त्वाची ठरणार आहे.

१.जे ज्ञान उच्च दर्जाचे व गुणवत्तेचे असेल अशा ज्ञानाची किंमत अर्थातच जास्त असणार आहे.

२.जे ज्ञान तुलनेने कमी प्रतीचे व गुणवत्तेचे असेल त्याची किंमत तुलनेने कमी राहणार आहे.


ज्यांची ऐपत उच्च दर्जाचे ज्ञान खरेदी करण्याची आहे. त्यांनाच उच्च दर्जाचे ज्ञान मिळेल.

**जागतिक स्तरावरील ज्ञानाचा बाजार :**

जागतिक स्तरावरील ज्ञानाच्या बाजारामध्ये विकसित व विकसनशील देशातील ज्ञानाच्या बाजाराचे स्वरूप कसे राहील? ते पुढील आलेखांच्याद्वारे अधिक स्पष्टपणे दिसून येईल.

**१. विकसित अर्थव्यवस्थेतील ज्ञानाच्या बाजाराचे स्वरूप :-**

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतरच्या काळात आणि GATS मध्ये शिक्षणाचा अंतर्भाव केल्यानंतर शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणात प्रचंड बदल घडून येत आहेत. विकसित जगतातील अतिरिक्त पुरवठा परिस्थिती आणि अविकसित जगतातील अतिरिक्त मागणी परिस्थिती हे शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणातील शिक्षण सेवांच्या मागणी पुरवठ्यात समतोल घडवून आणणारे घटक होत. शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतून विकसनशील राष्ट्राला शिक्षण सेवांची निर्यात केली जाईल. त्यामुळे विकसित राष्ट्रांकडे भांडवलाचा प्रवाह वाढेल. विकसित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात खालील आकृतीच्या सहाय्याने या परिस्थितीचे वर्णन/स्पष्टीकरण करता येईल.




शिक्षण सेवांची मागणी आणि पुरवठा

वरील आकृतीत 'अपइ' एवढा शिक्षण सेवांचा पुरवठा आहे. तर 'अमइ' इतकी मागणी आहे. 'मम' हा मागणीवक्र आहे. 'अप' ठरलेली/निश्चित किंमत आहे. या ठिकाणी अतिरिक्त पुरवठा हा 'मइ' 'पइ' बरोबर आहे. समतोल साधण्यासाठी मागणी वक्र 'मम' पासून 'म'म'' पर्यंत वाढणे आवश्यक

आहे. त्यासाठी विकसित राष्ट्रे शिक्षण सेवांच्या आंतरराष्ट्रीयकरणाचा फायदा उठवून विकसनशील राष्ट्रांतील शिक्षण सेवांची मागणी वाढवून आपल्याकडील अतिरिक्त पुरवठा कमी करतील. परिणामत: त्यांना परकीय चलनाची प्राप्ती होईल.

## २)विकसनशील अर्थव्यवस्थेतील ज्ञानाच्या बाजाराचे स्वरूप :

भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेतील ज्ञानाच्या बाजाराचे स्वरूप पुढील




**शिक्षण सेवांची मागणी आणि पुरवठा**

'अप' या कमी किंमतीला वित्तीय साधनसामुग्रीच्या अभावामुळे शिक्षणसेवांचा पुरवठा हा अलवचिक आहे. तो 'पइपइ' इतका आहे आणि शिक्षणासाठीची मागणी 'मम' इतकी असताना या ठिकाणी 'पइ' 'मइ' इतकी अतिरिक्त मागणी आहे. अविकसित राष्ट्रातील ही अतिरिक्त मागणी पूर्ण करण्यासाठी शिक्षण सेवांचा अतिरिक्त पुरवठा ज्यांच्याकडे आहे अशी विकसित राष्ट्रे उच्च शिक्षण सेवांच्या आंतरराष्ट्रीयकरणाचा फायदा उठवून पुढे सरसावतील व अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च-शिक्षण सेवांच्या मागणी व पुरवठ्याचा समतोल साधला जाईल.

वरील पद्धतीने जर का जागतिक समतोल साधला गेला तर विकसनशील राष्ट्रांकडून विकसित राष्ट्रांकडे भांडवलाची निर्यात होईल. शिक्षण सेवा संदर्भात वरील विचार अतिशय पध्दतशीर व योजनाबद्ध असला तरी सेवा क्षेत्राच्या मुक्त व्यापार करण्यापाठीमागील उद्देशाच्या केंद्रीय कल्पना स्पष्ट करतो. शिक्षण सेवांच्या व्यापारावरील बंधने उठवून मुक्त स्पर्धा निर्माण करून असमान प्राप्ती होईल. विकसित राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात फायदा मिळेल तर विकसनशील राष्ट्रांना फारसे फायदे मिळणार नाहीत.

हे टाळण्यासाठी जर का भविष्यकाळात विकसनशील राष्ट्रांना उच्च शिक्षण सेवा क्षेत्रातील भांडवल गुंतवणूक वाढवता आली तर व आलेखात दाखविल्याप्रमाणे 'प'प'' इतकी देशातील अतिरिक्त शिक्षण सेवांची मागणी विकसनशील राष्ट्रे 'अप'' या उच्च किंमत पातळीला 'पइ' 'पइ' इतक्या पुरवठ्यामध्ये 'प'प'' पर्यंत वाढ करू शकले तर देशांतर्गत शिक्षण सेवांच्या मागणी व पुरवठ्यात समतोल साधू शकतील. तसेच स्पर्धात्मकता निर्माण करून देशांतर्गत शिक्षण क्षेत्रामध्ये पुनर्रचना करून अद्यावत शिक्षणाचा पुरवठा वाढवणे विकसनशील राष्ट्रांना शक्य आहे.

विकसनशील राष्ट्रामध्ये अतिरिक्त मागणी अस्तित्वात असतेच. तेंव्हा विकसित राष्ट्रांकडून विद्यार्थ्यांना आकर्षक शिक्षणाच्या सुविधा पुरवून आपल्याकडे आकृष्ट केले जाऊ शकते. परंतु हे केवळ पर्यायाच्या दृष्टिकोनातून होते. शिक्षण सेवांच्या संदर्भात देशांतर्गत समतोल साधणे हे विकसनशील राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितसंबंधाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे असते. हा समतोल खालील दोन मार्गांनी साधला जाऊ शकतो.

१) कार्यक्षमतेत वाढ करून दिलेल्या किंमतीला पुरवठा वाढवून

२) पर्यायवाचक मार्गातील समानतेचा त्याग न करता

पुरवठ्यात वाढ करण्यासाठी पुरवठा किंमतीत वाढ करणे इ.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणाने भारतापुढे उभी केलेली आव्हाने :**

* देशात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे व संशोधन संस्था यांच्याकडे असणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक पायाभूत सेवा सुविधांची कमतरता कशी भरून काढावयाची?

* देशातील शिक्षण संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे व संशोधन संस्था यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी कसे बनवायचे?

* कमी दरामध्ये/खर्चामध्ये दर्जेदार शिक्षणाच्या सुविधा कशा उपलब्ध करून द्याव्यात?

* आर्थिकदृष्ट्या कमकुवत, मागासलेल्या व तळागाळातील घटकांना उच्च शिक्षणाच्या दर्जेदार संधी कशा उपलब्ध करून द्यावयाच्या?

* देशातील उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेचा विकास कसा साध्य करावयाचा? दर्जा सुधारण्यासाठी कोणते उपाय योजावेत ?

* आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम कसे तयार करावेत? व त्यांची अंमलबजावणी कशी करावी?

* उच्च शिक्षणामध्ये अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनांचा उपयोग कसा करावयाचा?

* जगातील विद्यार्थीवर्ग आकर्षित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबवाव्यात?

* आपल्या देशातील विद्यार्थीवर्ग परकीय विद्यापीठे व महाविद्यालयाकडे आकर्षित न होता स्वदेशीय विद्यापीठे व महाविद्यालयातूनच उच्च शिक्षण घेणे पसंत करेल यासाठी कोणते प्रयत्न करणे गरजेचे आहे?

* विदेशी महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापीठे व संशोधन संस्थांशी स्पर्धा करताना देशीय महाविद्यालये, शिक्षण संस्था, विद्यापीठे व संशोधन संस्था बंद पडणार नाहीत यासाठी खबरदारीचे उपाय म्हणून कोणते प्रयत्न करावे? इ.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणाने भारतापुढे निर्माण झालेल्या संधी :**

* सर्वांसाठी शैक्षणिक संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी भांडवलाचा(access) पुरवठा करणे (providing)

* शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

* स्पर्धा चांगल्या सेवेची खात्री देईल.

* समाजाचा आर्थिक आणि सामाजिक विकास.

* अधिक कुशलता प्रधान.

* ई-विद्यापीठे E-University

* जगातील शिक्षण संस्थांची ओळख करून दिली जाईल.

* किंमत परिणाम आणि नफा प्रधान शिक्षण.

* तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाच्या/वहनाच्या Trans-fer-संधी

* शैक्षणिक सेवांची परिपूर्ण बाजारपेठ.

* माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर होईल.

* विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील ज्ञान आणि तंत्रज्ञानातील दरी कमी होईल.

*उपभोक्त्याचे समाधान आवश्यकच आहे. शिक्षण ही एक वस्तू होईल म्हणून ग्राहक संबंध व्यवस्थापन (Customer Relationship Management) CRM दृष्टिकोन प्रत्यक्षात येईल.

* अनेक संशोधन आणि विकास बौध्दिक मालमत्ता हक्क (Intellectual Property)

Rights(IPRs)),तंत्रज्ञानातील परिवर्तन (upgradation)

* परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होईल.
* पर्यटन व्यवसायाचा विकास/वाढ होईल.
* जग हे जागतिक खेडे (Global village) बनेल.
* बहुसंस्कृतीवाद.
* कुशलतेचा बाजार (Marketability Skills)
* प्रत्येक व्यक्ती एक उद्योजक आहे.
* विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील दळणवळणाची दरी (Gap) कमी होईल.
* शिक्षणातील विकासासाठी जागतिक विस्तृत जाळ्या (World Wide Web(WWW)) चा उपयोग होईल.

येणाऱ्या काळामध्ये भारतात सामग्रीची कमतरता जाणवेल तसेच जागेची आणि लोकांचीही कमतरता भासेल, आहे त्या वर्गखोल्यांची संख्या कमी पडेल अशा वेळी GATS द्वारे उपलब्ध झालेल्या संधीचा फायदा घेऊन भारतीय उच्च शिक्षणाचा विकास करायला भारताला संधी आहे

**GATS ला समर्थपणे तोंड देण्यासाठी भारताकडे असलेल्या काही जमेच्या बाजू/ सकारात्मक बाजू :**

* इंटरनेट सेवा पुरविण्याच्या स्पर्धेत गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून भारताचा जगात २६ वा क्रमांक आहे.
* माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानातून शासनाला होणाऱ्या नफ्याच्या बाबतीत जगात १२ व्या क्रमांकावर.
* माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानातील उच्चांकामध्ये शासनाच्या यशस्वीतेच्या बाबतीत जगात १६ वा क्रमांक.
* माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाशी संबंधित कायद्याच्या बाबतीत जगात १६ वा क्रमांक.
* शैक्षणिक पद्धतीच्या दर्जाच्या बाबतीत जगात ३६ वा क्रमांक.
* विशेष संशोधनासाठीच्या आणि प्रशिक्षण सेवांच्या स्थानिक उपलब्धतेच्या बाबतीत भारताचा जगात २६ वा क्रमांक लागतो.
* व्यवस्थापन शाळांच्या गुणवत्तेच्या बाबतीत भारताचा जगात ८ वा क्रमांक लागतो.
* तंत्रज्ञानातील सुलभतेसाठी (Sophistication) भारताचा जगात २५ वा क्रमांक लागतो.
* ब्रेन ड्रेनच्या बाबतीत भारताचा जगात ६५ वा क्रमांक लागतो.
* संशोधन आणि विकास क्षेत्रावर भारताचा जगात ३९ वा क्रमांक लागतो.
* शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या उपलब्धतेच्या बाबतीत भारताचा जगात ३ रा क्रमांक लागतो.
* गणित आणि विज्ञान शिक्षणाच्या बाबतीत भारताचा जगात १४ वा क्रमांक लागतो.
* परकीयांची/विदेशांची थेट गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतर करण्याच्या बाबतीत भारताचा जगात ३१ वा क्रमांक लागतो.Source - World Economic Forum (2003-04) : Global Competitiveness Report.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणाला समर्थपणे तोंड देऊन त्याचे फायदे मिळविण्यासाठी योजाव्या लागणाऱ्या उपाययोजना :**

* उच्च शिक्षणाची गुणवत्ता उच्च प्रतीची ठेवणे.
* आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम तयार करून राबवले पाहिजेत.
* संशोधनाचा दर्जा सुधारला पाहिजे. संशोधन हे विकासाभिमुख व नाविन्यपूर्ण असले पाहिजे.
* शिक्षणाच्या पायाभूत व अत्याधुनिक सेवा सुविधा उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था, महाविद्यालये व विद्यापीठातून विकसित केल्या गेल्या पाहिजेत.

* आंतरराष्ट्रीय दर्जाची देशातील प्रत्येक राज्यातून किमान एक या पद्धतीने विश्वविद्यालये विकसित होणे आवश्यक आहे.

* अभ्यासक्रमात काळानुरूप व गरजेनुसार वारंवार बदल केले गेले पाहिजेत.

* पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यवहारज्ञानावर भर देणारे अभ्यासक्रम तयार करून अंमलात आणायला हवेत.

* इलेक्ट्रॉनिक युनिव्हर्सिटीजची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

* महाविद्यालये व विद्यापीठे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली पाहिजेत.

* कमी किंमतीत परंतु उच्च प्रतीचे/दर्जाचे ज्ञान उपलब्ध करून दिले पाहिजे.

* दुरस्थ व बहिस्थ शिक्षणाच्या सुविधांचा विस्तार करून त्यांच्या अभ्यासक्रमाची गुणवत्ता सुधारून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना दर्जेदार उच शिक्षणाच्या सुविधा कमीत-कमी खर्चात उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

* उच्च गुणवत्ता धारक व संशोधनाची आवड असणाऱ्या अभ्यासू व्यक्तींचीच अध्यापक म्हणून निवड करण्यात यावी.

* अध्यापकाच्या कार्याचे वेळोवेळी मूल्यांकन करण्यात येऊन त्यांची श्रेणी तयार करण्यात यावी.

* अध्यापकांना वेळोवेळी प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

* अध्यापकांना दळणवळणाच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

* आपल्याकडील उच्च दर्जाच्या ज्ञानाची माहिती जागतिक पटलावरून प्रदर्शित करणारी सूक्ष्म व जागरूक यंत्रणा असावी.

* विद्यार्थ्यांचे मूल्यांकन त्यांच्या पुस्तकी ज्ञानावरून न होता त्यांच्या विषयाच्या व्यावहारिक ज्ञानाच्या आधारे केले जाणे आवश्यक आहे.

* उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम निवडण्यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या पसंतीला मुक्त वाव असावा.

**सारांश :**

अनेक जागतिक उलथापालथीतून जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली असून तिची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. जागतिक व्यापार संघटनेचे सर्वाधिक फायदे सुरवातीला तरी विकसित राष्ट्रांना होणार यात शंका नाही. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला जागतिक स्पर्धेत टिकून राहून जागतिक स्पर्धेची फळे चाखण्यासाठी अनेक संधी आहेत. त्यासाठी प्रथमत: जागतिक व्यापार संघटनेने उभी केलेली आव्हाने समर्थपणे पेलली पाहिजेत. भारत आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असून शिक्षण सेवाच्या जागतिक व्यापारातही काही ठोस उपाय योजून मोठ्या प्रमाणात शिक्षण सेवांची निर्यात करून परकीय चलनाची प्राप्ती करू शकेल अशी आशा बाळगल्यास काही वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**

१.ए.पी.जे. अब्दुल कलाम: भारत २०२०

२.डांगे अशोक : जागतिक अर्थव्यवस्था

३.Lee Molly N.N. (2000). Expanding the State Role in Malaysian Higher Education in International Higher Education Summer 2000.

4. Sudhanshu Bhushan : Measures for enhancing Competitiveness of Higher Education.

५.न.स.पारसनीस : स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण

6. B. Deka : Higher Education in India.

7. R.Y. Mahore : Implications of TRIPS with Special Reference to Higher Education in India.

***

# भारताचा सार्वभौम संपत्ती निधी-
# आवश्यकता की स्वप्न ?

**विनायक म. गोविलकर,**
नाशिक.
भ्रमणध्वनी - ९४२२७६२४४४

## प्रास्ताविक :

भारताची विदेशी चलन गंगाजळी दिवसागणिक वाढत आहे. डिसेंबर ९० अखेरीस विदेशी चलनाचा साठा भारताच्या केवळ तीन आठवड्यांच्या आयातीसाठी पुरेल इतका अत्यल्प होता. १९९१ मध्ये सोनं तारण ठेऊन भारताने आंतरराष्ट्रीय वित्त बाजारातून कर्ज घेतले होते. त्यानंतर नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला आणि विदेशी चलन साठ्याच्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत गेला. विदेशी चलनाचा वाढता साठा खालील तक्त्यातून मांडला आहे.

**तक्ता १ : भारताची विदेशी चलन गंगाजळी**

| वर्ष | अब्ज डॉलर्स |
|---|---|
| ३१.३.१९९१ | ५.८ |
| ३१.३.१९९५ | २५.२ |
| ३१.३.२००० | ३८.० |
| ३१.३.२००५ | १४१.५ |
| ३१.३.२००६ | १५१.६ |
| ३१.३.२००७ | १९९.२ |
| ३१.३.२००८ | ३०९.७ |
| १८.४.२००८ | ३१३.५ |

(स्रोत - RBI monthly bulletin May 2008)

उभरत्या अर्थव्यवस्थांचा विचार केला तर मोठा विदेशी चलन साठा धारक देश म्हणून भारताचा तिसरा क्रमांक लागतो, तर जागतिक स्तरावर भारत पाचव्या क्रमांकावर आहे. रूपयाचा चढता विनिमय दर नसता तर हा विदेशी चलन साठा आणखी किती तरी वाढू शकला असता असा दावा केला जातो. विदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या सक्षमतेवरील विश्वास यातून व्यक्त होतो.

**वाढत्या गंगाजळीने उभी केलेली आव्हाने :**

वर तक्ता १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे गेल्या १७ वर्षात भारताची विदेशी चलन गंगाजळी ५४ पटींनी वाढली. वाढती गंगाजळी ही जशी अभिमानाची बाब आहे. तशीच तिच्यामुळे अनेक आव्हानेही देशाच्या मध्यवर्ती बँकेसमोर उभी ठाकली आहेत. परकीय चलनाचा इतका मोठा साठा कोठे गुंतवायचा हा प्रश्न रिझर्व बँकेला सोडवायला हवा. भारताच्या परकीय चलनातील मालमत्तेची स्थिती खाली तक्ता २ मध्ये दाखविली आहे.

**तक्ता २ : विदेशी चलन मालमत्तेची गुंतवणूक (अब्ज डॉलर्स )**

| तपशील | ३१/९/२००७ रोजी | ३१/३/२००७ रोजी |
|---|---|---|
| एकूण विदेशी चलन मालमत्ता | २३९.९५ | १९१.९२ |
| १. प्रतिभूती | ६७.२१ | ५३.०० |
| २. अन्य मध्यवर्ती बँका व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे ठेवलेल्या ठेवी | १३७.३५ | ९२.१७ |
| ३. विदेशी व्यापारी बँकांकडे ठेवलेल्या ठेवी | ३५.३९ | ४६.७५ |
| एकूण | २३९.९५ | १९१.९२ |

(स्रोत : Report on Foreign Exchange Reserves by RBI dt. 22.1.2008 )

विदेशी चलन साठ्याचे व्यवस्थापन हा महत्त्वाचा विषय रिझर्व बँक हाताळते. त्याची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे नमूद करता येतील.

१. भारताचा विदेशी चलन साठा वाढता कल दाखवित आहे आणि रूपयाचा विनिमय दर पूर्णतः मुक्त (Free floating) नसलेल्या स्थितीत आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद (Balance of Payment) सकारात्मक असल्याने हा कल चढताच राहील. (चालू खात्यावर तूट असली तरीही)

२.अन्य मध्यवर्ती बँकांप्रमाणेच रिझर्व बँकेचे विदेशी चलन गंगाजळी गुंतविण्याचे धोरण रूढमार्गवादी (conservative) आहे आणि त्यात सुरक्षितता आणि रोखता/तरलता यांना जास्त महत्त्व दिले आहे.

३.विदेशी चलन गंगाजळीची गुंतवणूक प्रामुख्याने कमी जोखमीच्या व कमी उत्पन्न देणाऱ्या OECD सरकारांच्या प्रतिभूतींमध्ये आणि बँकांच्या ठेवींमध्ये केलेली आहे. या गुंतवणुकीवर सामान्यतः ४%

पेक्षा कमी उत्पन्न मिळते. जागतिक स्तरावर व्याजदर वाढून सुध्दा २००५-०६ साली ३.९% मिळणारे उत्पन्न सन २००६-०७ मध्ये ४.६% इतकेच झाले.

४.विदेशी चलनाचा साठा जसा जसा वाढत जातो, तसा त्याचा व्यवस्थापनाचा परिव्यय सुध्दा वाढत जातो. सदर साठा गुंतवून ४% च्या आसपास उत्पन्न मिळते. परंतु देशांतर्गत रोख्यांवर मात्र ८ ते १०% दराने व्याज द्यावे लागते. याची एक प्रतिरूप-राजकोषीय किंमत (guasi-fiscal cost) रिझर्व बँकेला मोजावी लागते.

**सार्वभौम संपत्ती निधी : एक पर्याय (sovereign wealth fund) :**

विदेशी चलनाचा वाढलेला साठा आणि भविष्यात वाढणारा ओघ विचारात घेता त्याची योग्य प्रकारे गुंतवणूक करायला हवी. सध्याचे गुंतवणुकीचे धोरण सुरक्षेला फारच महत्त्व देणारे व कमी उत्पन्न देणारे तसेच अमेरिकन रोखे व ठेवी यामधील गुंतवणुकीला प्राधान्य देणारे आहे. त्यात काही बदल करावा, गुंतवणुकीसाठी अन्य पर्याय शोधावेत असा विचार प्रवाह गेल्या काही वर्षांपासून सुरू झाला आहे. या पर्यायात सध्या 'सार्वभौम संपत्ती निधी' अग्रभागी आहे.

१८/१२/२००७रोजी Prime Minister's Council on Trade & Industry ची बैठक झाली. या कौन्सिलमध्ये उद्योजकांचे अग्रणी उपस्थित होते. त्या बैठकीत ५ अब्ज डॉलर्सचा सार्वभौम संपत्ती निधी उभारण्याची शिफारस करण्यात आली. फेब्रु. २००८ च्या मध्याला अशी बातमी प्रसिध्द झाली की सार्वभौम संपत्ती निधी उभारण्याचा प्रस्ताव खुद्द पंतप्रधानांकडून आला असून २९ फेब्रु. रोजी बजेटमध्ये त्याची घोषणा होईल. १९ फेब्रुवारी २००८ रोजी ऊर्जा सल्लागार, नियोजन मंडळ म्हणाले, ''तेल, गॅस आणि कोळसा यांच्यासारख्या ऊर्जाविषयक मालमत्तेत जगभरात गुंतवणूक करण्यासाठी शासन काही अब्ज डॉलर्सच्या सार्वभौम संपत्ती निधी सुरू करण्याची योजना आखत आहे.'' २००८ च्या अंदाजपत्रकात त्यासंबंधी कोणतीही घोषणा झाली नाही. परंतु १५/४/२००८ रोजी वॉशिंग्टन येथे (International Capital Markets and Emerging Markets) भाषण करताना रिझर्व बँकेचे गव्हर्नर श्री. रेड्डी म्हणाले, ''भारताजवळील विदेशी चलन गंगाजळीतील काही भाग सार्वभौम संपत्ती निधी तयार करून त्याची 'जास्त जोखीम-जास्त उत्पन्न' तत्त्वावर जगभरात गुंतवणूक करता येईल. त्याच्या परिणामांचा सध्या अभ्यास करणे चालू आहे.'' या सगळ्या सकारात्मक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताचे अर्थमंत्री श्री. पी. चिदंबरम् यांनी २२/४/२००८ रोजी एका लेखी उत्तरात राज्यसभेत सांगितले, ''५ अब्ज डॉलर्सचा सार्वभौम संपत्ती निधी उभारण्याचा प्रस्ताव पंतप्रधानांच्या व्यापार व उद्योग परिषदेकडून आला होता. परंतु त्यासंबंधी कोणत्याही मार्गदर्शक सूचना अर्थमंत्रालयाला मिळालेल्या नाहीत. सध्या तरी असा निधी स्थापन करण्याची कोणतीही योजना शासनाची नाही.''

थोडक्यात भारताकडील वाढणाऱ्या विदेशी चलन गंगाजळीची गुंतवणूक वेगळ्या मार्गाने करण्याची चर्चा चालू आहे, निर्णय होणे बाकी आहे. असे असले तरी कळत नकळत भारताने या क्षेत्रात पदार्पण गेल्या वर्षीच केले आहे. २००७ च्या अर्थसंकल्पात विदेशी चलन साठ्यातील काही भाग वापरून पायाभूत सुविधा निर्मिती (Infrastructure Projects) करण्यास अनुमती घेण्यात आली होती. त्यानंतर Infrastructure finance

co. या संपूर्णपणे शासकीय मालकीच्या कंपनीची उपकंपनी लंडनमध्ये स्थापित करून तिच्यात ५ अब्ज डॉलर्स गुंतविण्यांचा निर्णय झाला. प्रत्यक्षात ह्या उपकंपनीने २५० दशलक्ष डॉलर्स रिझर्व बँकेकडून कर्जाऊ घेतले आहेत.

## सार्वभौम संपत्ती निधी म्हणजे काय?

अन्य देशांच्या चलनात शासनाने धारण केलेली मालमत्ता म्हणजे सार्वभौम संपत्ती निधी होय. ज्या देशांकडे आवश्यकतेपेक्षा जास्त विदेशी चलनसाठा असतो असे देश त्यापैकी काही भाग या निधीकडे वर्ग करतात. हा निधी म्हणजे एक स्वतंत्र अस्तित्त्व असलेली कंपनी असते. (Special Purpose Vehicle) ती मध्यवर्ती बँक अथवा अर्थमंत्रालय यांच्या प्रत्यक्ष अखत्यारित नसते तर तिचे व्यवस्थापन स्वतंत्र असते. अर्थात ती शासनाच्या संपूर्ण मालकीची असते. अन्य देशातील रोखे, भाग व वित्तीय पत्रांमध्ये गुंतवणूक करून थोडी जास्त जोखीम स्वीकारून थोडे जास्त उत्पन्न मिळविण्याचा त्यात हेतू असतो.

सार्वभौम संपत्ती निधी अन्य खाजगी कंपन्या अथवा हेज फंडस् यांचेबरोबर भागीदारीतही गुंतवणूक करतो. गुंतवणुकीसाठी अधिक कालमर्यादा डोळ्यासमोर ठेऊन व्यवहारवादी अधिक जोखीम व्यवस्थापन धोरण स्वीकारले जाते.

सार्वभौम संपत्ती निधी दोन प्रकारचे असतात. तेल किंवा वायू (Oil & Gas) यांच्या निर्यातीचा मुख्य स्त्रोत असलेले 'वस्तू फंड' हा पहिला प्रकार. अबू धाबी, कुवेत, नॉर्वे या देशांचे फंड या प्रकारात मोडतात. जेव्हा निर्यात वस्तूंच्या किंमती वाढल्याने एकदम अवाजवी नफा मिळतो तेव्हा त्याचे नीट व्यवस्थापन करून किंमती कमी झाल्यावर अथवा त्या वस्तूंची उपलब्धता कमी झाल्यावर उद्भवणाऱ्या परिस्थितीची तीव्रता कमी करण्यासाठी त्या निधीचा वापर करणे हा वस्तू फंडाचा मुख्य उद्देश असतो. अशा वस्तू फंडाशिवाय सार्वभौम संपत्ती निधीचा आणखी एक प्रकार असतो. ज्या देशांच्या चालू खात्यावर सातत्याने लक्षणीय आधिक्य असते ते देश विदेशी चलनाच्या साठ्यापैकी ठराविक रक्कम बाजूला काढतात आणि त्या रकमेची आंतरराष्ट्रीय बाजारात गुंतवणूक करून अधिक उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करतात.

थोडक्यात, तातडीने लागणाऱ्या विदेशी चलनापेक्षा जास्त विदेशी चलनाचा साठा असलेले व त्यात सतत वाढ होण्याची शक्यता असलेले देश अशा 'जास्तीच्या' साठ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सार्वभौम संपत्ती निधी सुरू करतात. या निधीकडे विदेशी चलनातील काही मालमत्ता वर्ग करून जरा अधिक जोखीम स्वीकारत अधिक उत्पन्न मिळविण्याचा त्यामागे हेतू असतो. अमेरिकेच्या बॉण्डस् मध्ये पैसे गुंतविण्याऐवजी ह्या निधीतील पैसा वेगवेगळ्या देशांच्या वेगवेगळ्या वित्तीय संलेखात (भाग, रोखे, बॉण्डस् इ.) गुंतविला जातो.

## सार्वभौम संपत्ती निधीचे जागतिक चित्र :

सुमारे १९५० पासून सार्वभौम संपत्ती निधी अस्तित्वात असले तरी जगभरातील त्यांची वाढ गेल्या दीड दशकात विशेष लक्षणीय आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे संशोधन विभागाचे संचालक श्री. सिमन जॉनसन यांच्या अंदाजानुसार जगात सध्या एकूण वीस देशात सार्वभौम संपत्ती निधी आहेत आणि आणखी सुमारे सहा देशांनी असे निधी सुरु करण्यात स्वारस्य दाखविले आहे.

१९९० मध्ये जगातील सर्व सार्वभौम निधीतील गुंतवणूक सुमारे ५०० बिलियन डॉलर्स होती. ती सध्या १० ट्रिलियन डॉलर्स आहे आणि २०१२ पर्यंत ती १० ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. पहिल्या वरच्या पाच सार्वभौम संपत्ती निधींकडे एकूण गुंतवणुकीच्या ७०% हिस्सा आहे. तेल व वायू निर्यात करणाऱ्या देशांच्या सार्वभौम संपत्ती निधीकडे सर्व निधींच्या एकूण मालमत्तेपैकी निम्मी मालमत्ता आहे. तक्ता तीनमध्ये सार्वभौम संपत्ती निधींची स्थिती दर्शवली आहे.

**तक्ता ३**

**सार्वभौम संपत्ती निधींची स्थिती**

| नाव | मालमत्ता * अब्ज डॉलर | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १. यूअेई - अबूधाबी इनव्हेस्टमेंट अॅथॉरिटी | ८७५.० | १९७५ |
| २. नॉर्वे गव्हर्नमेंट पेन्शन फंड - ग्लो बल | ३८०.० | १९९६ |
| ३. सिंगापूर जीएलसी | ३३०.० | १९८१ |
| ४. सौदी अरेबिया व्हेरियस | ३००.० | उपलब्ध नाही |
| ५. चायना इनव्हेस्टमेंट कार्पोरेशन | २००.० | २००७ |
| ६. कुवेत रिझर्व्ह फंड फॉर फ्यूचर जनरेशन्स | २५०.० | १९५३ |
| ७. सिंगापूर टेमसेक होल्डींग | १५९.२ | १९७४ |
| ८. लिबीया ऑईल रिझर्व्ह फंड | ५०.० | २००५ |
| ९. कतार इनव्हेस्टमेंट अॅथॉरिटी | ५०.० | २००५ |
| १०. अगेरिया फॉंड डी रेग्यूलेशन डेस रेसेटस् | ४२.६ | २००० |
| ११. यू. एस. अलास्का परमनंट फंड कार्पोरेशन | ३८.० | १९७६ |
| १२. ब्रूनेई : ब्रूनेई इनव्हेस्टमेंट अॅथॉरिटी | ३०.० | १९८३ |
| १३. इतर | १७१.४ | - |
| एकूण | २८७६.२ | - |
| यापैकी तेल व वायू यांच्याशी संबंधित | २१०३.४ | - |

**टीपा –** * नॉर्वे सोडून अंदाज

**Central Huijin Investment Co. सह

स्रोत – मॉर्गन अॅण्ड स्टॅन्ले.

मॉर्गन अॅण्ड स्टॅन्ले यांच्यानुसार चायना इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन या चीनमधील सार्वभौम संपत्ती निधीने ब्लॉक स्टोन या अमेरिकास्थित कंपनीच्या माध्यमातून भारतात सुमारे तीन अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. भारतात अशा तीन विदेशी सार्वभौम संपत्ती निधीने प्रवेश केला आहे. कपड्याच्या उद्योगातील आघाडीची कंपनी गोकलदास मध्ये ५०%, नागार्जुन कन्स्ट्रक्शन्समध्ये १४.५% भागभांडवल ब्लॉक स्टोनने गुंतविले आहे. भारती इन्फ्राटेलमध्ये सिंगापूर सरकारच्या 'टेमसेक' या सार्वभौम संपत्ती निधीचा सर्वात जास्त हिस्सा आहे.

**भारताचा सार्वभौम संपत्ती निधी का हवा?**

भारताच्या वाढत्या विदेशी चलन गंगाजळीमुळे भारताने सार्वभौम संपत्ती निधी सुरू करावा अशी मांडणी करणारा एक मोठा गट भारतात आहे. विदेशी चलन गंगाजळीचा मोठा साठा असणाऱ्या जगातील पहिल्या दहा देशांपैकी जपान आणि तैवान यांच्याबरोबरीने भारत हा तिसरा देश आहे की ज्याने अजून सार्वभौम संपत्ती निधी सुरू केलेला नाही.

भारताने सार्वभौम संपत्ती निधी सुरू करण्यासाठी खालील कारणे सांगता येतील.

१.आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदातील सततच्या आधिक्याने परकीय चलन गंगाजळीत वाढ होत आहे.

२.किमान जोखीम असलेल्या ठिकाणीच विदेशी चलन साठ्याची गुंतवणूक करण्यासंबंधी सध्या रिझर्व बँकेचा पारंपारिक दृष्टिकोन आहे.

३. परकीय चलन साठ्याच्या गुंतवणुकीवर त्यामुळे मर्यादित उत्पन्न मिळत आहे.

४.परकीय चलन साठ्याच्या गुंतवणुकीवर अधिक उत्पन्न मिळवून शासनाची राजस्व तूट कमी करण्याचा एक प्रयत्न म्हणून सार्वभौम संपत्ती निधीकडे पहायला हवं.

५. सार्वभौम संपत्ती निधी भारताच्या ऊर्जेची गरज भागविण्याकामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतो तसेच भारताच्या भौगोलिक, राजकीय आणि आर्थिक धोरणात सकारात्मक व पूरक काम करू शकतो.

६. स्थानिक निधी व्यवस्थापन उद्योगांना विदेशात गुंतवणूक करण्याविषयी प्रोत्साहन देण्याचे काम सार्वभौम संपत्ती निधी करू शकतो.

७. देशातील गंभीर पायाभूत सुविधांच्या गरजेसाठी सार्वभौम संपत्ती निधी पैसा उपलब्ध करून देऊ शकतो.

८. विदेशी चलनाच्या वाढत्या साठ्याने देशांतर्गत चलनात वाढ होते व त्यामुळे महागाईला आमंत्रण मिळते. परंतु हा साठा बाहेर गुंतविला तर महागाई चा फटका बसणार नाही. हे काम सार्वभौम संपत्ती निधीद्वारे करता येईल.

९.भारतात अन्य देशातील सार्वभौम संपत्ती निधींनी गुंतवणूक करायला सुरूवात केली आहे. तिचे नियंत्रण करणेसाठी अशा निधीच्या कार्यपध्दतीचा चांगला अनुभव हवा. भारताने सुरुवातीला थोड्या रकमेचा का होईना सार्वभौम संपत्ती निधी तयार केला, तर असा अनुभव त्याच्या कामकाजातून येऊ शकतो.

१०.जागतिक स्तरावर सार्वभौम संपत्ती निधींचे प्रशासन करण्यासंबंधी होणाऱ्या चर्चात भाग घेण्यासाठी भारताला असा स्वत:चा निधी तयार करायला हवा.

११.भारतात निवृत्ती निधीं (Pension funds) ची मालमत्ता एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या जवळपास

१५% आहे आणि ती वाढतच आहे. त्याची गुंतवणूक आंतरराष्ट्रीय स्तरावर करून काही जोखीम कमी करणे गरजेचे आहे. अशासाठी सार्वभौम संपत्ती निधीचा अनुभव उपयोगी ठरू शकेल.

थोडक्यात सध्या विदेशी चलन साठ्याची होणारी गुंतवणूक प्रामुख्याने अमेरिकेच्या प्रतिभूतींमध्ये केली जाते. अमेरिकन डॉलरचा घसरता विनिमय दर आणि लक्षणीयरित्या कमी होणारे व्याजदर यामुळे ही गुंतवणूक जोखमीची होत आहे. तसेच या गंगाजळीचा उपयोग पायाभूत सुविधांच्या विकासासाठी व्हावा व सार्वभौम संपत्ती निधीचा अनुभव असावा म्हणून भारताने असा निधी तयार करावा असे आग्रही प्रतिपादन काही जण करतात.

**पण भारतास खरोखरच सार्वभौम संपत्ती निधी हवा का?**

याचे उत्तर सायमन जॉनसन यांच्या पुढील वाक्याच्या आधारे शोधता येईल, "When a country, by running a current account surplus accumulates more reserves than it feels it needs for immediate purposes, it can create a sovereign wealth fund to manage the extra resources." सार्वभौम संपत्ती निधी सुरू करण्यासाठी त्याने दोन पूर्व अटी नमूद केल्या आहेत.

१. चालू खात्यावर आधिक्य होत राहणे आणि
२. देशाच्या गरजेपेक्षा जास्त विदेशी चलन गंगाजळी असणे.

या दोन आघाड्यांवरील भारताची स्थिती तपासून पहायला हवी. प्रथम आपण चालू खात्यावरील आधिक्याचा विचार करू. भारताची विदेशी चलन गंगाजळी वाढत असली तरी चालू खात्यावर आधिक्य क्वचितच दिसते. १९९१ पासून भारताच्या विदेशी चलन गंगाजळीत झालेल्या वाढीचा आढावा खाली दिला आहे.

**तक्ता क्र. ४**

**१९९१ पासून सप्टें. २००७ पर्यंत विदेशी चलन गंगाजळीच्या वाढीचे स्रोत** अब्ज डॉलर्स

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | विदेशी चलन साठा-३१/३/९१ रोजी | | ५.८ |
| ब-१ | चालू खात्यावरील शिल्लक | | -४५.७ |
| ब-२ | भांडवल खाते (नक्त i ते v) | | २६४.१ |
| | i)परकीय गुंतवणूक-पैकी | | १२९.८ |
| | | प्रत्यक्ष थेट गुंतवणूक | ४७.६ |
| | | विदेशी संस्थात्मक गुंतवणूक | ६१.८ |
| | ii) | अनिवासी भारतीयांच्या ठेवी | २९.५ |
| | iii) | बाह्य सहाय्य | १४.६ |
| | iv) | बाह्य वाणिज्य कर्जे(ECB) | ४८.० |
| | v) | भांडवली खात्यातील इतर खाती | ४२.२ |
| ब-३ | | मूल्यांकनातील बदल (Valuation Change) | २३.५ |
| | | एकूण (अ+ ब१+ ब२+ब३) | २७४.७ |

स्रोत- रिझर्व बँकेचा विदेशी चलन साठ्याचा अहवाल दि.२२/१/०८

तक्ता क्र. ४ वरून स्पष्टपणे दिसते की, १९९१ ते २००७ या जवळपास १६ वर्षात नक्त खात्यावरील तूट (आधिक्य नव्हे) ४५.७ अब्ज डॉलर्स इतकी प्रचंड आहे व ती वाढतच आहे. गेल्या दोन वर्षातील त्यातील वाढ खाली तक्ता नं. ५ मध्ये दाखविली आहे.

**तक्ता क्र. ५**

**विदेशी चलन साठ्याच्या वाढीचे स्त्रोत**(अब्ज डॉलर्समध्ये)

| तपशील | एप्रिल-डिसेंबर २००७ | एप्रिल-डिसें. २००६ |
|---|---|---|
| १. चालू खात्याची शिल्लक | -१६.० | -१४.० |
| २. भांडवली खाते | ८३.२ | ३०.२ |
| ३. मूल्यांकनातील बदल | ८.९ | ९.४ |
| एकूण (१+२+३) | ७६.१ | २५.६ |

स्त्रोत - रिझर्व बँकेचा विदेशी चलन साठ्याचा अहवाल दि. २२/१/०८.

भारतातील परकीय चलन गंगाजळीतील वाढ ही चीनसारखी चालू खात्यावरील आधिक्याने झालेली नाही. त्यामुळे ती वाढ म्हणजे नक्त बचत नव्हे. विदेशी गुंतवणूक व विदेशी कर्जामुळे चलन गंगाजळीतील वाढ आपली स्वत:च्या मालकीची नाही. गुंतवणूक आज ना उद्या परत जाणार तर कर्जाची परतफेड करावी लागणार. अशा स्थितीत या गंगाजळीतील काही रक्कम बाजूला काढून सार्वभौम संपत्ती निधीच्या माध्यमातून केवळ उत्पन्न वाढीसाठी ती जोखीम युक्त विदेशी भाग भांडवलात गुंतवणे शहाणपणाचे ठरेल का? म्हणूनच भारतीय अर्थमंत्रालयाने व रिझर्व बँकेने विदेशी चलन साठ्यातून सार्वभौम संपत्ती निधी तयार करण्याबाबत चिंता व्यक्त केली आहे.

दुसरी अट आहे देशाच्या गरजेपेक्षा जास्त विदेशी चलन गंगाजळी असली पाहिजे. भारताची विदेशी चलन गंगाजळी 'पुरेशी' तरी आहे का? हे ठरविण्यासाठी एक पारंपारिक मोजपट्टी आहे ती म्हणजे ही गंगाजळी आयातीच्या किती पट आहे? तक्ता क्र. ६ मध्ये तपशील दिला आहे.

**तक्ता क्र. ६ परकीय चलन साठ्याची आयातीशी तुलना**

| वर्ष | परकीय चलन साठा |
|---|---|
| ३१/१२/९० | ३ आठवड्याच्या आयाती इतका. |
| ३१/३/२००४ | १६.९ महिन्यांच्या आयाती इतका. |
| ३१/३/२००५ | १४.३ महिन्यांच्या आयाती इतका |
| ३१/३/२००६ | ११.६ महिन्यांच्या आयाती इतका |
| ३१/३/२००७ | १२.५ महिन्यांच्या आयाती इतका. |

स्त्रोत - विदेशी चलन गंगाजळीचा अहवाल, रिझर्व बँक दि. २२/१/०८

विदेशी चलन साठा पुरेसा आहे की नाही हे ठरविण्यासाठी परकीय कर्जांची येणाऱ्या एका वर्षात परतफेड करण्याची शक्यता पाहिली जाते. या दोन्ही बाबींचा विचार करून रिझर्व बँकेचे गव्हर्नर यांनी १५/४/२००८ रोजी वॉशिंग्टनमध्ये म्हटले की, ''सार्वभौम संपत्ती निधी असावा अशी बाजू भारतासाठी जरी मांडता येणारी असली तरी बदलत्या व्यवस्थेत साठा पुरेसा आहे किंवा नाही हे ठरविणे कठीण आहे आणि त्या आधारावर विदेशी चलन साठ्यातील काही रक्कम केवळ उत्पन्न वाढविण्यासाठी अधिक जोखीम असलेल्या प्रतिभूतींमध्ये गुंतविणे योग्य होणार नाही. भारताची देणी ही मालमत्तेपेक्षा अधिक असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची स्थिती नकारात्मक आहे.''

भारताची चालू खात्यावर स्थिती नकारात्मक आहे आणि विदेशी चलन साठा पुरेसा नाही. या दोन बार्बीशिवाय पुढील घटक ही सार्वभौम संपत्ती निधी तयार करण्याच्या विरोधात सांगता येतील.

१. देशांतर्गत अर्थव्यवस्थेत खूप मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. तसेच या गुंतवणुकीमुळे आर्थिक व सामाजिक मोठा लाभ होणार असतांना देशाबाहेर गुंतवणूक संधी का शोधावी?

२. रिझर्व बँक आणि तिच्या सहयोगी संस्था यांचेकडे विदेशी गुंतवणूक निधी व्यवस्थापनाची व बाजारपेठेचे योग्य सर्वेक्षण करण्याची क्षमता आहे का?

३. सार्वभौम संपत्ती निधीचे प्रशासन पारदर्शकतेने व पूर्ण जबाबदारीने केले जाण्याची खात्री देता येईल का?

४. भारताला राजकीय दबावापासून सार्वभौम संपत्ती निधी दूर ठेवता येईल का?

५.विदेशी व्यापारातील असमतोल, राजकोषीय सुधारणा, पायाभूत सुविधांचा विकास आणि मनुष्यबळ विकास यासारख्या अत्यंत निकडीच्या आव्हानांना बगल देऊन सार्वभौम संपत्ती निधी सुरू करावा का?

## समारोप :

भारताची मोठी परकीय चलनाची गंगाजळी आणि तिच्यात सतत होणारी वाढ तसेच विदेशी चलन गुंतवणुकीवर मिळणारे तुटपुंजे उत्पन्न यामुळे सार्वभौम संपत्ती निधी निर्माण करावा असा दावा काहीजण करत असले तरी भारताची चालू खात्यावरील तूट, राजस्व तूट, विदेशी मालमत्तेपेक्षा कितीतरी जास्त रकमेची विदेशी देणी ह्या चिंताजनक बाबी आहेत. भारताला कोणत्याही वस्तूंच्या निर्यातीतून घबाड मिळण्याची शक्यता नाही. तसेच देशात येणाऱ्या भांडवलात सातत्य राहण्याचीही खात्री नाही. शिवाय अशा संपत्ती निधीच्या व्यवस्थापन कौशल्याची हमी नाही. अशा स्थितीत भारताने घाईगर्दीने सार्वभौम संपत्ती निधीकडे वळणे योग्य ठरणार नाही. सध्या जगभरातील अशा निधींवर लक्ष ठेवणे, त्यांच्या प्रशासनासाठी चालू असलेल्या चर्चेत सक्रीय सहभाग घेणे व आपल्या देशात गुंतवणूक करणाऱ्या इतर देशांच्या सार्वभौम संपत्ती निधींवर बारकाईने नजर ठेवणे इतकेच करायला हवे.

## संदर्भ :

1. IMF : Global Financial Stability Report
2. Sir Andreu Large( Jan. 2008) : Report of U.K. Hedge Fund Working Group.
3. Sir David Walker (Nov. 2007) : Report of the Private Equity Working Group on Transparancy and Disclosure.
4. Finance & Development - Sept. 2007 (IMF Quarterly)
5. DNA Money 1/5/2008
6. RBI Monthly Bulletin May 2008
7. Report on 'Capital Markets & Emerging Markets Roundtable' held on 15/4/2008 in Washington D.C.

# स्वयंसहाय्यता गट : ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन मार्ग

**जे.बी. मोरे**
प्रपाठक, वाणिज्य विभाग
संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय,
मुक्ताईनगर जि. जळगांव.

**बी.एल. महाजन**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय,
मुक्ताईनगर जि. जळगांव.

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारताचा विकास करावयाचा असेल तर खेड्यापासून सुरूवात केली पाहिजे. स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन केल्यामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलन होवून विकास करता येतो. तसेच ग्रामीण भागातील महिलांचा विकास होण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे. तसेच ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंब विचारात घेणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील महिला कार्यक्षम असूनही त्या चूल व मूल सांभाळणे ही कार्ये करतांना दिसून येतात. ग्रामीण क्षेत्रात भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. शेती, जनावरे सांभाळणे, मुलांचे संगोपन व देखभाल करणे, स्वयंपाक करणे, सरपण जमा करणे, साफसफाई करणे ही कार्ये ग्रामीण भागातील महिला करीत असतात. तसेच कमी शिक्षण, तंत्र व कौशल्य यांचा अभाव, पारंपारिक व घरगुती मर्यादा, पुरूष प्रधान संस्कृती इ. कारणांमुळे ग्रामीण भागाच्या विकासासाठी स्त्रीशक्ती वापरात आणता येत नाही.

शासनाच्या पुढाकाराने १ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SGSY) हा महत्त्वपूर्ण सर्वांगीण विकास कार्यक्रम तसेच दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमात स्वयंसहाय्य बचत गट तयार करणे, त्यांना स्वयंरोजगारासाठी सर्वतोपरी मदत व सहाय्य करणे या बाबी अंतर्भूत आहेत. या योजनेसाठी केंद्र सरकार व

राज्य सरकार यांच्याकडून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. त्याचे प्रमाण अनुक्रमे ७५:२५ असे आहे.

ग्रामीण भागातील महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे उत्पन्न वाढवून त्यांचा विकास करण्यासाठी, महिलांच्या सक्रीय सहभागातून गावाचा विकास घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रात महिला बचत गट निर्माण होत आहेत. तो स्वयंसहाय्य बचत गट हा स्वयंसहाय्यता समूह, शेजार गट अशा नांवाने लोकप्रिय झालेला दिसून येतो. महिला एकत्र येवून त्यांची एकजूट यामुळे महिला बचत गट यशस्वी होताना दिसून येत आहेत. महिलांच्या एकजुटीतून निर्माण होत असलेल्या महिलांच्या सामूहिक शक्तीचा, शक्तीतून युक्तीचा म्हणजे स्वत:मधील अंगभूत गुणांचा झालेला साक्षात्कार आणि या साक्षात्कारातून स्वयंपूर्णतेचा शोध घेवून स्वबळावर हिमतीने, धैर्याने उभे राहण्याची मिळविलेली ताकद असे समर्थ महिला शक्तीचे प्रत्यंतर महिला बचत गटाद्वारे दिसून येते.

बचत करणे हा महिलांचा स्थायीभाव आहे. ''रूपयामधून दोन पैसे कसे बचत करावे हे केवळ महिलांकडून शिकावे'' असे म्हटले जाते. पैशाची बचत करणे म्हणजे पैसे कमविणे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

महिलांच्या हातात जोपर्यंन्त आर्थिक बाबींचे नियंत्रण येत नाही, तोपर्यंत महिलांना त्यांच्यासाठी होणाऱ्या विविध उपक्रमांना बळ प्राप्त होणार नाही. असे बळ प्राप्त करण्यासाठी महिलांनी बचत गट माध्यमाद्वारे उद्योग व्यवसायाचा मार्ग स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे.

महिला बचत गटाच्य फक्त महिलाच सभासद असतात. महिला सभासदाकडून दरमहा समप्रमाणात वर्गणी जमा केली जाते. बचत गटाचे किमान १० व कमाल २० सभासद वेगवेगळ्या कुटुंबातील असतात. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव या पदावरील सभासद नियमितपणे दरवर्षी बदलत असल्यामुळे सर्व सभासदांना आळीपाळीने या पदावर काम करण्याची संधी मिळते. तसेच आपली जबाबदारी व कर्तव्ये यांची जाणीव प्रत्येक सभासदास राहते. महिला बचत गटाच्या दर महिन्याला होणाऱ्या सभेला पूर्व संमतीशिवाय गैरहजर राहणाऱ्या सभासदांकडून दंड वसूल करण्यात येतो.

महिलांच्या गुण वैशिष्टयांचा विचार करतांना महिला प्रामाणिक, विश्वासू, समजूतदार, भावनाप्रधान, तसेच निष्ठावान आणि प्रसंगी कठोर दिसून येतात. मनापासून काम करणे, नीटनेटकेपणा, अचूकता, वक्तशीरपणा, पूर्ण कार्यक्षमतेने काम करणे, काटकसर, नेमकेपणा तसेच एकमेकांना समजून घेण्याची विलक्षण क्षमता अशी वैशिष्ट्ये दिसून येतात. महिला बचत गटात कमाल संख्येवर मर्यादा असल्यामुळे एकाधिकारशाहीवरही बंधने येतात. महिला बचत गटात अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या पदावर आळीपाळीने प्रत्येक सभासदांना काम करण्याची संधी प्राप्त होते. त्यामुळे हेवेदावे, वैमनस्य असे प्रकार दिसून येत नाहीत. एकमेकांना समजून घेणे, एकमेकांचे विचार समजून घेणे, मोकळेपणाने चर्चा करणे शक्य होते. बचत गट महिलांना स्वत:चा व सामूहिक विकास करण्याचे एक साधन आहे. तसेच महिलांना स्वयंपूर्ण करण्याचा एक मार्ग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्वयंसहाय्यता गट हे महिला, पुरूष, महिला व पुरूष यांचे असतात. परंतु गटातील सदस्य दारिद्र्य रेषेखालील आहेत. त्यांना अनुदान दिले जाते. साधारणपणे महिला बचत गट जास्त दिसून

येतात.

**स्वयंसहाय्य समूह/गट :**

आर्थिक पातळी समान असलेल्या ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील गरीब महिला पुरूष एकत्र येवून लहान गट स्थापन करतात आणि सर्वांच्या किंवा समूहाच्या निर्णयानुसार नियमित बचत करून जमा झालेल्या निधीतून समूहातील सभासदांना कर्ज देण्याचे ठरविण्यात येते. त्यानुसार सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण केल्या जातात. त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रश्न चर्चा करून आणि योग्य अशा सहभागात्मक निर्णयाद्वारे सोडविले जातात. अशा समूहाला स्वयंसहाय्य गट/समूह संबोधले जाते.

स्वयं इच्छेने स्वयंस्फूर्तीने ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील १० ते २० सभासद एकत्र येतात. या सर्व सभासदांच्या बचतीतून जमा झालेल्या निधीतून गरजू सभासदांना आर्थिक सहाय्य करणे व स्वत:ची बीज भांडवल पत तयार करणे. महिलांची संघटीत शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी महिला सभासदांनी स्थापन केलेल्या गटाला स्वयंसहाय्य गट म्हणतात.

**स्वयंसहाय्य बचत गटाची वैशिष्टचे :**

१.या गटातील सर्व सदस्य दारिद्र्य रेषेखालील असतात. त्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी आर्थिक सहाय्य किंवा मदत या गटाद्वारे केली जाते.
२.सदर गटासाठी किमान १० कमाल २० सदस्य असावे. प्रत्येक कुटुंबातील केवळ एक सदस्य असावा आणि बचत गटाचे सर्व सदस्य एकाच गांवातील असले पाहिजेत.
३.गटाचे सभासद होण्यासाठी सक्ती केली जात नाही. सभासद स्वयंप्रेरणेने व स्वयंइच्छेने होता येते.
४.गटाचा कारभार लोकशाही पध्दतीने केला जातो. सर्व सभासदांचा समान सहभाग असतो. गटाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या पदांवर प्रत्येक सभासदांना आळीपाळीने काम करावे लागते. गटामध्ये शिस्त आवश्यक असते.
५.गटाच्या सदस्यांकडून बचतीची नियमित समान रक्कम स्वीकारून सामूहिक निधी निर्माण केला जातो. गटातील सर्व सभासदांना सामूहिक निधीत समान सहभाग असतो.
६.गटाची नोंदणी करणे सक्तीचे नाही.
७.गटातील सभासदांना सावकारी कर्जातून मुक्त करणे या कारणांसाठी त्यांना कर्ज दिले जाते. गटाच्या कर्जावरील व्याजदर दरमहा साधारणत: २% ते ३% असतो.
८.गटातील सभासद त्यांच्या बचतीद्वारा स्वयं भांडवल निर्माण करून त्याद्वारा बँकेकडून सभासदांना व्यक्तीगत व सामूहिक कर्ज उपलब्ध करून दिले जाते.
९.गटाची दर महिन्याला किमान एक सभा घेणे आवश्यक आहे. सर्व सभासदांच्या संमतीने सभेची वेळ व स्थळ निश्चित केले पाहिजे. सर्व सभासदांनी सभेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. पूर्व संमतीने सभासदाला एखाद्या सभेला गैरहजर राहता येते. गटाच्या विकासाचे निर्णय सभेत घेतले जातात.
१०.सर्व सभासदांच्या संमतीने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अंतर्गत नियमावली तयार करावी. त्यामधील नियमांचे सर्व सभासदांनी पालन करावे.
११.सर्व सभासदांच्या संमतीने गटाचे व्यवहार, निर्णय व कार्य केले जाते. बचत, कर्ज व इतर व्यवहार रोखीने केले जातात. त्यामुळे गटाच्या कार्यात पारदर्शकता दिसून येते.
१२.स्वयंसहाय्यता बचत गटात सहकार प्रवृत्ती दिसून येते.

**अभ्यासाचे उद्देश(Objectives of the Study):**

स्वयंसहाय्यता बचत गट दारिद्र्य

रेषेखालील कुटुंबातील सभासदांचे दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी आर्थिक मदत करणे आणि त्यांचे उत्पन्न वाढविणे या मुख्य उद्देशांसाठी स्थापन केले जातात. इतर उद्देश पुढीलप्रमाणे –

१. बचत गट सभासदांना सावकारांकडून घेतलेले कर्ज परत करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.

२.ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सूक्ष्म वित्त संस्था स्थापन करणे.

३.महिलांचे बचत गट स्थापन करून ग्रामीण विकासात महिलांना सहभागी करून घेणे.

४.गटाने बचत केलेली रक्कम आर्थिक समस्या सोडविण्यासाठी वापर करणे, सभासदांचे उत्पन्न वाढविणे, त्यांना बचतीची सवय लावणे.

५.स्थानिक व सामाजिक समस्या गटाच्या मदतीने सोडविणे.

## गृहीतके (Hypothesis) :

दारिद्र्य निर्मूलन व ग्रामीण विकास कार्यक्रमात स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका महत्त्वाची आहे.

## माहिती संकलन(Collection Of Data) :

प्राथमिक माहिती बँक व्यवस्थापक, अधिकारी, विस्तार अधिकारी, तसेच गटाचे पदाधिकारी व सदस्यांशी चर्चा करून व मुलाखती द्वारा संकलित केली. त्याचप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँक मार्गदर्शिका व स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, जर्नल, योजना मासिक, वर्तमानपत्रे आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) यांच्याकडून सांख्यिकीय माहिती संकलित केली.

## अभ्यासाची व्याप्ती (Scope the Study)

स्वयंसहाय्यता बचत गटाची व्याप्ती संपूर्ण भारतात असली तरी अभ्यासाच्या सोयीसाठी जळगांव जिल्हा अशा मर्यादित क्षेत्राची निवड केली.

## अभ्यासाची मर्यादा(Limitations of the Study):

कालमर्यादेमुळे स्वयंसहाय्यता बचत गटाच्या अभ्यासासाठी जळगांव जिल्ह्याची निवड केली.

**तक्ता क्र.१**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

जळगांव जिल्ह्यातील वर्षनिहाय स्वयंसहाय्यता बचत गटांची माहिती

| | १९९९-२००० | २०००-२००१ | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण स्थापन गट | ११२७ (२०.६०%) | ७१४ (१३.०५%) | २३४ (४.२८%) | ३७५ (६.८६%) | ६६० (१२.०७%) | १२७२ (२३.२५%) | १०८८ (१९.८९%) | ५४७० (१००%) |
| लाभ दिलेले एसएचजी | ० | ४२ (५.८८%) | ९८ (४१.८८%) | २३४ (६२.४%) | ३१७ (४८.०३%) | ३८४ (३०.१९%) | ४३२ (३९.७१%) | १५०७ (२२८.०९) |
| वाटप अनुदान (सरासरी अनुदान) रूपये लाख | ०.०० | ४७.०५ (१.१२) | १२२.५४ (१.२५) | २४९.५४ (१.०६६) | ३२५.५२ (१.०२६) | ३७६.२५ (०.९७९) | ४१६.९१ (०.९६५) | १५३७.८१ (६.४०६) |
| लाभ दिलेले वैयक्तिक स्वयंरोजगारी | ३७०३ | १७६६ | ३२४० | ८१४ | ७६६ | ६४० | ८११ | १७१४० |
| वाटप अनुदान (सरासरी अनुदान) रूपये लाख | २६२.२० (०.०७) | ५९९.८८ (०.०८३) | ३१५.७३ (०.०९७) | ७०.८१ (०.०८६) | ९३.९६ (०.१२२) | ९६.०१ (०.१५०) | ९८.४६ (०.१२१) | १५३७.०५ (०.७२९) |

(Source : DRDA Office, Jalgaon)

**जळगांव जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गट (SHG in Jalgaon District):**

जळगांव जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटाचा अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यातील बचत गटाची माहिती वरील तक्त्यात दिलेली आहे.

स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना १९९९ पासून सुरू झाली. त्याच वर्षी म्हणजे १९९९-२००० मध्ये जळगांव जिल्ह्यात ११२७ स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना झाली. २०००-२००१ यावर्षी ७१४, २००१-२००२ मध्ये २३४, २००२-२००३ या वर्षी ३७५, २००३-२००४ यावर्षी ६६० बचत गटांची स्थापना झाली.

यावरून असे दिसून येते की, स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना सुरूवातीला चांगली झाली नंतर कमी-कमी झालेली दिसून येते. याच्या कारणांची विचारणा केली असता, त्यांचे कारण म्हणजे लोकांना बचत गटाची मागणी पुरेशी नसल्यामुळे बचत गट स्थापना संख्या कमी झाली. नंतर स्वयंसहाय्यता गटाचे महत्त्व व गरज याची माहिती होत गेली व गट संख्या वाढत गेली.

२००४-२००५ यावर्षी १२७२ स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना झाली. नंतर २००५-२००६ या वर्षी बचत गट स्थापना कमी झाली. ती १०८८ इतक्या बचत गटांची स्थापना झाली. जळगांव जिल्ह्यात २००५-२००६ अखेर ५४७० बचत गटांची स्थापना झाली.

१९९९-२००० यावर्षी स्वयंसहाय्यता गटांना लाभ दिलेला नाही. परंतु २०००-२००१ यावर्षी ७१४ पैकी ४२ स्वयंसहाय्यता गटांना लाभ दिला. त्यांना ४७.०५ लाख रूपये अनुदान वाटप केले. सरासरी १.१२ लाख रूपये वाटप करण्यात आले. २००१-२००२ मध्ये २३४ गटापैकी ९८ गटांना अनुदानाचा लाभ झाला. त्यांना १२२.५४ लाख रूपये अनुदान वाटप करण्यात आले. त्यांना सरासरी १.२५ लाख रूपये वाटप करण्यात आले. २००२-२००३ या वर्षात ३७५ स्थापन झालेल्या गटापैकी २३४ गटांना अनुदानाचा लाभ मिळाला. त्यांना रूपये २४९.५४ लाख अनुदान वाटप करण्यातआले. २००३-२००४ मध्ये ६६० स्थापन झालेल्या गटापैकी ३१७ स्वयंसहाय्यक बचत गटांना अनुदानाचा लाभ झाला. त्यांना रूपये ३२५.५२ लाख अनुदान वाटप करण्यात आले. २००४-२००५ वर्षी १२७२ गटापैकी ३८४ गटांना अनुदान वाटप करण्यात आले. त्यांना ३७६.२५ लाख रूपये अनुदान मिळाले. २००५-२००६ मध्ये १०८८ गटापैकी ४३२ गटांना अनुदानाचा लाभ झाला. तर जळगांव जिल्ह्यातील ५४७० स्थापन झालेल्या बचत गटापैकी १५०७ गटांना अनुदान प्राप्त झाले. त्यांना रूपये १५३७.८१ लाख अनुदान वाटप करण्यात आले. जिल्ह्यातील २७.५५% बचत गटांना सरासरी रूपये १.०२ लाख अनुदान मिळाले.

१९९९-२००० या वर्षात ३७०३ वैयक्तिक स्वयंरोजगारींना अनुदानाचा लाभ झाला त्यांना रूपये २६२.२० लाख अनुदान वाटप करण्यात आले. प्रत्येकी सरासरी रूपये ७,००० अनुदान वाटप करण्यात आले. २०००-२००१ वर्षी ७१६६ व्यक्तीगत स्वयंरोजगारी रूपये ५९९.८८ लाख अनुदान वाटप करण्यात आले. सरासरी रूपये ८,३०० अनुदान वाटप झाले. २००१-२००२ या वर्षात ३२४० वैयक्तिक स्वयंरोजगारींना रूपये ३१५.७३ लाख अनुदान वाटप करण्यात आले. ते प्रत्येकी सरासरी रूपये ९७०० होते २००२-२००३ या वर्षात ८१४ वैयक्तिक स्वयंरोजगारींना रूपये ७०.८१ लाख अनुदान वाटप करण्यात आले. ते प्रत्येकी सरासरी रूपये८,६०० होते. २००३-२००४ या वर्षात ७६६ व्यक्तीगत स्वयंरोजगारींना रूपये

९३.९६ लाख वाटप करण्यात आले. त्याचे सरासरी प्रमाण रूपये १२,२०० इतके होते. जळगांव जिल्ह्यातील २००५--२००६ पर्यंत एकूण १७,१४० व्यक्तीगत स्वयंरोजगारांना रूपये १५३७.०५ लाख अनुदान वाटप करण्यात आले. त्याचे सरासरी प्रमाण रूपये ८,९०० असे होते.

वरील माहितीवरून असे दिसून येते की, स्वयंसहाय्यक बचत गटाची स्थापना होवून संख्या वाढत आहे. त्याद्वारा दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गटाची स्थापना करून त्यांना स्वयंरोजगार प्राप्त होवून त्यांचे उत्पन्न वाढत आहे. तसेच शासनाकडून त्यांना अनुदान वाटप केले जात आहे. ते ग्रामीण विकासात सक्रीय सहभाग घेत आहेत. म्हणजे बचत गट दारिद्र्य निर्मूलन व ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## समस्या व शिफारशी (Problems & Suggestions):

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी स्वयंसहाय्यता गटांची स्थापना केली जाते. तसेच आज दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यात येतात. स्वयंसहाय्यता गटाचे सदस्य स्वत:च्या व्यक्तीगत व सामूहिक गरजा गटाद्वारे पूर्ण करतात.

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. उदा. आजारपण, मुलींचे लग्न, मुलांचे शिक्षण, सण, उत्सव यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. यासारख्या पारंपारिक समस्या या कुटुंबांना जबाबदारी म्हणून पूर्ण कराव्या लागतात आणि त्यासाठी त्यांना पैशाची गरज असते. बँका व वित्तीय संस्था या कारणांसाठी आर्थिक मदत देत नाहीत. अशावेळी या कुटुंबांना पैशाची गरज निर्माण होते. तेव्हा ते सावकाराकडे जावून कर्ज घेतात. त्यासाठी वार्षिक २५ ते ५० टक्के व्याज द्यावे लागते. असे कर्ज ते लवकर परतफेड करू शकत नसल्यामुळे व्याज दिवसेंदिवस वाढत जाते. अशा परिस्थितीत स्वयंसहाय्यता गट या कुटुंबांना कर्जाची परतफेड करण्यासाठी व सावकाराच्या मगरमिठीतून मुक्त करण्यासाठी वित्तीय मदत करतात.

ग्रामीण भागातील महिलांना सक्रीय हातभार लावून त्यांचे गट स्थापन करून, त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यास मदत करून देशाच्या विकासात त्यांना सहभागी करून घेतात. अशा प्रकारे स्वयंसहाय्यता गट दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी, ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सूक्ष्म व्यवसाय सुरू करतात. असे असले तरी स्वयंसहाय्यता गटांना पुढील समस्यांना तोंड द्यावे लागते.

**१.साक्षरतेचे प्रमाण कमी** – आज देखील ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. तसेच स्वयंसहाय्यता गट ग्रामीण भागात महिलांद्वारे चालविले जात आहेत. परंतु ग्रामीण भागात महिलांचे साक्षरतेचे प्रमाण फार कमी आहे. स्वयंसहाय्यता गटांना मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्य करावे लागते, हिशेब ठेवावे लागतात, योजनांचा अभ्यास करून त्यांची कार्यवाही करावी लागते. बँकासंबंधी कार्य करणे. बँकाचे व्यवहार इंग्रजीमध्ये असतात यामुळे गटाचे महिला सदस्य साक्षर नसल्यामुळे त्यांना अनेक प्रश्न निर्माण होतात.

**२.कर्जासंबंधी कागदपत्रे** – स्वयंसहाय्यता बचत गटांना बँकाकडून कर्ज मंजूर करून घेण्यासाठी विविध कागदपत्रे आवश्यक असतात. परंतु गटांचे सदस्यांना अशी कागदपत्रे जमा करणे फार त्रासाचे होते. त्यांना पुरेशी कागदपत्रे सादर केली नाहीत तर कर्ज मंजूर केले जात नाही.

**३.वेळेत पूर्वीच्या कर्जाची परतफेड** – गट सदस्यांनी किंवा गटाने पूर्वीचे कर्ज बँका किंवा वित्तीय संस्थाकडून घेतले असेल; त्याची परतफेड वेळेत केली नसेल तर त्यांना कर्ज मिळत नाही. म्हणजे सभासदांना किंवा गटाला कर्ज घ्यावयाचे असल्यास कर्जाची वेळेत परतफेड केलेली असावी. तरच त्यांना कर्ज मिळते.

**४.सामूहिक निधीची रक्कम** – विशिष्ट कालावधीनंतर सभासदांकडून गटासाठी बचत रक्कम सामूहिक निधीसाठी जमा केली जाते. सर्वसाधारणपणे दर महिन्याच्या सभेपूर्वी सामूहिक निधीची रक्कम जमा केली जाते. परंतु काही सदस्य त्यांच्या वैयक्तिक व घरगुती समस्यामुळे ही रक्कम देवू शकत नाहीत. त्यामुळे गटाला अंतर्गत कर्ज देतांना अडचणी निर्माण होतात.

**५.विपणनातील समस्या** – गटाच्या सदस्याजवळ योग्य प्रकारचे विपणनाचे कौशल्य नसल्यामुळे ते त्यांच्या मालाची योग्य प्रकारे विक्री करू शकत नाहीत. तसेच मालाची योग्य प्रकारे बांधणी करता न येणे, चांगल्या प्रकारे जाहिरात व प्रसिध्दी न करणे या कारणामुळे गटाचे सदस्य त्यांच्या मालाची विक्री योग्य प्रकारे करू शकत नाहीत.

**६.पारंपारिक व जुन्या तंत्राचा वापर** – स्वयंसहाय्यता गटाजवळ किंवा सभासदांजवळ नवीन तंत्र वापरण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल नसल्यामुळे ते पारंपारिक व जुन्या तंत्राचा वापर करतात. तसेच पारंपारिक व जुने तंत्र वापरत असल्यामुळे गुणात्मक वस्तुचा पुरवठा करू शकत नाहीत.

**७.बँकांचे NPA प्रमाण वाढते** – बँकांनी जे गटांना व सदस्यांना कर्ज दिलेले असते. ते बँकांना पुरेशा प्रमाणात कर्ज परतफेड करीत नाहीत. त्यामुळे बँकांच्या बुडीत मालमत्तेत वाढ होते. त्यामुळे बँका गट व त्यांच्या सभासदांना कर्ज देण्यास नाखुश असतात.

**अशा प्रकारे स्वयंसहाय्यता बचत गटात वरील समस्या दिसून येतात. त्या समस्या सोडविण्यासाठी पुढील सूचना व शिफारशी विचारात घ्याव्यात.**

**१.साक्षरतेचे प्रमाण वाढविणे** – स्वयंसहाय्यता गटाच्या कार्यात निरक्षरतेमुळे अनेक समस्या निर्माण होतात. यासाठी शासनाने व गटाने ग्रामीण भागातील लोकांना व सदस्यांना साक्षर करण्यासाठी प्रौढ साक्षर वर्ग सुरू करावे.

**२.आवश्यक कागदपत्रांचीच मागणी** – बँकांनी स्वयंसहाय्यता गटांचे कर्ज मंजूर करतांना आवश्यक कागदपत्रांचीच मागणी करावी की, जी कागदपत्रे आवश्यक आहेत आणि सदस्य ती कागदपत्रे सहज मिळवू शकतील असे असावे.

**३.ज्यादा कर्ज मंजूर करावे** – बँकांना स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदांसाठी पूर्वीचे कर्ज असले तरी ज्यादा कर्ज मंजूर करावयाचे अधिकार द्यावे जेणेकरून ते त्यांचे व्यक्तिगत व घरगुती प्रश्न सोडवू शकतील. यासाठी त्यांची परतफेड क्षमतादेखील विचारात घ्यावी.

**४.सामूहिक निधीची रक्कम जमा करण्याची मुदत** – सभासदांना त्यांच्या वैयक्तिक व घरगुती समस्यांमुळे विशिष्ट मुदतीत सामूहिक निधीची रक्कम भरता येणे शक्य होत नाही. यासाठी गटाने सभासदांना किमान एक महिन्यापर्यंत मुदत देवून सामूहिक निधीची हिस्सा भरण्यासाठी द्यावा. त्यामुळे सभासद पुढील महिन्यात निधी जमा करतील.

**५.कर्ज वापरण्यावर कडक नियंत्रण** – स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदांना जे कर्ज वाटप करण्यात आले आहे ते ज्या कारणासाठी दिले आहे.

त्याच कारणासाठी त्याचा वापर होत आहे किंवा नाही यावर कडक नियंत्रण असावे; तसेच ते कर्ज योग्य मुदतीत परत करतात किंवा नाही यावरही नियंत्रण असावे. जर अशा प्रकारे कर्ज वापरण्यात येत नसेल तर एकरकमी कर्ज वसूलीची तरतूद करावी.

**६.विपणनाचे प्रशिक्षण द्यावे** – स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदांना त्यांच्या वस्तू व माल विक्री करावयाचे प्रशिक्षण द्यावे तसेच त्यांच्याकडून मालाची विक्री करताना कोणत्या समस्या येतात त्या समस्या सोडवाव्या किंवा त्यांनी तयार केलेल्या वस्तू विक्री साठी स्वतंत्र व्यवस्था करावी.

**७.नवीन तंत्र उपलब्ध करून द्यावे** – शासनाने किंवा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारा स्वयंसहाय्यता गटांना हप्ते पध्दतीने किंवा भाडे खरेदी पध्दतीने नवीन तंत्र व मशिनरी उपलब्ध करून द्यावे. तसेच नवीन तंत्र वापरावयाचे प्रशिक्षण द्यावे.

**८.हंगामी वस्तूंचे उत्पादन करावे** – गटाच्या सभासदांनी हंगामी वस्तूंचे उत्पादन करावे. त्या वस्तूंची विक्री ग्रामीण भागात करावी. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारा जिल्हा पातळीवर त्या वस्तू विक्री करण्याची व्यवस्था करावी. तसेच जिल्हा किंवा राज्य पातळीवर प्रदर्शने आयोजित करावी. त्याचप्रमाणे मॉल दुकाने सुरू करून गटांच्या सदस्यांद्वारा मालाची विक्री करावी.

**निष्कर्ष :**

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या समस्या स्वयंसहाय्यता गटाद्वारे सहकार्यातून सोडविल्या जातात. त्यामुळे गटांच्या सभासदांचे उत्पन्न वाढून त्यांच्या स्वयंरोजगारीत वाढ होते. शेतीवर आधारित सूक्ष्म किंवा लहान संस्था स्थापन कराव्यात, हंगामी वस्तूचे उत्पादन करावे, औषधी वनस्पतीची लागवड करावी, केळीच्या खोडापासून धागा तयार करावा, वूलन पासून स्वेटर तयार करावे तसेच तेलबियांची लागवड करावी आणि गटाच्या सभासदांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. अशा प्रकारे स्वयंसहाय्यता गट ग्रामीण भागाचा विकास करतात व दारिद्याचे उच्चाटन करतात. तसेच स्वयंसहाय्यता गट स्थानिक पातळीवर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व व्यक्तीगत समस्या सोडविण्यासाठी गरजेचे आहेत.

**संदर्भ :**

१.स्वयंसहाय्य बचत गट मार्गदर्शिका – दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा.
२.मार्गदर्शिका पुस्तिका – जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगांव.
३.इंटरनेट वरील माहिती.

# मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तराची अधोगती

**रामकृष्ण एस. सोळुंके**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**दीपक एम. भारती**
अधिव्याख्याता व विभागप्रमुख,अर्थशास्त्र विभाग,
श्री. मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर जि. औरंगाबाद.

## प्रास्ताविक :

स्त्री-पुरूष गुणोत्तर हे स्त्रियांचा सामाजिक दर्जा जाणून घेण्याचा महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो. त्याचप्रमाणे ०-६ वयोगटातील दर १००० मुलांमागील मुलींच्या संख्येवरून समाजाचा मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधोरेखित होतो. भारतासारख्या विकसनशील देशात मोजक्या राज्यांचा अपवाद वगळता उर्वरित राज्यांमध्ये स्त्री-पुरूष गुणोत्तराची स्थिती फारशी समाधानकारक दिसत नाही. महाराष्ट्रदेखील यास अपवाद ठरत नाही. या समस्येबाबत महाराष्ट्रातील मुंबई या आर्थिक क्रियांचे केंद्र असणाऱ्या शहरांकडे राज्यातील उर्वरित भागातून व इतर राज्यामधून पुरूष लोकसंख्येच्या होणाऱ्या स्थलांतराचा प्रभाव महाराष्ट्राच्या स्त्री-पुरूष गुणोत्तरावर निश्चित जाणवतो. असे असले तरी महाराष्ट्रातील मराठवाड्यासारख्या आर्थिक-सामाजिक दृष्टीने उर्वरित विभागांच्या मागे असणाऱ्या विभागातील स्त्री-पुरूष गुणोत्तर देखील सातत्याने विषम बनत असल्याचे आढळते. गेल्या १०० वर्षामध्ये आणि विशेषत: अलीकडच्या काही दशकांपासून भारतीय लोकसंख्येतील अधोगतीस जाणारे स्त्री-पुरूष गुणोत्तर हा चिंतन आणि संशोधनाचा विषय बनलेला आहे. स्त्री-पुरूष गुणोत्तरातील सातत्याने होणारी घट ही राष्ट्रीय पातळीप्रमाणेच राज्य व विभागीय पातळीवर अनुभवास येत आहे. यास मराठवाडा सुध्दा अपवाद ठरत नाही. मराठवाडा हा सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा लाभलेला विभाग आहे. पूर्वीपासूनच मागासलेला विभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्यासमोर अनेक आर्थिक प्रश्न उभे असतांना दुसऱ्या बाजूने

मराठवाड्यातील लोकसांख्यिकीय संक्रमणात काही नवीन प्रश्न आपली उपस्थिती दर्शविताना दिसतात. यातील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मराठवाड्यातील सातत्याने अधोगतीस जाणारे स्त्री-पुरूष गुणोत्तर होय.

१ मे १९६० पासून मराठवाडा हा महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाला व या नवीन भौगोलिक आणि राजकीय एककाचा भाग म्हणून मराठवाड्याची नवीन ओळख निर्माण झाली. तेव्हापासून म्हणजे १९६१ पासून २००१ पर्यंतच्या ४० वर्षांच्या कालखंडात मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरात कमालीची अधोगती दिसून येते. या ४० वर्षांच्या कालखंडात मराठवाड्याच्या स्त्री-पुरूष गुणोत्तरात २४ बिंदूंची उल्लेखनीय घट झाल्याचे लक्षात येते.

## अभ्यासाची उद्दिष्टये :

१) मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील प्रवृत्ती अभ्यासणे.

२) मराठवाड्यातील अधोगतीस जाणाऱ्या स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या कारणांचा मागोवा घेणे.

## अभ्यास पध्दती :

प्रस्तुत अभ्यासासाठी प्रामुख्याने द्वितीयक सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. ज्यामध्ये जनगणना अहवाल, मानव विकास अहवाल, शासनाची लोकसंख्येशी संबंधित सर्व प्रकारची प्रकाशने, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, मासिके याचा समावेश आहे.

**संकल्पना :** स्त्री-पुरूष गुणोत्तर (Female Male Ratio)

लोकसंख्येशी संबंधित बाबींचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी लोकसंख्येच्या रचनेतील एकूण लोकसंख्येची स्त्री-पुरूष यानुसार केली जाणारी विभागणी अतिशय महत्त्वाची मानली जाते. एकूण लोकसंख्येतील स्त्री-पुरूषांच्या परस्पर सापेक्ष प्रमाणास स्त्री-पुरूष गुणोत्तर (FMR) या नावाने संबोधले जाते.

साधारणतः स्त्री-पुरूष गुणोत्तर हे दोन पध्दतीने मोजण्यात येते. १. दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या २. दर शंभर स्त्रियांमागे पुरूषांची संख्या.

१)दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या काढणे :

या पध्दतीमध्ये पुढील सूत्राचा अवलंब करण्यात येतो.

$$\text{स्त्री-पुरूष गुणोत्तर(FMR)} = \frac{\text{स्त्रियांची एकूण लोकसंख्या}}{\text{पुरूषांची एकूण लोकसंख्या}} \times १०००$$

हे गुणोत्तर १००० असणे ही आदर्श स्थिती मानली जाते. जर हे गुणोत्तर १००० पेक्षा कमी असेल तर त्यातून स्त्री-पुरूष गुणोत्तरामध्ये विषमता निर्माण होते.

२. दर शंभर स्त्रियांमागे पुरूषांची संख्या काढणे.

या पध्दतीमध्ये पुढील सूत्राचा अवलंब करण्यात येतो.

$$\text{स्त्री-पुरूष गुणोत्तर(FMR)} = \frac{\text{पुरूषांची एकूण लोकसंख्या}}{\text{स्त्रियांची एकूण लोकसंख्या}} \times १००$$

हे गुणोत्तर १०० असणे ही आदर्श स्थिती मानली जाते. जर हे गुणोत्तर १०० पेक्षा अधिक असेल तर त्यातून स्त्री-पुरूष गुणोत्तरामध्ये विषमता निर्माण होते.

प्रस्तुत अध्ययनात दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या काढणे या पध्दतीचा अवलंब करून मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील प्रवृत्तीचा आढावा घेतला आहे.

**स्त्री-पुरूष गुणोत्तराबाबत झालेल्या अभ्यासातील महत्त्वाचे निष्कर्ष :**

लोकसंख्येचे लिंग-गुणोत्तर हे सर्व लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांपैकी एक मुलभूत वैशिष्ट्य असून लोकसंख्या विश्लेषणात स्त्री-पुरूष गुणोत्तर हे महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. कारण स्त्री-पुरूष गुणोत्तर किंवा लिंग गुणोत्तर हे जन्म, मृत्यू आणि विवाह यांच्या प्रभाव क्षेत्रास प्रभावित करत असते. लिंग गुणोत्तराद्वारे स्थलांतर दर, व्यावसायिक रचना आणि इतर सर्व लोकसंख्याविषयक वैशिष्टचे प्रभावित होवू शकतात. दुसऱ्या बाजूने लिंग गुणोत्तरास देखील अनेक घटक प्रभावित करत असतात. आजपर्यंत अनेक अभ्यासकांनी याबाबतीत महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत.

क्लार्क (१९६८)[१] हे लोकसंख्येतील पुरूष गुणोत्तराच्या वर्चस्वाचा संबंध पुरूषांसह सर्व सस्तन प्राण्यामधील विशेष गुणवर्णन केलेल्या उच्च नर (Male) जन्मदराशी जोडतात. स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या अधोगतीचे हे जरी एक महत्त्वाचे कारण सांगितले जात असले, तरी दुसऱ्या बाजूने स्त्री-पुरूष गुणोत्तरास प्रभावित करणारे अनेक घटक दिसून येतात. अभ्यासकांनी जे वेळोवेळी नोंदवलेले दिसतात.

१९०१ मधील कमी झालेले ९७२ हे स्त्री-पुरूष गुणोत्तर प्रामुख्याने महिलांची उच्च मर्त्यता आणि विशेषत: स्त्री-बालहत्या या कारणामुळे असल्याचे स्पष्टीकरण जनगणना आयुक्त यांनी स्पष्ट केले होते[२].

१९११ चे जनगणना आयुक्त यांना भारतीय स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या अधोगतीस प्रामुख्याने १. महिलांचा दर्जा २. कमी वयातील विवाह ३. उपासमारीमुळे मृत्यूतील लिंग भिन्नता इ. बाबी कारणीभूत ठरलेल्या आढळून आल्या.[३]

१९३१ च्या जनगणना आयुक्त यांनी असाही विचार केला आहे की,१) विधवांचे न झालेले पुनर्विवाह २) जाती अंतर्गत विवाह. ही भारतीय लोकसंख्येच्या कमी झालेल्या लिंग गुणोत्तराची शक्य कारणे आहेत. तथापि विश्वसनीय माहिती गोळा केली जावू शकली तरच याबाबतीत निष्कर्षरूपी पुरावा दिला जावू शकतो असे त्यांना वाटते.[४]

एस. अनंथाराम (१९८९)[५] यांनी केलेल्या संशोधन अभ्यासातून देशातील स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या अधोगतीचे महत्त्वाचे कारण पुढीलप्रमाणे लक्षात आले. त्यांच्या मते, आंतरराष्ट्रीय स्थलांतर हे नगण्य असल्याने मर्त्यतेतील लिंग भिन्नता ही १९३१ व १९७१ या काळातील महिलांच्या हानीने (नुकसानीने) अधिक खालावली होती, की ज्याचा परिणाम म्हणून स्त्री-पुरूष गुणोत्तरात घटीची प्रवृत्ती दिसून आली.

फिलीप ओल्डेन बर्ग (१९९२)[६] यांनी पश्चिम-मध्य उत्तर प्रदेश व १९९१ च्या जनगणनेतील लिंग गुणोत्तर नकाशाने उघड केलेले सभोवतालचे जिल्हे यांच्या 'बर्म्यूडा ट्राईंगल फॉर गर्ल्स' चे विश्लेषण केले आहे. या अभ्यासाच्या माध्यमातून ओल्डेनबर्ग यांनी इतर कुठल्याही कुटुंबांपेक्षा पश्चिम मध्य उत्तर प्रदेशातील कुटुंबांना जास्तीचे मुलगे (Sons) पाहिजे असतात ही परिकल्पना अभ्यासली. प्रामुख्याने राज्यातील हिंसेशी लिंग-गुणोत्तराचा सहसंबंध शोधण्याच्याद्वारे ही परिकल्पना अभ्यासण्यात आली. ज्यानुसार पश्चिम-मध्य उत्तर प्रदेशातील कुटुंबांना त्यांच्या

संरक्षणासाठीच्या सामर्थ्यात वाढ घडवून आणण्यासाठी किंवा सामर्थ्य प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी अधिकचा मुलगा पाहिजे असतो असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष या अभ्यासातून नोंदविला गेला.

मुलीपेक्षा मुलग्यास असणारी तीव्र पसंती देशाच्या बहुतेक राज्यात तीव्र असल्याचे अनेक अभ्यासातून सिध्द झाले आहे. महाराष्ट्रातदेखील असाच एक संशोधन अभ्यास अंजली राडकर यांनी १९९९ मध्ये केला आहे.

बरूच ब्लमबर्ग (नोबेल पारितोषिक) यांनी आपल्या १९७६ च्या व्याख्यानात असा उल्लेख केला होता की, अलीकडेच काही अभ्यास असे दर्शवितात की, महिला या हेपाटायीटीस बी विषाणूने संसर्गित होवून सर्वसाधारण प्रमाणाच्या तुलनेत उच्च प्रमाणावर पुरूष बालकांना जन्म देतात. इमिली ऑस्टर (२००५)[७] यांनी आपल्या 'हेपाटायटीस बी ॲण्ड द केस ऑफ द मिसिंग विमेन' या अभ्यासात वरील परिकल्पनेचा संपूर्ण अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासातून ऑस्टर यांनी 'मिसिंग विमेन' च्या प्रमाणाचा अंदाज मिळविलेला आहे. ज्याचा संबंध या संसर्गाच्या प्रसाराशी लावला जातो. ऑस्टर यांचा अंदाज असा दर्शवितो की, चीनमधील ७५ टक्के पर्यंतच्या 'मिसिंग विमेन' या मार्गाने स्पष्ट केल्या जावू शकतात, शिवाय हे सुसंगत आहे चीनमधील या वस्तुस्थितीशी की जेथे 'मिसिंग विमेन' ची मोठी संख्या ही जन्मावेळीच्या नोंदविलेल्या अतिरिक्त पुल्लिंगी लिंग गुणोत्तराशी संबंध लावण्याजोगी आहे. एकूणच ऑस्टर यांनी आरोग्य निष्पत्तीतील लिंग भिन्नतेस व तफावतीस प्रभावित करणाऱ्या जैविक घटकांचे महत्त्व स्मरण करून दिल्यामुळे त्यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

परशुरामन (२००१)[८] यांच्या मते, 'महाराष्ट्रातील मुलांमधील (०-६ वयोगट) लिंग गुणोत्तरातील तीव्र घट पाहता, मुलींच्या उपेक्षेमुळे मुलग्यापेक्षा मुलीचा बाल मृत्यूदर अधिक असणे व स्त्रीभ्रूण हत्त्या प्रचलित असण्याची शक्यता बळावते.'

संजीवनी मुळये व आर. नागराजन (२००६)[९] यांच्या अभ्यासात असे नमूद केले आहे की, अन्यत्र अनुभवास येणाऱ्या परिस्थितीपेक्षा भारतातील लिंग गुणोत्तर हे स्त्रियांसाठी विषम राहिलेले आहे. यासाठी पुढील अनेक कारणे नोंदवली गेली आहेत. ज्यामध्ये
१) मुलगी म्हणून होणारी उपेक्षा ज्यामुळे लहान वयात त्यांच्यात आढळणारा जास्त मृत्यूदर. २) मातृत्वाशी निगडीत जास्त मृत्यूदर ३) स्त्री-भ्रूण हत्या ४) स्त्री अर्भकांची हत्या इ. कारणांचा समावेश होतो.

एकूणच आजपर्यंत स्त्री-पुरूष गुणोत्तराबाबत झालेल्या संशोधन अभ्यासाने स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या अधोगतीमध्ये प्रामुख्याने जैविक, सामाजिक, आर्थिक आणि स्थलांतरविषयक घटकांची भूमिका स्पष्ट केल्याची दिसते.

## मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील प्रवृत्ती :

मराठवाड्यातील स्त्री--पुरूष गुणोत्तरातील प्रवृत्ती दर्शविणाऱ्या तक्त्यावरून (१९६१ ते २००१) या कालावधीत विभागातील FMR कशा पध्दतीने अधोगतीला गेला आहे याची कल्पना येते.

१९६१ च्या जनगणनेनुसार मराठवाड्यातील एकूण लोकसंख्येपैकी पुरूषांच्या लोकसंख्येचे प्रमाण ५०.९५ टक्के तर स्त्रियांच्या लोकसंख्येचे प्रमाण ४९.०५ टक्के होते व FMR हा दर हजार पुरूषांमागे ९६३ स्त्रिया एवढा होता. ज्यामध्ये १९७१ मध्ये घट होवून ९५० पर्यंत कमी

## मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील प्रवृत्ती दर्शविणारा तक्ता

(लोकसंख्या हजारात)

| अ.क्र. | वर्ष | एकूण लोकसंख्या | | | स्त्री-पुरूष गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकूण | |
| १. | १९६१ | ३२,०८ (५०.९५) | ३०,८८ (४९.०५) | ६२,९६ (१००.००) | ९६३ |
| २. | १९७१ | ४१,३१ (५१.२७) | ३९,२६ (४८.७३) | ८०,५७ (१००.००) | ९५० |
| ३. | १९८१ | ४९,७४ (५१.०५) | ४७,७० (४८.९६) | ९७,४३ (१००.००) | ९५९ |
| ४. | १९९१ | ६५,९० (५१.४८) | ६२,१० (४८.५२) | १,२८,०० (१००.००) | ९४२ |
| ५. | २००१ | ८०,५९ (५१.५७) | ७५,६९ (४८.४३) | १,५६,२८ (१००.००) | ९३९ |

**टीप :** १) लोकसंख्येचे आकडे पूर्णांकात घेतले आहेत.
२) कंसातील आकडे एकूणाशी प्रतीशत प्रमाण दर्शवितात.

**संदर्भ :** १) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (संपूर्ण मराठवाड्यातील जिल्हे) वर्ष : १९६३-१९६४, १९७३-१९७४, १९८३-८४, १९९४-९५.
२) Census of India 2001, Office of the Registrar General India, Primary Census Abstract, Published CD for Maharashtra & Goa.

झाल्याचा आढळतो. म्हणजेच १९६१-१९७१ या दहा वर्षाच्या काळात मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरात उल्लेखनीय अशी १३ बिंदूची घट लक्षात येते. तक्त्यावरून मराठवाड्याच्या स्त्री-पुरूष गुणोत्तरात केवळ १९७१ ते १९८१ या दहा वर्षाच्या काळात वाढीची प्रवृत्ती दिसून येते. या दहा वर्षाच्या काळात FMR मध्ये ९ बिंदूची वाढ झाल्याचे आढळते. १९८१ मध्ये मराठवाड्याची एकूण लोकसंख्या ९७ लाख ४३ हजार होती. ज्यामध्ये पुबिंदूची घट लक्षात येते. तक्त्यावरून मराठवाड्याच्या स्त्री-पुरूष गुणोत्तरात केवळ १९७१ ते १९८१ या १० वर्षात पुरूष लोकसंख्येचा वाटा ५१.०५ टक्के तर स्त्री-लोकसंख्येचा वाटा ४८.९६ टक्के होता. १९८१ नंतरच्या काळात मात्र मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तर सातत्याने अधोगतीला गेलेले दिसते. १९९१ मध्ये स्त्री-पुरूष गुणोत्तरात आश्चर्यकारक अशी १७ बिंदूची तर २००१ मध्ये ३ बिंदूची घट झाल्याची दिसते. १९८१-१९९१ या काळातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील जो घटीचा अधिक वेग होता तो निश्चित १९९१-२००१ या दशकामध्ये कमी झाल्याचा आढळतो, मात्र स्त्री-पुरूष गुणोत्तरातील घटीची प्रवृत्ती सुरूच असल्याची दिसते. जी चिंतेची बाब ठरते.

## मराठवाड्यातील अधोगतीस जाणाऱ्या स्त्री-पुरूष गुणोत्तराची कारण मिमांसा :

एखाद्या समाजातील प्रचलित स्त्री-पुरूष समानता जाणून घेण्यासाठी स्त्री-पुरूष गुणोत्तर हा महत्त्वाचा सामाजिक निर्देशांक मानला जातो. त्यामुळे स्त्री-पुरूष गुणोत्तरातील घट ही कोणत्याही काळात समाजासाठी उचित ठरणारी नाही. मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरात १९६१ ते २००१ या कालखंडात जी २४ बिंदूची घट घडून आली आहे. त्यामागे कोणतेही एक कारण सांगता येणे शक्य नाही. कारण स्त्री-पुरूष गुणोत्तरावर एकाच वेळी अनेक घटकांचा प्रभाव जाणवू शकतो.

मराठवाडा विभाग हा एक मागासलेला विभाग म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास मराठवाड्यात अजूनही औद्योगिकीकरणाचा अपेक्षीत विस्तार आढळून येत नाही. मराठवाड्याची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असल्याने लोकसंख्येचा फार मोठा भाग हा कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. मात्र मराठवाड्याचा बहुतांश भाग हा पर्जन्यमानाच्या अशाश्वत पट्ट्यात येत असल्याने कृषी क्षेत्राची सुध्दा अपेक्षित प्रगती घडून आल्याचे दिसत नाही. या सर्व बाबींमुळे मराठवाड्यातील विशेषत: पुरूष लोकसंख्येमध्ये मुंबई, पुणे यासारख्या औद्योगिकीकरणाचे केंद्र असणाऱ्या शहरांकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती दिसून येते. मराठवाड्यातून पुरूष लोकसंख्येचे होणारे स्थलांतर हे मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या विषमतेचे एक कारण असू शकते. मात्र याशिवाय सुध्दा इतर अनेक कारणांचा मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरावर संमिश्र स्वरूपाचा प्रभाव पडल्याचा दिसतो.

### १)०-६ वयोगटातील सातत्याने घटत जाणारे लिंग-गुणोत्तर :

१९६१ ते २००१ या कालखंडात मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील घटीबाबत मराठवाड्यातून होणारे पुरूष लोकसंख्येचे स्थलांतर हा घटक जरी महत्त्वपूर्ण ठरत असला तरी या घटकाचा प्रभाव आढळून न येणाऱ्या मुलांच्या लिंग-गुणोत्तरामध्ये म्हणजेच ०-६ वयोगटातील मुलांच्या लिंग-गुणोत्तरामध्ये सातत्याने होत आलेली घट ही मराठवाड्यातील मुलींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अधोरेखित करते. २००१ च्या जनगणनेनुसार मराठवाड्यातील मुलांमधील लिंग गुणोत्तर औरंगाबाद (८८४), जालना (९१४), बीड (८९८), परभणी (९२६), हिंगोली(९३५), नांदेड (९४४), लातूर (९२३) व उस्मानाबाद (९२७) या सर्वच जिल्ह्यांमधून घटत असल्याचे दिसते. विशेषत: औरंगाबाद व बीड जिल्ह्यामधील दर हजार मुलांमागे असणारी मुलींची संख्या ही ९०० पेक्षा ही कमी आढळते.

याचा अर्थ मराठवाड्यामध्ये मुलींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन घटत जाणाऱ्या मुलांमधील लिंग गुणोत्तराद्वारे प्रदर्शित होतो. म्हणजेच मुलगी म्हणून होणाऱ्या तिच्या उपेक्षेमुळे मुलींचा बाल मृत्यूदर अधिक असणे व स्त्री-भ्रूण हत्या प्रचलित असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### २)तिसरे वा त्यानंतरच्या मुलांचे एकूण जन्मामधील उच्च प्रमाण :

तीनपेक्षा अधिक मुले असणे हे अतिरिक्त जननाचे लक्षण आहे. विशेषत: आई व मूल दोघांच्याही आरोग्याच्या दृष्टीने ही धोकादायक बाब आहे. RCH-RHS सर्वेक्षणानुसार [१०] सर्वेक्षणपूर्व तीन वर्षामध्ये महाराष्ट्रातील ३५ टक्के जन्म हे ३+ या स्तरात मोडतात. मराठवाड्यातील परभणी

जिल्ह्यात याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४७ टक्के आढळते. राज्यात हे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा अधिक असणारे आठ जिल्हे असून त्यातील बहुतेक जिल्हे मराठवाड्यातील आहेत. याचा परिणाम म्हणून जन्मावेळी माता व बाळ या दोघांच्याही जीवाला असलेला धोका मराठवाड्यात अधिक असल्याने १९६१ ते २००१ या कालखंडात प्रसुतीवेळी मृत्यूमुखी पडलेल्या स्त्रिया या मार्गाने स्पष्ट केल्या जावू शकतात. याचा परिणाम म्हणून मृत्यूतील लिंग भिन्नता ही एकूण स्त्री-पुरूष गुणोत्तराला देखील प्रभावित करू शकते.

### ३)मुलीपेक्षा मुलग्यास दिली जाणारी तीव्र पसंती :

व्यक्तीकडे जे नाही ते असण्यासाठीची तीव्र इच्छा असणे ही मूळातच मानवी प्रवृत्ती आहे. मुलीपेक्षा मुलग्याला दिली जाणारी पसंती ही तीव्र असल्याचे महाराष्ट्रातील अनेक अभ्यासातून समोर आले. अंजली राडकर (१९९९)[११] यांनी केलेल्या संशोधन अभ्यासातून याबाबत अनेक महत्त्वाचे निष्कर्ष पुढे आले आहेत. या अभ्यासानुसार १) ज्या महिलांना पहिली मुलगी आहे अशापैकी ६७ टक्के महिला अशा आहेत की ज्यांना मुलगाच हवा असे वाटते. २) ज्या महिलांना अधिकचे एक मूल हवे आहे अशापैकी ४४ टक्के महिला अशा आहेत की, ज्यांना मुलगा हवा आहे. केवळ ११ टक्के महिला अशा आहेत की ज्यांना मुलगी हवी आहे. हे निष्कर्ष काही प्राथमिक स्वरूपाच्या जोडप्यांची निवड करून जरी मिळवलेले असले तरीही कमी जास्त प्रमाणात ही प्रवृत्ती सर्वच जोडप्यांमध्ये आढळून येते. विशेषत: पुरूषांच्या बाबतीत कुटुंबाचे नाव पुढे सुरू राहण्यासाठी व वृध्दापकाळाचा आधार तर स्त्रियांच्या बाबतीत मुलग्याला दिले जाणारे भावनिक महत्त्व हे पुत्र पसंतीबाबत सर्वत्र अनुभवास मिळते. सुशिक्षित जोडप्यांमध्ये वरील दोन मूल्याशिवाय मुलगा असण्याची मानसशास्त्रीय गरज प्रकर्षाने आढळून येते. एकूणच या सर्वांचा परिणाम म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गर्भाचे लिंग निदान करून नको असलेल्या लिंगाचा गर्भपात करण्याची प्रवृत्ती अधिक तीव्रतेने पुढे येत असल्याचे दिसते. मुलगा असण्यापाठीमागचा पारंपारिक दृष्टिकोन व आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने केले जाणारे लिंग निदान व गर्भपात यासंबंधीचा आधुनिक दृष्टिकोन या दोन्हीचा समन्वयसुध्दा स्त्री-पुरूष गुणोत्तरातील वाढत जाणाऱ्या विषमतेवर प्रभाव पाडत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### ४) मराठवाड्यातील १८ वर्षाखालील मुलींच्या लग्नाचे उच्च प्रमाण :

मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये १९९८-१९९९ च्या माहितीनुसार[१२] हिंगोली(४६.६ टक्के),परभणी (४६.६ टक्के), जालना (५५.६ टक्के), औरंगाबाद (५०.९ टक्के), बीड(५९.४ टक्के), लातूर (५८.१ टक्के), उस्मानाबाद (४६.५ टक्के) व नांदेड (६३.७ टक्के) या मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमधून १८ वर्षाखालील मुलींच्या विवाहाचे प्रमाण उच्च असल्याचे आढळते. मुलींची वयोमर्यादा कायद्याने ठरवून दिल्यानंतरच्या काळातील ही आकडेवारी आहे. यावरून हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी हे प्रमाण किती अधिक असेल याचा अंदाज बांधता येवू शकतो. एकूणच लहान वयात होणाऱ्या मुलींच्या विवाहामुळे मृत्यूतील लिंग भिन्नता प्रभावित होवून त्याचा स्त्री-पुरूष गुणोत्तरावर विपरीत परिणाम घडून येतो.

### ५) स्त्री-साक्षरतेचे प्रमाण :

एकूण साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे देशात आघाडीच्या राज्यात गणले जात असले व २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील स्त्री

साक्षरता (६८ टक्के) राष्ट्रीय सरासरीपेक्षा (५४ टक्के) अधिक असली तरी राज्याअंतर्गत जिल्हानिहाय याबाबत खूपच विषमता आढळते. राज्यात अजूनही पाच जिल्हे असे आहेत की, ज्यांचे स्त्री साक्षरतेचे प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षाही कमी असल्याचे दिसते. या पाच जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील परभणी, हिंगोली व जालना या तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. स्त्री-साक्षरतेमुळे स्त्रियांना त्यांच्या अधिकारांची जाणीव होवून निर्णय प्रक्रियेतील त्यांची भूमिका विस्तारते, मात्र मराठवाड्यातील स्त्री-साक्षरता प्रमाण कमी असल्याने स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण अधिक असू शकते. स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचारामुळे स्त्रिया अकाली मरण पावतात. त्यामुळे मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तराच्या अधोगतीबाबत काही प्रमाणात ही शक्यता सुध्दा नाकारता येत नाही.

१९९८ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी 'ब्रिटिश मेडिकल' या वैद्यकीय संशोधन पत्रिकेमध्ये 'हरवलेल्या स्त्रिया' (Missing women) या लेखाच्या माध्यमातून १९९१ च्या जनगणनेमध्ये स्त्री-पुरूष गुणोत्तरात एकाएकी झालेली घट लक्षात घेवून सेन यांनी 'स्त्रिया आपल्या आयुष्यात विविध कारणांमुळे अकाली मरण पावल्या होत्या' हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढला. ज्यामुळे अनेक अभ्यासकांचे लक्ष या समस्येने वेधून घेतले. सेन यांच्या मते, आफ्रिकेतील स्त्री-पुरूष गुणोत्तर म्हणजे दर हजार पुरूषामागे १०७० स्त्रिया याला प्रमाण मानल्यास भारतामध्ये १९९१ साली काही दशलक्ष स्त्रिया या मार्गाने हरवलेल्या होत्या. यावरून देशभरातून हरवलेल्या काही दशलक्ष स्त्रियांपैकी मराठवाड्यातील हरवलेल्या स्त्रियासुध्दा या मार्गाने स्पष्ट करता येवू शकतात.

**६)प्रसुतीवेळी प्रशिक्षित दक्षता मिळणाऱ्या स्त्रियांचे न्यून प्रमाण व पक्का रस्ता नसलेल्या गावांचे उच्च प्रमाण :**

NFHS-II व RCH-RHS च्या सर्वेक्षणानुसार[१३] राज्यात प्रसुतीवेळी प्रशिक्षित देखरेख मिळणाऱ्या मातांचे प्रमाण जवळपास ६० टक्के आहे. याबाबतीत मराठवाड्यातील स्थिती खूपच वाईट आहे. हे प्रमाण जेवढे कमी असेल तेवढी प्रसुतीवेळी माता व बाल दोघांच्याही आरोग्याच्या दृष्टीने ही अधिक धोकादायक बाब ठरते. ज्यामधून अनेक महिला व जन्मलेले मूल मृत्यूमुखी पडण्याची अधिक शक्यता असते. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यात हे प्रमाण ३५ टक्के आहे तर मराठवाड्यातील इतर बहुतेक जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ५० टक्केपेक्षा कमी आढळते.

प्रसुतीवेळी स्त्रियांना प्रशिक्षित दक्षता मिळण्याबाबत प्रतिकूल परिणाम घडवून आणणारा घटक म्हणजे ग्रामीण भागातून पक्क्या रस्त्यांचा असलेला अभाव होय. योजना आयोगाने २०००-२००१ वर्षासाठी राज्यातील पक्का रस्ता नसलेल्या गावांची आकडेवारी प्रसिध्द केली आहे[१४]. ज्यानुसार राज्यातील १९ जिल्ह्यात अजूनही ५० टक्केपेक्षा जास्त गावांना पक्के रस्ते नसल्याचे लक्षात येते. मराठवाड्याच्या बाबतीत हे प्रमाण नांदेड (७२.०३ टक्के), हिंगोली व परभणी (प्रत्येकी ६०.८२ टक्के), बीड(५२.८२ टक्के), लातूर (५२.४३ टक्के), जालना (५७.४१ टक्के), उस्मानाबाद (४७.४२ टक्के) व औरंगाबाद जिल्ह्यात (३३.२० टक्के) उच्च असल्याचे आढळते. मराठवाड्यातील पक्का रस्ता नसलेल्या गावांचे प्रतिशत प्रमाण लक्षात घेता विभागातील ग्रामीण जनतेला आरोग्य तसेच शिक्षण सुविधांच्या बाबतीत किती अडथळ्यांना सामोरे जावे लागत असेल याची कल्पना येते. पक्का रस्ता नसलेल्या गावांमध्ये अर्भक मृत्यूदर अधिक

आढळतो. उदा. गडचिरोली जिल्ह्यात अर्भक मृत्यूदर अधिक आहे. जेथे अजूनही ८१ टक्के गावांना पक्के रस्ते नसल्याचे दिसते.

स्त्री-साक्षरता व प्रसुतीवेळी प्रशिक्षित दक्षता सुविधांचा धनात्मक सहसंबंध असला तरीही पक्क्या रस्त्यांची जर सुविधा नसेल तर त्याचा सुरक्षित प्रसुतीवर विपरीत परिणाम घडून येत असतो. या मार्गाने मराठवाड्यातील माता मृत्यूच्या वाढत्या प्रमाणाची शक्यता नाकारता यते नाही, की ज्याचा स्त्री-पुरूष गुणोत्तरातील विषमतेवर प्रभाव पडत असावा.

या सर्व शक्य कारणांशिवाय इमिली ऑस्टर यांनी स्मरण करून दिलेल्या हेपाटायटीस बी संसर्ग व त्यातून सर्वसाधारण प्रमाणाच्या तुलनेत अधिक प्रमाणात पुरूष बालकांचा जन्म होत असल्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही. मात्र याबाबतीत विश्वसनीस आकडेवारी शिवाय निष्कर्ष काढणे चुकीचे ठरू शकते.

एकूणच १९६१-२००१ या कालखंडातील मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरात झालेली घट ही केवळ एका घटकाचा परिणाम नसून वरील चर्चीलेल्या अनेक घटकांचा संमिश्र परिणाम असण्याची दाट शक्यता आहे. ही कारणमिमांसा करताना जी आकडेवारी उपयोगात आणली आहे ; ती बहुतांश आकडेवारी १९९०-२००१ या दशकातील आहे. तरीसुध्दा सद्यस्थितीला सर्वच लोकसंख्याविषयक निर्देशांकाच्या बाबतीतील मराठवाड्याची स्थिती अतिशय वाईट असल्याची दिसते. यावरून गेल्या तीन ते चार दशकांमध्ये ही स्थिती किती वाईट असेल याचा अंदाज बांधून एकूण १९६१-२००१ या कालखंडातील स्त्री-पुरूष गुणोत्तराची कारणमिमांसा केली आहे. भट व झेविअर (१९९९)[१५] यांनी NFHS-I च्या आकडेवारीचे विश्लेषण करून सामाजिक व लोकसंख्यात्मक निर्देशांकावरून प्रत्येक मोठ्या राज्यातील सर्वात मागासलेला प्रदेश ठरवला आहे. या अभ्यासात त्यांनी महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा सर्वात मागास प्रदेश म्हणून निष्कर्ष काढला आहे. यावरून मराठवाडा लोकसांख्यिकीय संक्रमणाच्या दृष्टीने किती मागे आहे याची कल्पना येते. ही बाब मराठवाड्यासाठी अधिक चिंतेची आहे असे म्हणता येईल.

## सारांश :

मराठवाड्यातील स्त्री-पुरूष गुणोत्तरातील सातत्याने होणारी घट ही समस्या केवळ मराठवाड्याचा आर्थिक विकास वेगाने साधून दूर करता येणार नाही. त्यासाठी गरज आहे ती म्हणजे आर्थिक विकासाला सामाजिक विकासाची जोड मिळण्याची. स्त्री-पुरूष गुणोत्तरातील घटीबाबत जैविक व स्थलांतरविषयक घटकांचे प्राबल्य मान्य केले तरीही इतर घटकांच्याबाबतीत अपेक्षित सुधारणा आवश्यक आहे. अनेक लोकसांख्यिकीय समस्यांचे मूळ हे स्त्रियांच्या निरक्षरतेमध्ये आहे. जर मराठवाड्यातील स्त्रियांच्या साक्षरतेत वाढ घडून आली तर या समस्येचे समाधान बऱ्याच अंशी साधता येवू शकते. याशिवाय जोपर्यंत समाजाच्या मुलग्यापेक्षा मुलीकडे पाहण्याच्या उपेक्षात्मक दृष्टिकोनात बदल घडून येणार नाही, मुलीपेक्षा मुलगाचा हवा हा हव्यास कमी होणार नाही, विवाह वेळीच्या वयात वाढ घडून येणार नाही तोपर्यंत एकूणच लोकसांख्यिकीय समस्यांपासून मराठवाड्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला सुध्दा मुक्त होता येणार नाही. त्याचबरोबर केवळ शासकीय पातळीवरील निर्णय व कायदे यांच्या आधारावर समस्या समाधान होवू शकणार नाही. यासाठी विकास प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असलेल्या 'लोक' किंवा लोकसंख्या या घटकामध्ये विशेषत:

सर्वसामान्य लोकांच्या दृष्टिकोन व व्यवहारामध्ये परिवर्तन घडून येण्याची गरज सारांशरूपाने प्रतिपादित करता येईल.

**संदर्भ :**

१)'पॉप्युलेशन जिओग्राफी', क्लार्क जे. आय. परग्रोमन प्रेस,ऑक्सफर्ड (१९६८), पान क्र. ७३

२) 'सेन्सस् ऑफ इंडिया' १९७१ चेंजेस् इन सेक्स रेशो, नटराजन डी, सेन्सस् सेन्टेनरी.मोनोग्राफ नं. ६, ऑफिस ऑफ द रजिस्ट्रार जनरल, इंडिया, न्यू दिल्ली. (१९७२),पान क्र. ५५

३) त्रतैव, पान क्र. ७३

४) त्रतैव, पान क्र. ७४-७५

५)'डिक्लाईनींग सेक्स रेशो इन इंडिया(१९०१-१९८१)',एस अंनथाराम,अनपब्लिश्ड, पीएच.डी. थिसिस, सेंटर फॉर द स्टडी ऑफ रीजनल डेव्हलपमेंट स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी, न्यू दिल्ली (१९८९), पान क्र. २१-२२, ९२-९९.

६) रिसर्च नोट ऑन 'सेक्स रेशीओ, सन प्रेफरन्स ॲण्ड व्हायलन्स इन इंडिया', फिलीप ओल्डेन बर्ग, इकॉनॉमिक ॲण्ड पॉलिटीकल विकली, ५-१२ डिसेंबर, (१९९२), पान क्र. २६५७.

७)'हेपाटायटीस बी ॲण्ड द केस ऑफ द मिसिंग विमेन', ऑस्टर इमिली (२००५), इन नोटस् अँड कॉमेन्टरी-'एक्सप्लेनिंग एशियाज् मिसिंग विमेन' ए न्यू लूक ॲट द डाटा, बाय मोनिका गुप्ता, पॉप्यूलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट रिव्ह्यू, व्हॉल्यूम-३१, नं. ३(सप्टेंबर २००५), पान क्र. ५२९-५३५.

८)'डिक्लाईनींग सेक्स रेशो ऑफ चाईल्ड पॉप्यूलेशन इन इंडिया', परशुरामन एस, न्यूज लेटर ऑफ द इंटरनॅशनल इन्स्टिटयूट फॉर सायन्सेस, मुंबई, व्हॉल्यूम ४२ नं. ३ आणि ४, (२००१), पान क्र. २९-३९.

९)'महाराष्ट्रातील धीमे लोकसांख्यिकीय संक्रमण विकासातील प्रादेशिक विषमता व जननदर, यातील सहसंबंध', संजीवनी मुळ्ये व आर. नागराजन, समाज प्रबोधन पत्रिका, समाज प्रबोधन संस्थेचे प्रकाशन, अंक १७३, बेळगाव(जाने-मार्च २००६), पान क्र. १८-३७.

१०)'रिप्रोडक्टिव्ह ॲण्ड चाईल्ड हेल्थ प्रोजेक्ट', रॅपिड हाऊसहोल्ड सर्व्हे(फेज १ व २) १९९८-९९ आय.आय.पी.एस. मुंबई(२००१).

११)'सन प्रेफरन्स इन महाराष्ट्रा : पर्सिस्टंट फेनोमेनन', अंजली राडकर, अनपब्लिश्ड, पीएच.डी. थिसिस, आय.आय.पी.एस., मुंबई(१९९९) पान क्र. १८४-१९३.

१२)'रिप्रोडक्टिव्ह ॲण्ड चाईल्ड हेल्थ प्रोजेक्ट', रॅपिड हाऊसहोल्ड सर्व्हे(फेज १ व २) १९९८-९९ आय.आय.पी.एस. मुंबई(२००१).

१३)नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे(NFHS-2), इंडिया १९९८-१९९९, आय.आय.पी.एस. मुंबई (२०००)

१४)'नॅशनल कमिशन ऑन पॉप्युलेशन', भारत सरकार (२००१)

१५)'फाईडिंग्ज ऑफ नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे' (१९९२-९३) : रिजनल ॲनालिसिस, भट एम. व एफ. झेविअर, इकॉनॉमिक ॲण्ड पॉलिटीकल वीकली, व्हॉल्यूम २४, नं. ४२ व ४३ (१९९९), पान क्र. ३००८-३०३२.

***

# औद्योगिकरण - पर्यावरणीय समस्या
## इचलकरंजी शहरातील औद्योगिकरणाचा सूक्ष्म अभ्यास

**सौ. एस. एस. पाटील**
जयवंत महाविद्यालय,
इचलकरंजी.

**पाटील एस. बी.**
कॉमर्स कॉलेज,
कोल्हापूर.

### १.पार्श्वभूमी :

सर्वप्रथम इंग्लंडमध्ये सुरू झालेली औद्योगिक क्रांती नंतर सर्व जगभर पसरली. वस्तू वा सेवांच्या उत्पादनास मोठी गती मिळाली. प्रचंड प्रमाणात उत्पादन होवू लागले. कापड उद्योग, रासायनिक उद्योग, साखर कारखाने, लोखंड पोलाद उद्योग, अभियांत्रिकी उद्योग, खत उद्योग, जहाज बांधणी, विमान वाहतूक व दळणवळण या सर्वच औद्योगिक क्षेत्रात प्रचंड बदल घडून आले आहेत. ही औद्योगिक क्रांती मानवाला एक वरदान ठरली आहे. सर्वच बाबतीत मानवाचे जीवन सुकर आणि समृध्द झाले. आज मानव विकासाच्या अतिउच्च शिखरावर पोहचला असून त्यांनी जीवनात समृध्दता आणली. असे जरी असले तरी औद्योगिकीकरणाच्या नावाखाली केलेल्या विकासामुळे मानवी जीवनावर अनेक दूरगामी, विपरीत परिणाम आज प्रकर्षाने जाणवू लागले आहेत.

एका बाजूला मानवाने आपल्या कल्पकतेच्या जोरावर विकास साधला असला तरी आज हा विकास संपूर्ण मानवाच्या, सजीवांच्या पृथ्वीच्या अस्तित्त्वालाच आव्हान देवू इच्छित आहे. आजपर्यंत विकासाच्या, औद्योगिकीकरणाच्या नावाखाली मानवाने निसर्गाला मनमुरादपणे ओरबाडले. अविवेकी हव्यासापोटी त्यांनी संपूर्ण निसर्गाची धूळधान केलेली दिसून येते. निसर्गातील प्रत्येक घटकाला एक स्वतंत्र स्थान असते. पाणी, जमीन, हवा, पशूपक्षी, किटक, वनसंपदा आणि मानव हे सर्वच घटक एकमेकांच्या

अस्तित्त्वावर अवलंबून असतात. या सर्व घटकांत एक विशिष्ट संतुलन असते. पण आज हे संतुलन औद्योगिकीकरणामुळे ढासळत चाललेले आहे असे दिसते. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी किंबहूना गरजांपेक्षा हव्यासापोटी, चैनीपोटी मानवाने जंगल, खनिज संपत्ती, शेती, वन्य प्राण्यांची शिकार करून या पृथ्वीवरील साधनसंपत्तीची लूट केलेली दिसून येते. त्यामुळेच अलीकडच्या काही दशकात नैसर्गिक असंतुलनामुळे पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनत चाललेला दिसून येतो.

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा परिसर. यामध्ये हवा, पाणी, जमीन, वनसंपत्ती याबरोबरच सामाजिक पर्यावरण, आर्थिक पर्यावरण, मानवी जीवन पध्दती, संस्कृती या सर्वांचा समावेश केला जातो. मानवाचा विकास हा सर्वस्वी पर्यावरणावरच अवलंबून असतो. उद्योगधंद्यासाठी आवश्यक असणारा कच्चा माल निसर्गातूनच मिळतो. मानवाला जगण्याची परिस्थिती निसर्गातूनच मिळते. मानवाचे पोषण सुध्दा निसर्गातून होते. मानव जो कचरा निर्माण करतो, त्याची विल्हेवाटही निसर्गातच होते. मानव व निसर्ग यांचे अतूट नाते असून ते तितकेच गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे मानवाने आपल्या कल्पकतेच्या जोरावर ज्ञानाच्या अनेक शाखा विकसित केल्या. उदा. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञान, वैद्यकशास्त्र इ. पण या सर्व ज्ञानशाखांचा उगम पर्यावरण शास्त्रात असतो हे आता सर्वमान्य झाले आहे. गेल्या काही दशकांत मानवाचा निसर्ग निर्मित पर्यावरणातील हस्तक्षेप खूप वाढत गेलेला आहे. मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपाने निसर्गाचा तोल पूर्णपणे बिघडून अनेक समस्या अटळ बनल्या आहेत. उदा. जागतिक तापमान वाढ, अॅसिड रेन, पर्यावरण ऱ्हास, हरितगृह परिणाम,वाळवंटीकरण, ओझोन क्षय इ. निसर्गाचा तोल पूर्ववत कसा आणता येईल याविषयी अभ्यास करण्यासाठी पर्यावरण शास्त्र या ज्ञानशाखेचा उगम अलीकडे झालेला दिसून येतो. पर्यावरणशास्त्राचे स्वरूप व्यापक असून त्यात सर्वच ज्ञानशाखांचा समावेश होतो.

औद्योगिकरणामुळे अनेक शहरे औद्योगिकरणाची केंद्रबिंदू बनलेली दिसून येतात. त्यामुळे त्या शहरांचा विस्तार उभा व आडवा अशा दोन्ही बाजूनी झालेला दिसून येतो. औद्योगिकीकरणामुळे हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण, जमीन प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, मानवी आरोग्यांचा प्रश्न इ. अनेक समस्या उद्‌भवल्या आहेत. हे सर्वच घटक विचारात घेता मानव व त्यांचे भोवतालचे पर्यावरण यात असंतुलन झाले आहे हेच सूचित होते.

**२.उद्देश व अभ्यासपध्दती:**

औद्योगिकरणामुळे मानवाचा विकास जरी साधला जात असला तरी याच औद्योगिकरणामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण झालेल्या आहेत. औद्योगिकरणाचा नकारात्मक परिणाम म्हणजे पर्यावरणीय समस्या होय. या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश

१.इचलकरंजी शहराच्या औद्योगिकरणाचा अभ्यास करणे.

२.औद्योगिकरणाचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करणे हा आहे.

या शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम या दोन्ही साधनांचा वापर केलेला आहे. प्राथमिक साधनात सर्वेक्षण, पर्यावरणवादी तज्ञाची मुलाखत व निरीक्षण तंत्रांचा वापर केलेला

आहे. दुय्यम सामग्रीत नगरपालिकेचा पर्यावरण दर्जा अहवाल, आर.टी.ओ. ऑफिस , तहसील ऑफिस हातकणंगले, इचलकरंजी नगरपालिका आरोग्य विभाग व इतर विभागातून माहिती मिळवली आहे.

## ३ इचलकरंजीचे औद्योगिकरण :

भारत हा कापड उत्पादनाच्या बाबतीत अग्रेसर आहे. देशाच्या अर्थकारणात वस्त्रोद्योगाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आज देशात सुमारे १८ लाख यंत्रमाग विकेंद्रीत स्वरूपात आहेत. देशात तयार होणाऱ्या एकूण कापडापैकी ९० टक्के वाटा हा विकेंद्रीत यंत्रमाग उद्योगाचा आहे. कापड व तयार कपडे यात आंतरराष्ट्रीय बाजारात भारताचा वाटा साधारणत: २.५ टक्के इतका आहे. भारत सरकारच्या माहितीवरून भारतीय वस्त्र उद्योगातील निर्यात साठ हजार कोटी रूपये इतकी आहे. या पुढच्या काळात ती वाढवण्याच्या मोठ्या संधी आहेत. रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात हा उद्योग अग्रभागी आहे. महाराष्ट्रात सुमारे १० लाख यंत्रमाग असून सुमारे ७ लाख लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या दिसून येतात. तर इचलकरंजी शहरात सुमारे १ लाख १० हजारपेक्षा जास्त यंत्रमाग असून या व्यवसायात १ लाख लोकांचा उदरनिर्वाह होत आहे.

'महाराष्ट्राचे मँचेस्टर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इचलकरंजी शहराच्या औद्योगिक विकासाची वाटचाल तितकीच जुनी आणि प्राचीन आहे. श्री. विठ्ठलराव दातार यांनी १९०४ मध्ये शहरात यंत्रमागाची मुहूर्तमेढ रोवली. त्यावेळचे जहागिरदार श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनी जी आर्थिक मदत व व्यावसायिक मार्गदर्शन केले होते ते आजपर्यंत या व्यवसायाला बळकटी देणारे ठरलेले दिसून येते. १८५४ मध्ये हातकणंगले तालुक्यात ६३६ हातमाग होते, त्यापैकी ३५ टक्के हातमाग या शहरात होते. सुरूवातीला साळी, कोष्टी, जिनगर हे लोक या व्यवसायात गुंतलेले होते, पण अलीकडे सर्व प्रकारचे लोक या व्यवसायात वळलेले आहेत. पहिल्या महायुध्दाच्या काळात धोती, पंचा, हातरूमाल, बिगर रेशमी धडीची लूगडी तयार होत असत. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात इतर भागातून कापड आल्यामुळे या मालाशी स्पर्धा करण्यासाठी येथील लोकांना कर्नाटकातील कापडासाठी प्रसिध्द असलेल्या रबकई, बनहट्टी या शहरात रंगीत कापडाच्या प्रशिक्षणासाठी पाठवलेले दिसून येते. एकूणच हातमागापासून सुरूवात झालेल्या या उद्योगाने आज मोठी भरारी मारलेली दिसून येते.

**तक्ता क्रमांक १**

**यंत्रमागाचा विकास**

| वर्ष | यंत्रमागाची संख्या | वृध्दीदर% |
|---|---|---|
| १९५१ | २००० | -- |
| १९६१ | ८००० | ४०० |
| १९७१ | २०००० | २५० |
| १९८१ | २७००० | १३५ |
| १९९१ | ६०००० | २२२ |
| २००१ | ९०००० | १५० |
| २००७ | ११०००० | १२२ |

स्त्रोत – पॉवरलूम असोसिएशन, इचलकरंजी.

वरील तक्त्यावरून यंत्रमागाची संख्या वाढत आहे हे स्पष्ट होते. १९५१ मध्ये यंत्रमागाची संख्या फक्त २००० होती. ती वाढून १९६१ मध्ये ८०००, १९७१ मध्ये २००००, १९८१ मध्ये २७०००, १९९१ मध्ये ६००००, २००१ मध्ये ९०००० तर २००७ मध्ये ११०००० पर्यंत जावून पोहचली आहे. या यंत्रमागाच्या वाढीस प्रामुख्याने स्वस्त मजुरांचा पुरवठा कारणीभूत ठरलेला दिसून येतो.

वारंवार निर्माण होणारी सूताची टंचाई

विचारात घेवून या यंत्रमागाला दर्जेदार सूताचा पुरवठा करण्यासाठी 'डेक्कन को-ऑपरेटीव्ह स्पिनींग मिल' या आशिया खंडातील पहिल्या सूतगिरणीची स्थापना केली. आज या परिसरात आठ सूतगिरण्या आहेत. याशिवाय जवळजवळ १५० सायझिंग, १०० प्रोसेस कार्यरत आहेत. एकूणच वस्त्र उद्योगातील स्पिनींग, सायझिंग, व्हिवींग, प्रोसेसिंगचे जाळे इचलकरंजी शहर आणि परिसरात पसरलेले आहे. याशिवाय गारमेंट उद्योग क्षेत्र हे नव्याने या परिसरात निर्माण होत आहे. यंत्रमागासाठी दररोज सुमारे ५.५० लाख किलो सूताची गरज असते. दररोज सुमारे साडे दहा कोटी मीटर कापडाचे उत्पादन या परिसरातून होते. हातमागापासून सुरूवात केलेल्या या शहरात उद्योगाने पॉवरलूम, अॅटोलूम, शटललेस लूम पर्यंत मजल मारलेली आहे.

वस्त्र उद्योग हाच या परिसरातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाचा केंद्रबिंदू ठरलेला आहे. आसपासच्या परिसरातूनच नव्हे तर कर्नाटक, राजस्थान यासारख्या राज्यामधूनही रोजगारासाठी लोक या शहरात वास्तव्य करून राहिलेले आहेत. याशिवाय साखर कारखाना, फाऊंड्री, इतर छोटे छोटे उद्योग या शहरात वाढत असून या शहराची ओळख औद्योगिक शहर, वस्त्रनगरी म्हणून झालेली आहे.

## ४.औद्योगिकरणाच्या समस्या :

औद्योगिकीकरणात महाराष्ट्र राज्याचा गुजरातनंतर दुसरा क्रमांक लागतो. औद्योगिकीकरणामुळे स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वाढ झाली असली तरी या औद्योगिकरणामुळे विशेष करून रासायनिक उद्योगाच्या केंद्रीकरणामुळे राज्याला पर्यावरण अवनतीमुळे प्रचंड आर्थिक भार सहन करावा लागत आहे. 'महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या मते राज्यातील जवळजवळ सर्वच प्रमुख शहरात हवा श्वसनासाठी योग्य नसून या हवा प्रदूषणामुळे आरोग्यावरील खर्च हा कित्येक करोडोच्या घरात पोहचलेला आहे' असे दिसून आले आहे.

'इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेच्या अंदाजानुसार चेंबूरमध्ये रहिवासांना हवेच्या प्रदूषणामुळे दरवर्षी ३५ लाख रूपये खर्चाचा भार पडतो आहे'. केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाच्या मते, राज्यात ८३ हजार औद्योगिक युनिट आहेत. त्यापैकी ५० टक्के युनिटमध्ये रासायनिक उद्योग, खत उद्योग व वस्त्रोद्योग यांचा समावेश होतो. यापैकी ८० टक्के औद्योगिक युनिट पाणी प्रदूषण करतात. तर १५ टक्के युनिट हवा प्रदूषण करतात. महाराष्ट्रातील इतर शहरातही पर्यावरण प्रदूषणाबाबत यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही.

औद्योगिकरणाने इचलकरंजी शहराचा विकासही झपाट्याने झालेला आहे यात शंका नाही, पण याची दुसरी बाजू विचारात घेता या औद्योगिकरणामुळे शहरात अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्याचे वर्गीकरण तीन गटात करता येईल.

### ४.१.सामाजिक समस्या

औद्योगिकरणामुळे, शहरीकरणामुळे शैक्षणिक विकास,सामाजिक सेवा सुविधांचा विकास, स्त्रियांचा दर्जा उंचावणे, जातीभेद निर्मूलन, आरोग्य विषयक सुविधा यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असली

तरीसुध्दा औद्योगिकीकरणामुळे काही मुलभूत सामाजिक प्रश्न उभे राहिले आहेत. त्यातील काही समस्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

### ४.१.१ घनतेत वाढ

दर चौरस किलो मीटर क्षेत्रात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण म्हणजे घनता होय. औद्योगिकीकरणामुळे या शहराची घनता सातत्याने वाढत आहे.

**तक्ता क्रमांक २**

**इचलकरंजी शहराची घनता**

| वर्ष | घनता |
|---|---|
| १९५१ | ८२५ |
| १९६१ | २२६३ |
| १९७१ | ४८३९ |
| १९८१ | ५९३४ |
| १९९१ | ७२०३ |
| २००१ | ८६३२ |
| २००७ | १२७१८ |

स्रोत– इचलकरंजी नगरपालिका

वरील तक्त्यात इचलकरंजी शहराची घनता सातत्याने वाढत आहे याची प्रचिती येते. १९५१ मध्ये ८२५ इतकी घनता होती. ती १९६१ मध्ये २२६३, १९७१ मध्ये ४८३९, १९८१ मध्ये ५९३४, १९९१ मध्ये ७२०३ तर २००१ मध्ये ८६३२ पर्यंत वाढली असून २००७ मध्ये ती १२७१८ पर्यंत पोहचली आहे. रोजगारासाठी आलेल्या आसपासच्या परिसरातील लोकांमुळेच ही घनता वाढलेली दिसून येते.

### ४.१.२ स्त्री-पुरूष प्रमाण :

स्त्री-पुरूष प्रमाण हा सामाजिक विकासाचा मापदंड मानला जातो. दर हजार पुरूषांमागे स्त्रियांच्या प्रमाणात जवळजवळ समानता असणे आरोग्यदायी, सुदृढ समाजाची पूर्वअट असते. पण हे प्रमाण अलीकडच्या काळात घटत चाललेले दिसून येते. महाराष्ट्रात १९९१ मध्ये हे प्रमाण ९३४ होते. ते २००१ मध्ये ९२२ पर्यंत घटलेले दिसून येते. छ. शाहू महाराजांचा वारसा लाभलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात हे प्रमाण ८५९ इतके कमी असलेले दिसून येते. हातकणंगले तालुक्यात हे प्रमाण ९०९ असे आहे. औद्योगिकीकरणामुळे, वाढत्या शहरीकरणामुळे समाज विकसित होत असतो, पण या विकासाबरोबर स्त्री-पुरूष प्रमाण मात्र घटत चाललेले आहे. ही चिंतेची बाब आहे. शहरात तर हे प्रमाण खूप कमी असलेले दिसून येते. उदा. मुंबईत ८२० असल्याचे दिसून येते.

इचलकरंजी शहरात १९५१ मध्ये हे प्रमाण ९०६ होते. त्यानंतर पुढच्या दोन दशकात ९१६ पर्यंत स्थिर राहिलेले दिसून येते. १९८१ पासून मात्र हे प्रमाण घटत जावून २००१ मध्ये ८२५ पर्यंत कमी झालेले दिसून येते. याचा अर्थ आजचा विकसित म्हणवणारा समाजही परंपरागत सापळ्यात अडकल्याची प्रचिती येते. मुलीच्या जन्माला नकार देवून मुलाच्या जन्माला आजही हट्ट धरला जातो. याचाच अर्थ स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण मोठे आहे. हा आधुनिक समाजव्यवस्थेला लागलेला कलंक आहे.

### ४.१.३ झोपडपट्ट्या :

वाढत्या औद्योगिकरणाबरोबर संपूर्ण जगात झोपडपट्ट्यांची समस्या गंभीर बनलेली आहे. मुंबईतील 'धारावी' ही झोपडपट्टी आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखली जाते. एकूण लोकसंख्येच्या ७ टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. इचलकरंजीतही झोपडपट्ट्यांची संख्या वाढत आहे. २००१ साली ११ झोपडपट्ट्यांत ११४०० लोक राहत होते. २००७ साली यांची संख्या २२ झोपडपट्ट्या व बावीस हजार लोकसंख्या अशी झालेली आहे. ही वाढ दुप्पट आहे. या झोपडपट्ट्यांमध्ये ६७ टक्के लोक एका

खोलीत राहत असून घराचा दर्जा निकृष्ट असलेला दिसून येतो. 'पं. जवाहरलाल नेहरूंच्या मते या झोपडपट्ट्या म्हणजें खालावलेल्या मानवी जीवन पध्दतीचे दर्शक असून गलिच्छ वस्त्यांमुळे मानवी जीवनावर, आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असतो. शिवाय व्यसनाधीनता, अनैतिकता व गुन्हेगारीची ही केंद्रे बनलेली आहेत'. इचलकरंजीत झोपडपट्ट्यांत मानवी जीवन खालावलेले दिसून आले. हंटर यांच्या मते या वाढलेल्या झोपडपट्ट्या म्हणजे नागरी जीवनाला लागलेला कलंक आहे.

### ४.१.४ गुन्हेगारी :

गुन्हा म्हणजे समाजविघातक कृत्य होय. अशा समाजविघातक कृत्यांची संख्या वाढणे म्हणजे गुन्हेगारी होय. औद्योगिकरणामुळे शहरीकरण वाढले. शहरी संस्कृतीत राहण्याच्या, हाय-फाय लोकांचे अनुकरण करण्याच्या सवयी जडल्या. हव्यासापोटी, चैनीसाठी पैसा कमी पडू लागला, त्यामुळे अनैतिक मार्गाने पैसा कमावण्याची प्रवृत्ती बळावताना दिसते. महाराष्ट्रातील एकूण नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी ४८% गुन्हेगार हे १८ ते २३ या वयोगटातील असून आर्थिक, हिंसक व व्यावसायिक गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. इचलकरंजी मध्ये २००६ साली सामाजिक मालमत्तेच्या नुकसानीची नोंद झालेले प्रमाण ३% होते. ते २००७ साली ६ टक्क्यापर्यंत म्हणजेच दुप्पटीने वाढले तर फसवणूकीच्या गुन्ह्यांचे प्रमाण ४% वरून ८% पर्यंत वाढले. खून किंवा खूनाचा प्रयत्न करणाऱ्यांचे प्रमाण याच काळात २% वरून ४% पर्यंत वाढलेले आहे. स्त्रियांच्या बाबतीत हुंडा किंवा हुंड्यासाठी छळ करणाऱ्यांचे प्रमाण ३% वरून ५% पर्यंत वाढलेले आहे. थोडक्यात सामाजिक गुन्हेगारी प्रवृत्ती समाजात मोठ्या प्रमाणात वर येताना दिसून येते. हे आकडे जरी लहान वाटत असले तरी मुळातच अशा प्रवृत्ती समाजात असणे हे समाज स्वास्थ्याला घातक आहे.

### ४.२. आर्थिक परिणाम

शहरी भागात औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात मिळतात, हे जरी खरे असले तरी आज प्रचंड प्रमाणात स्थलांतर करणाऱ्या सर्वच लोकांना रोजगार पुरवण्यात ही शहरे कमी पडू लागली आहेत. इचलकरंजी शहरातही कामधंद्यासाठी इतर राज्यातून, आसपासच्या भागातून स्थलांतरीत झालेल्या लोकांचे प्रमाण मोठे आहे. शिवाय हे कामगार अकुशल असल्यामुळे कमी पगारावर त्यांना काम करावे लागते.पुरवठ्यांपेक्षा मागणी वाढल्याने श्रमाचे दर घसरतात. श्रमाचे अवमूल्यन होताना दिसते आहे. या शहरात कामगारांचा एक वर्ग व श्रीमंत भांडवलदारांचा एक वर्ग असे दोन वर्ग निर्माण झालेले असून आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. या शहराच्या बाबतीत असे म्हटले जाते की या शहरात कोणीही उपाशी मरत नाही. सर्वांना रोजीरोटी मिळवून देण्याची क्षमता या शहरात आहे. असे जरी असले तरी तोकड्या पगारावर त्यांना काम करावे लागत आहे ही वस्तुस्थिती आहे.

औद्योगिकीकरणामुळे शहरी भागातील जागेच्या किंमतीत गेल्या पाच वर्षात दुप्पटीपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. हे वाढीव वृध्दीदर सर्वसाधारणपणे ३८ टक्क्यापासून २४० टक्क्यापर्यंत असलेले दिसून येतात. किंमती प्रचंड वाढल्याने सर्वसामान्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न कधीच पूर्ण होणार नाही अशी मानसिकता येथील लोकांची झालेली आहे असे दिसून आले.

एकूणच सामाजिक, सांस्कृतिक समस्येचे वर्णन करताना मार्क्सवादी विचारवंत हर्बट मरक्युस म्हणतात, 'औद्योगिकीकरणातील विकसित मानव 'हाय-फाय' संस्कृतीत गुरफटलेला असून तो पूर्णपणे भौतिकवादाच्या आहारी गेलेला आहे. औद्योगिकीकरणाच्या जगात पैसा आणि वस्तूला प्राथमिकता दिली जात असून त्यानी मानवाला गुलाम

बनवलेले आहे. त्यामुळे माणसातील माणूसपणा हरवत चालला असून मानवता धोक्यात आली आहे' इचलकरंजीतील सामाजिक गुन्ह्यांची वाढती आकडेवारी लक्षात घेता याची तंतोतंत अनुभूती येते.

### ४.३. पर्यावरणीय समस्या

'निसर्गत: किंवा मानवाच्या कृतीमुळे एखाद्या घटकाचे किंवा पदार्थाचे नैसर्गिक प्रक्रियेवर झालेल्या आक्रमणामुळे नैसर्गिक घटकाचे कमी झालेले मूल्य म्हणजे पर्यावरण प्रदूषण'. हवा, पाणी, जमीन किंवा अन्न यांच्या भौतिक, रासायनिक, जैविक गुणधर्मात बदल घडून सजीव आणि मानवी संपत्तीवर परिणाम करणाऱ्या अपायकारक घटकांचा शिरकाव होय'. वाढत्या औद्योगिकरणामुळे हवा, पाणी, जमीन प्रदूषण मोठ्या प्रमाणात होवून मानवी जीवनावर व सजीवांच्यावर विपरीत परिणाम झालेले दिसून येतात.

### ४.३.१ पाणी प्रदूषण :

पाणी म्हणजे जीवनच पण आज पाणी प्रदूषणाने मानवी जीवनातच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला धोका उत्पन्न होत आहे. 'जागतिक आरोग्य संघटनेच्या मतानुसार पाणी प्रदूषण म्हणजे वेगवेगळ्या प्रदूषकांमुळे नैसर्गिक पाण्यातील भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्मामध्ये होणारा नकारात्मक बदल होय'. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अनेक उद्योगातून बाहेर पडणारे पाणी गटारीतून नदीत सोडले जाते. त्यामुळे नद्यांचे पाणी प्रदूषण वाढत आहे. आज एकही नदी प्रदूषित नाही असे म्हणता येणार नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदी तर गटारगंगा बनली आहे. '२००३ मधील एका भारतीय अहवालानुसार भारतातील फक्त ३० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. बाकीचे सर्व पाणी नद्यांना किंवा जमिनीवर सोडले जाते'.

इचलकरंजी शहरातील पाणी प्रदूषणाची समस्या गंभीर बनत चाललेली आहे. शहरातील १५० सायझिंग, १०० प्रोसेस व साखर कारखान्यातील पाणी गटारीच्या माध्यमातून पंचगंगा नदीत मिसळले जाते. 'प्रोसेस युनिटला दररोज २५ हजार लिटरपासून ६ ते ७ लाख लिटरपर्यंत पाण्याची गरज असते. डी.के.टी.ई. या संस्थेच्या अहवालानुसार पंचगंगा नदीच्या पाण्यात अनेक धोकादायक घटक आढळून आले आहेत. त्यामध्ये पीएच, बीओडी, एमपीएन इ. घटक जागतिक आरोग्य संघटनेने प्रमाणित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त आढळले आहेत. बीओडीचे घटक प्रमाणापेक्षा जास्त आढळणे हे पाणी प्रदुषित झाल्याचे प्रमुख लक्षण आहे. त्याचा परिणाम पाण्यातील ऑक्सिजनची गरज असलेले जलचर आणि वनस्पती ऑक्सिजन अभावी मृत्यूमुखी पडतात. पंचगंगा नदी पात्रात बऱ्याच वेळा मासे मृत्यूमुखी पडल्याचे दिसून आले आहे. पंचगंगा नदीच्या पाण्यात झिंकचे प्रमाण ५ मि.ग्रॅ. या प्रमाणित पातळीपेक्षा जास्त आढळले. हे मानवी आरोग्यास धोका निर्माण करणारे आहे. पाणी प्रदूषणामुळे जलजन्य रोगाचे प्रमाण या शहरात जास्त असल्याचे सर्वेक्षणावरून निदर्शनास आले आहे. त्यामध्ये गॅस्ट्रो, कावीळ, टॉयफॉइड, डिसेंन्ट्री इ. यामुळे लोकांचा आरोग्यावरील खर्च वाढत आहे, असे पाहणीवरून दिसून आले आहे. डब्ल्यू एच ओ च्या मते ६० टक्के रोग हे पाणी प्रदूषणानेच होतात. 'पर्यावरण दर्जा अहवालानुसार इचलकरंजी शहरातील सायजिंग, प्रोसेसिंगमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याचे बीओडी, सीओडीचे गुणधर्म हे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नॉर्मपेक्षा १००, २५० जास्त असल्याचे दिसून आले आहेत'.

### ४.३.२ ध्वनी प्रदूषण :

ध्वनी प्रदूषण ही आजच्या औद्योगिक युगातील नागरिकीकरणाचा, औद्योगिकरणाचा महत्त्वाचा व दुर्लक्ष न करता येण्यासारखा घटक म्हणावा लागेल. शहरी भागात वाढणाऱ्या कारखानदारीमुळे व वाहनांच्या बेसुमार वाढीमुळे ध्वनी प्रदूषणाची समस्या

गंभीर रूप धारण करू पाहते आहे. 'एखाद्या ठराविक ठिकाणी आवाजाची तीव्रता सहनशक्तीच्या पलीकडे गेली म्हणजे तो आवाज ऐकण्यास नकोसा वाटतो, त्याला ध्वनी प्रदूषण असे म्हटले जाते'. या ध्वनी प्रदूषणाची तीव्रता 'डेसीबल' या मापकाच्या साह्याने मोजली जाते. सतत एकसारखा आवाज कानावर पडल्याने डोके दुखणे, चिडचिडेपणा, बीपी वाढणे, कमी ऐकू येणे, कायमचा बहिरेपणा यासारख्या भयानक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. सर्वसाधारणपणे ५५ डेसिबल आवाज मानवाला सहन करण्यासारखा असतो. त्यापेक्षा जास्त आवाजाचा मानवी आरोग्यावर घातक परिणाम होत असतो. काही प्रमुख घटकांची आवाजाची तीव्रता पुढीलप्रमाणे :

१. मोटार सायकल, ट्रक – ११० डेसिबल

२. औद्योगिक कारखाना – ९० डेसिबल पेक्षा जास्त

३. यंत्रमागांचा आवाज –११० डेसिबल

४. लाऊड स्पीकरचा आवाज – ८० डेसिबल

हे घटक मानवाच्या आजच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा घटक बनलेले आहेत. यांच्या आवाजाची तीव्रता लक्षात घेता ध्वनी प्रदूषणाची कल्पना येवू शकते.

**तक्ता क्रमांक ३**
**ध्वनीची प्रमाणित पातळी**
**पर्यावरण आणि वन मंत्रालय ध्वनीची प्रमाणित पातळी db (A)** २६ डिसेंबर १९८९

| स्थानानुसार गटवारी | दिवसा ध्वनीची पातळी | रात्री ध्वनीची पातळी |
|---|---|---|
| औद्योगिक भाग | ७५ | ७० |
| व्यापारी भाग | ६५ | ५५ |
| निवासी भाग | ५५ | ४५ |
| शांत झोन | ५० | ४० |

वरील तक्यात पर्यावरण आणि वनमंत्रालयातर्फे प्रमाणित केलेली ध्वनीची प्रमाणित पातळी वेगवेगळ्या भागात दिवसा किती असावी व रात्री किती असावी हे दर्शवलेले आहे.

वस्त्रनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इचलकरंजीत यंत्रमागाचा खडखडाट रात्रंदिवस चालू असतो. हे यंत्रमाग शहर परिसरात विखुरलेले आहेत. या आवाजाचा त्रास यंत्रमागाजवळ घरे असणाऱ्यांना होत आहे. याशिवाय या यंत्रमागावर जे कामगार १० वर्षापेक्षा जास्त काळ काम करत आहेत, त्यांना कमी ऐकू येणे किंवा कायमचा बहिरेपणा अशा दीर्घकालीन घातक परिणामांना तोंड द्यावे लागत आहे. याशिवाय डोके दुखी, चिडचिडेपणा, रक्तदाब वाढणे यासारख्या समस्या भेडसावत आहेत. यंत्रमागाच्या आवाजाची तीव्रता ११० डेसिबल इतकी नोंदवली गेली आहे. त्यामुळे कामगारांना या ध्वनी प्रदूषणाची समस्या मोठ्या प्रमाणात जाणवत असली तरी पोटाची खळगी भरण्यासाठी याची त्यांना सवय झालेली आहे, याची प्रचिती आली. याशिवाय वाहनांच्या बेसुमार वाढीमुळे व औद्योगिक व्यवहारामुळे दिवसाच नव्हे तर रात्रीच्यावेळी सुध्दा निवासी भागात ध्वनीची तीव्रता ही ध्वनीच्या प्रमाणित पातळीपेक्षा जास्त असल्याचे पर्यावरण दर्जा अहवालात नोंदवली आहे. त्याचे विपरीत परिणाम मानवी आरोग्यावर विविध प्रकारे होताना दिसून येत आहेत.

### ४.३.३ हवा प्रदूषण:

पृथ्वीच्या सभोवताली असलेले हवेचे अवरण म्हणजेच वातावरण. या वातावरणातील घटकांचे विशिष्ट प्रमाण ठरलेले असते. यामध्ये नायट्रोजन ७८ टक्के, ऑक्सिजन २१ टक्के व उरलेल्या १ टक्क्यात इतर वायूंचा समावेश असतो. पण मानवी कृतीमुळे अनेक प्रदूषके वातावरणात

मिसळून हवेचे प्रदूषण घडून येते. 'डब्ल्यू एच ओ च्या मते निसर्ग निर्मित किंवा मानव निर्मित एखादा पदार्थ किंवा वायू बराच काळ वातावरणातील हवेत मिसळतो व तो वनस्पती, मानव प्राणी व मालमत्ता यांचा नाश करतो किंवा त्यांना घातक ठरतो त्याला हवा प्रदूषण म्हणतात' आजच्या आधुनिक काळात हवा प्रदूषण हा प्रश्न गंभीर बनला आहे. हवा प्रदूषण प्रामुख्याने शहरात मोठ्या प्रमाणात दिसून येते. औद्योगिकरणामुळे शहरे वाढली. वाहतुकीची साधने वाढून वर्दळही वाढली. या वाहनांसाठी लागणाऱ्या इंधन ज्वलनातून व औद्योगिक उत्पादनासाठी लागणाऱ्या इंधनाच्या ज्वलनातून कार्बन मोनॉक्साईड, कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड यासारखे अनेक विषारी वायू वातावरणात सोडले जातात. या विषारी प्रदूषकांमुळे रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण घटते, रक्त शुध्दीकरणाची प्रक्रिया मंदावते, मळमळणे, डोके दुखणे, मूर्च्छा येणे यासारखे विकार होतात. नायट्रोजन ऑक्साइड, मिथेन या वायूमुळे दमा, श्वसनाचे रोग, न्यूमोनिया, फुफ्फुसाचे रोग इ. विकार होतात.

इचलकरंजी शहरात वाहनांच्या धुरामुळे हवा प्रदूषणाची समस्या मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. 'पब्लिक हेल्थ इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिटयूट नागपूर, अहवालानुसार पाश्चिमात्य देशापेक्षा भारतात वाहनांची संख्या जरी कमी असली तरी त्यांच्याकडून होणारे हवेचे प्रदूषण हे त्यांच्या इतकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त आहे'. याचे कारण प्रदूषणाची तीव्रता ही इंजिनच्या रचनेवर व त्याच्या मेंटेनन्सवर अवलंबून असते. इचलकरंजी शहरातील सर्वेक्षणावरून असे दिसून आले की ५० टक्केपेक्षा जास्त व्यक्तींनी जुन्या वाहनांची खरेदी केलेली होती. त्यामुळे हवा प्रदूषणात या वाहनांचा वाटा जास्त आहे.

याशिवाय इचलकरंजी साखर कारखान्यातून बाहेर पडणारा धूर, काजळी हा ही हवा प्रदूषणाचा एक मुख्य स्रोत आहे. या कारखान्याच्या सभोवताली दोन कि.मी. अंतरावर राहणाऱ्या लोकांना त्याचा त्रास होतो आहे. धुराचे, बगॅसचे हजारो कण अंगावर, कापडावर, नाकातोंडात जावून मानवाचे आरोग्य धोक्यात आले आहे.

### ४.३.४ घनकचरा प्रदूषण :

आजच्या आधुनिक समाजाला चिंतेचा ठरणारा विषय म्हणजे घनकचरा प्रदूषण होय. वाढत्या औद्योगिकरणामुळे शहरे वाढली. शहरीकरणामुळे घरगुती कचरा, औद्योगिक कचरा, व्यावसायिक कचरा, जैविक कचरा प्रचंड प्रमाणात वाढला. संपूर्ण जगाला भेडसावणारा हा प्रश्न आहे. मुंबई, मद्रास, यासारख्या शहरात प्रति व्यक्ती ४.५ कि.ग्रॅ. ते ६ कि.ग्रॅ. दरदिवशी कचऱ्याची निर्मिती होते. कचऱ्याची योग्य विल्हेवाट योग्य वेळी लावली नाही तर मानवी आरोग्यास, पर्यावरणास तो घातक आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरून डासांचे साम्राज्य पसरते. त्यामुळे अनेक रोगांचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असते. याशिवाय पाणी प्रदूषण, जमीन प्रदूषण होण्यास मदत होते.

इचलकरंजी शहरात घनकचऱ्याचा प्रश्न गंभीर बनू पाहतो आहे. २००३ मध्ये ३६ टन कचऱ्याची निर्मिती झालेली होती. ती २००४ साली १०० टनापर्यंत वाढली तर २००५ मध्ये ती १४० टनापर्यंत वाढलेली दिसून येते. दरदिवशी प्रती व्यक्ती सर्वसाधारणपणे ०.५ कि.ग्रॅ. कचऱ्याची निर्मिती होते. या कचरा प्रदूषणामुळे बऱ्याच वेळा मानवाचे आरोग्य धोक्यात आलेले दिसून येते. शहराच्या जवळ असलेल्या काळा ओढा, कबनूर ओढ्यामध्ये कचऱ्यांचे ढीग बऱ्याच वेळा दिसून

आलेले आहेत.

एकूणच औद्योगिकरणामुळे शहराचा विस्तार उभा आणि आडवा अशा दोन्ही पध्दतीने होत गेला. औद्योगिकरणामुळे आर्थिक, सामाजिक क्षेत्रात अनेक बाबतीत विकास झाला असला तरी या औद्योगिकरणामुळे अनेक सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. औद्योगिकरणामुळे इचलकरंजी शहराची बेसुमार वाढ होवून घनता वाढली. गर्दीमुळे गलिच्छपणा वाढला, झोपडपट्ट्या वाढल्या. सामाजिक, आर्थिक, हिंसक गुन्ह्यांचे प्रमाण वाढले. स्त्री-पुरूष प्रमाणातील अंतर वाढले. एकूणच असुरक्षित समाजव्यवस्था उदयास येवून मानवांची मने दुभंगली असल्याचे दिसून येते. याचबरोबर औद्योगिकरणामुळे ही शहरे प्रदूषणाची आगार बनली आहेत. हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, घनकचरा प्रदूषण, जमीन प्रदूषण इ. मुळे संपूर्ण मानवाचे नव्हे तर संपूर्ण सजीवांचे जीवनच धोक्यात आले आहे. याबाबतीत ममफोर्ड म्हणतात, 'औद्योगिक शहरे ही राजकीय दृष्ट्या अस्थिर, सामाजिक दृष्ट्या घसरलेली, आर्थिकदृष्ट्या कमकुवत व जैविक दृष्ट्या घसरलेली दिसून येतात'.

## संदर्भ पुस्तके -


* पुजारी कृष्णकुमार- ''वैद्यकीय समाजशास्त्र'', कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद
* कदम एस.बी.- ''मानव पर्यावरण आणि प्रदूषण'', फडके प्रकाशन कोल्हापूर.
* सवदी ए.बी.- ''महाराष्ट्र''
* करपरगम एम- ''इन्व्हॉरमेंटल इकॉनॉमिक्स'', स्टरलिंग पब्लिशर्स प्रा.लि.
* चव्हाण बलभीम एल. पवार चंद्रशेखर, ढेरे अमर- ''पर्यावरण अभ्यास'' शब्दवेल प्रकाशन कोल्हापूर.
* नरसिंह गोपाळ देवधर - ''सुती वस्त्रोद्योग'' महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई.
* काचोळे दा.धो.- ''नागरी समाजशास्त्र'', कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद
* शर्मा के.के. - ''संदर्भ महाराष्ट्र''
* पर्यावरण दर्जा अहवाल, इचलकरंजी नगरपरिषद २००५, २००६
* डी.के.टी.ई. पंचगंगा पाणी प्रदूषण अहवाल.सोव्हिनिअर जागतिक वस्त्रोद्योग परिषद, इचलकरंजी २००७
* FRANK H.G., "THE STORY OF ICHALKARANJI", 1929
* Mohite R.D., "Textile Industry & Modernization".
* Sinha A.K. "Human Health & Environment"Volume-1 A.P.H. Publirhing Corporation, New Delhi 110002
* Monga G.S., "ENVIRONMENT AND DEVELOPMENT". Deep And Deep Publication Pvt Ltd New Delhi.
* Shrivarthave P.R.,& Shukla, GLOBAL ENVIRONMENTAL SERIES, ENVIRONMENTAL ECOLOGY." Volume 1,2,3,4,5.
* Report of the Committee Constitued By the Hon Supreme Court of India *"SOLI WASTE MANAGEMENT IN CLASS I CITIES"* March 1999.
* गॅझेट कोल्हापूर.
* योजना मासिक विविध अंक
* दै. महाराष्ट्र टाईम्स, विविध अंक.
* इंडियन एक्सप्रेस
* Orgl/wikil/textile indusry.
* Orgl/crisis/indust-pollution


***

# किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजना

**मारोती वीरभद्र तेगमपुरे**
औरंगाबाद
भ्रमणध्वनी - ९४२००७२९९२

भारतीय समाजासारखा विविधतेने नटलेला मानव समाज आजच्या जगातील फारच थोड्या देशात पहावयास मिळतो. धर्म, भाषा, वंश, कूळ पंथ आणि भौतिक संस्कृती आदी बाबतीत भारतीयांची विविधता हा समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञ यांच्या अभ्यासातील विशेष आवडीचा विषय आहे. सुमारे दहा लाख वर्षापूर्वी पृथ्वीवर मानवाची निर्मिती झाली असा जीवशास्त्रज्ञांचा दावा आहे. तेव्हापासून आतापर्यंत जगाच्या वेगवेगळ्या भागामध्ये अनेक मानव समूहांनी वास्तव केले. विविध गरजा भागविण्यासाठी निसर्ग संपत्तीचा वापर करीत असतांनाच मानवाने स्वत:ची बुध्दी वापरून विविध वस्तू आणि उपकरणे तयार केली. या सोबतच परस्पर विचार विनिमय, संवादासाठी भाषेचा विकास केला. परंतु याचबरोबर सर्वच मानवसमाज हा विकासाच्या एकाच अवस्थेत नसतो[१]. माणूस जन्माला येतो ते जगण्याचे काही मूलभूत अधिकार बरोबर घेवून[२], हे खरे असले तरी आदिवासी हा अतिमागास असल्याचे पहावयास मिळते. आदिवासी जमात ही जगाच्या सर्वच भागात आढळते. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. उदाहरणार्थ, अमेरिकेत त्यांना 'रेड इंडियन्स' म्हणतात, ऑस्टेलियात 'अॅबोरिजिन्स', युरोपीय देशामध्ये 'जीप्सी', तर अफ्रिकी आणि आशियाई देशामध्ये 'आदिवासी' या नावाने परिचित आहेत. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारतीय जमातीचे लोक हे भारतीय द्वीपकल्पातील आद्यनिवासी समजले जातात. भारतामध्ये सर्व-साधारणत: त्यांना आदिवासी म्हणजे मूळ निवासी असं म्हटलं जातं. तथापि भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के (२००१) लोकसंख्या असलेल्या या समूहास भारतीय राज्यघटनेनुसार 'अनुसूचित जमाती' असे वर्गीकृत करण्यात आले आहे.[३] हा शब्द प्रयोग त्या जनसमुदायाकरिता केला जातो. ज्यास भारताच्या राष्ट्रपतींनी भारतीय संविधानाच्या कलम ३४२ अन्वये प्रमाणित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखले जाते.[४]

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारतीय स्वातंत्र्याबरोबरच भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या सामाजिक आणि आर्थिक हितसंबंधाची जपवणूक व संरक्षण करण्यासाठी त्याचबरोबर सर्व प्रकारच्या शोषणांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी मूलभूत घटनात्मक तरतूदी केल्या गेल्या,[५] परंतु भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातल्या ह्या आदिवासी जमाती शिकार, मासेमारी आणि निसर्गनिर्मित शाकाहार यावरच निर्वाह करीत होत्या.[६] आदिवासींच्या जीवनात कमालीच्या दारिद्र्यामुळे, निकृष्ट व अपुऱ्या आहारामुळे त्यांचे पोषण व्यवस्थित होत नसे, कुपोषणामुळे त्यांच्यात मृत्यूचे प्रमाण अधिक होते. आदिवासी हा दुर्गम भागात राहात असल्याने वैद्यकीय मदत मिळणे कठीण जात असे, उपचाराऐवजी ते मंत्रातंत्राचाच उपयोग करत. थोडक्यात दारिद्र्य, कुपोषण, निरक्षरता या प्रश्नांनी आदिवासींना ग्रासून टाकले होते. भारतीय स्वातंत्र्याने आदिवासींना विशेष सवलती आणि संरक्षण देण्याची गरज व्यक्त केली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांची आखणी करून त्यांची अमलबजावणी करण्यात आली असली तरीही आज आदिवासींच्या जीवनात आमूलाग्र स्वरूपाचे बदल झाल्याचे आपणास पहावयास मिळत नाहीत. स्वातंत्र्योत्तर ६० वर्षानंतरही आदिवासी मध्ये मोठ्या प्रमाणात दारिद्र्य असून (ग्रामीण भागात ४५.८६ टक्के, शहरी भागात ३४.७५ टक्के (१९९९–२०००) आदिवासींमध्ये आजही साक्षरतेचे प्रमाण केवळ ४७ टक्के असल्याचे दिसून येते (२००१)[७]. देशातील आदिवासी आर्थिक दृष्ट्या फारच मागासलेले आहेत. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. सुमारे ८५ टक्के आदिवासी लोक शेतीवर उपजीविका भागवितात. त्यात ४० टक्के लोक शेती करणारे व ४५ टक्के लोक शेतमजूरी करणारे आहेत. शेती व्यतिरिक्त आदिवासी लोक चटया, टोपल्या तयार करणे, जंगलातील वनौषजे गोळा करणे, गवत कापणे इत्यादी धंदे करतात.[८]

## आदिवासी कोणास म्हणावे ?

आदिवासी समाज म्हणजे 'अतिप्राचीन समाज' किंवा 'अतिशय अप्रगत व गौणसमाज' असे समीकरण करणे चुकीचे आहे. मानवशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पध्दतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिमसमाज विषयीचे निर्माण झालेले अथवा केले गेलेले ग्रह दूर तर केलेतच; याच बरोबर आदिवासी कोणास म्हणावे याचे नेमकेपणाचे उत्तर दिले आहे. तज्ञांच्या मते नेमकेपणाने आदिवासी किंवा आदिम जमाती कोणास म्हणावे ते पहाणे आवश्यक आहे.

इंपिरिअल गॅझेटमध्ये आदिवासींची 'समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भूभागात राहणाऱ्या, सुरवातीस अंतर्विवाही असण्याची शक्यता असणाऱ्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समूच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.' अशी व्याख्या करण्यात आली आहे.

१९६२ मध्ये शिलाँग येथे झालेल्या आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची अशी व्याख्या केली आहे की, "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला, आदिवासी

समाज असे म्हणतात.''

गिलीन व गिलीन यांच्या मते, ''एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या गटाच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात.''

वरील व्यक्त केलेल्या आदिवासींच्या व्याख्येवरून आदिवासी समाजाची प्रमुख लक्षणे स्पष्ट होतात. आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टीने वेगळा असल्याचे दिसून येते. विशिष्ट भू-प्रदेश प्रमाण लघुत्ता,स्वत:ची स्वतंत्र बोलीभाषा परंतु लिपीचा अभाव, एकाच रक्त संबंधावर आधारित वेगळी जीवन पध्दती, साधी अर्थव्यवस्था,सामाजिक एकजिनसीपणा, इत्यादी वैशिष्ट्यांनी आदिवासी समाजाचे वेगळेपण सिध्द झाल्याचे दिसून येते.[९]

भारतीय आर्थिक नियोजनाची ५७ वर्ष पूर्ण झाली असतानाही येथील सामान्यांच्या विशेषत: आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत फारसा फरक पडल्याचे पहावयास मिळत नाही. या संदर्भात नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, ''देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी ती पुरेशी मात्र निश्चितच नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान जोपर्यंत उंचावणार नाही तोपर्यंत वाढत्या उत्पादनाच्या प्रमाणास अर्थ प्राप्त होणार नाही.आर्थिक विकासासोबतच सामान्य माणसांचे राहणीमान, आरोग्य, शैक्षणिक विकास यासह सामाजिक व आर्थिक सेवा-सुविधा उपलब्ध होणे, सामूहिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे हे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल.''[१०] सेन म्हणतात त्याप्रमाणे विकासाची प्रक्रिया चालविली गेली नसल्याचे दिसून येते. १९७९-८१ च्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आयोगाने असे मत व्यक्त केले की, ''रोजगारीचा दर कमी आणि उपभोग खर्चाचा दर जास्त असल्यामुळे या जाती आणि जमातीमध्ये दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. या समूहाचे दारिद्र्य निर्मूलन एकाच उद्दिष्टांमुळे शक्य आहे ते म्हणजे न्यायासह सामाजिक व आर्थिक विकास करणे हे होय''[११] हे ध्येय साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या समूहांसाठी विशिष्ट अशा स्वरूपाच्या विकास योजनांची आखणी करण्यास सुरूवात झाली. त्या अनुषंगानेच आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून, केंद्र सरकारने आदिवासी विकासासाठी एकात्म क्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब करून १९७५-७६ साली **'आदिवासी उप-उपयोजना'** तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य शासनास दिले. ही आदिवासी उपयोजना देशातील सतरा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ठराविक निवडक क्षेत्रांना लागू करण्यात आली. ते येणेप्रमाणे - आसाम, आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, बिहार, केरळ, मध्यप्रदेश, मणिपूर, ओरिसा, राजस्थान, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपूरा, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र ही राज्ये (सुरूवातीच्या काळात) तर अंदमान आणि निकोबार व दमण आणि दीव या दोन केंद्रशासित प्रदेशात उपयोजना लागू करण्यात आली. नंतरच्या काळात जम्मू आणि काश्मीर, उत्तरांचल, झारखंड, छत्तीसगड या राज्यांनाही उपयोजना लागू झाली.[१२] यानुसार महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यातील ७३ तालुक्यातील ६७६७ गावांचा उपयोजनेत समावेश करण्यात आला. यामध्ये ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर,

वर्धा, यवतमाळ, नांदेड या जिल्ह्याचा समावेश करण्यात आला.[१४] मराठवाड्यातील एकमेव किनवट तालुक्याला (नांदेड) आदिवासी उपयोजना लागू झाली.

**आदिवासी उप-योजनेची उद्दिष्ट्ये :**[१५]

१.सर्व स्तरावर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे व त्याकरिता प्रभावी यंत्रणा राबविणे.

२.समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आदिवासी समाज अलग पडला आहे. त्याला मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे, त्याकरिता दळणवळणाची साधणे वाढविणे, शैक्षणिक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादन पध्दतीची माहिती करून देणे.

३.आदिवासीमध्ये विकासाचा अभाव आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय व शोषण यामुळे त्यांच्या जीवनात उदासीनता आहे. ती दूर करण्यासाठी आदिवासी तरूणांना व त्यांच्यातील नव्या नेतृत्त्वाला स्वत:चा विकास करण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे.

४.तोट्यात जाणारी आदिवासींची शेती किफायतशीर होऊ शकेल अशी उपाय योजना करणे व त्यायोगे आदिवासींचे जीवनमान उंचावणे.

५.आदिवासी विभागात शेती व्यवसायाला पूरक धंद्याचा अभाव आहे, तो दूर करणे.

६.आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पध्दतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थाचे जाळे पसरून त्याद्वारा पतपुरवठा करणे, आदिवासींच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.

**आदिवासी उप-योजनेअंतर्गत कार्यक्रम :**

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आदिवासी उपयोजनेच्याद्वारे आदिवासींचा एकंदरीतच सामाजिक आणि वैयक्तिक विकास घडवून आणण्यासाठी पुढील कार्यक्रमांची/योजनांची आखणी करण्यात आलेली आहे. राज्यात १२ मुख्य शीर्षांतर्गत अनेक उप-योजना राबविल्या जातात. याच १२ मुख्य शीर्षांतर्गत किनवट मध्येही उप-योजना कार्यक्रम राबविला जातो. तो याप्रमाणे – १.कृषी व संलग्न सेवा २. ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम ३. पाटबंधारे व पूरनियंत्रण ४. विद्युत विकास ५.उद्योग व खनिजे ६. वाहतूक व दळणवळण ७. सामान्य आर्थिक सेवा व पर्यटन ८.सामाजिक व सामूहिक सेवा ९. आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रम १०. मागासवर्गीयांचे कल्याण, ११. कामगार व कामगार कल्याण १२. पोषण [१६] – इत्यादी मुख्य शीर्षांतर्गत अनेक उपकार्यक्रम राबवले जातात.

या कार्यक्रमाचे फलित काय आहे हे पाहण्याच्या दृष्टीने उप-योजनेचा अभ्यास करणे गरजेचे होते. यासाठी– १. आदिवासी उप-योजनेवरील खर्चाची प्रवृत्ती. २. आदिवासी उप-योजनेतील प्रत्येक विकास शीर्षावरील खर्चाचे वाटप. ३. या उप-योजनेतील निश्चित केलेल्या विकास शीर्षांचा आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर झालेला परिणाम. ४. आदिवासी उप-योजनेची निश्चित केलेली उद्दिष्ट्ये किनवट तालुक्यात कितपत साध्य झाली. या विषयाची त्रोटक मांडणी करून आदिवासी उप-योजनेचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

या अभ्यासासाठी दुय्यम आधार सामुग्रीचा उपयोग मोठ्या प्रमाणात करण्यात आला असून अभ्यासाच्या कालखंडातील (१९८५-२००४) किनवट तालुक्याच्या पातळीवरील विविध आकडेवारीचा उपयोग करण्यात आला आहे.

अभ्यासात प्राथमिक आधार सामुग्रीचाही वापर करण्यात आला असून, 'आदिवासी उप-योजनेचा' प्रत्यक्ष आदिवासींच्या जीवनावर काय

परिणाम झाला आहे. या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेच्या प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे सर्व्हेक्षण केले आहे, यासाठी तालुक्यातील १९१ गावापैकी १३५ गावे आदिवासी उप-योजनेखाली येतात. पैकी १५ गावातील (११.११ टक्के) लाभार्थ्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. प्रत्यक्ष उपलब्ध झालेल्या वेगवेगळ्या योजनेच्या ६६६ लाभार्थ्यांकडून १३० (१९.५२%) लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्व्हेक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीमध्ये एकूण ७१ प्रश्न विचारण्यात आले असून त्यांची विभागणी तीन विभागात केली होती. ती अशी १. लाभार्थींच्या सामान्य माहितीच्या संदर्भात २३ प्रश्न २. आदिवासी उप-योजनेच्या संदर्भात ३० (४२.२५%) प्रश्न आणि ३. लाभार्थ्यांच्या प्रगती संदर्भात १८ (२८.३५%) प्रश्न होते.

## किनवट तालुक्यातील आदिवासी :

मूलत: आदिवासी हा अनेक उप-जमातीचा मिळून बनलेला एकसंघ मानव समूह आहे . पूर्वी या सर्व मानव समूहात रोटी-बेटी व्यवहार होत असे. सर्व समुदाय गुण्यागोविंदाने राहात असत, परंतु परकीयांच्या आक्रमणाने त्यांच्या एकतेला सुरूंग लावला. हिंदू धर्मियांच्या जाचक वर्ण व्यवस्थेने (आदिवासी हिंदू नसतानाही) त्यांचे सुंदर रूप कुरूप करून टाकले. परंतु प्रादेशिक भिन्नता वगळल्यास आजही आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा या सारख्याच असल्याचे पहावयास मिळते[१७].

किनवट तालुक्यातील गौंड, आंध, परधान, भिल्ल आणि कोलाम या आदिवासी जमाती परिसरातील जंगल भागात असलेल्या तांड्यावर, वाड्यावर आणि खोऱ्यामधून राहतात. प्रत्येकाचे वेगळे असे तांडे नाहीत. त्यामुळे निरनिराळ्या जमातींची वैशिष्ट्ये घेऊन एक वेगळाच आदिवासी संस्कृती धर्म आकाराला आलेला आपणास या परिसरात पहावयास मिळतो. परिसरातील सर्वच आदिवासींची राहणी अत्यंत साधी आहे. किनवट तालुक्यातील आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे विश्लेषण आपणास पुढील काही बाबींतून करता येईल.

२००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यात आदिवासींची लोकसंख्या ५८ हजार ५२७ इतकी असून यामध्ये २९ हजार १३ इतक्या आदिवासी स्त्रिया आहेत. तालुक्यातील आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात दारिद्र्य असून एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ८८ टक्के आदिवासी हे दारिद्र्य रेषेच्याखाली जीवन जगतात. तालुक्यातील शेती आणि शेतमजूरी करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण ९५ टक्के इतके अधिक असून यामध्ये ३३.६७ टक्के आदिवासी शेती तर ६१.२७ टक्के आदिवासींची संख्या शेतमजूरी करून आपला उदरनिर्वाह करते. तालुक्यातील आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण ३६.०९ टक्के इतके कमी आहे.[१८]

## मूल्यमापन :

किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनेचा लाभ घेण्यासाठी तयार करावयाच्या प्रस्तावाकरिता ५१.५४ टक्के लाभार्थ्यांना जवळपास २० दिवसांचा अवधी लागला आहे. २६.९२ टक्के लाभार्थ्यांना २१-४० दिवसांचा अवधी लागला आहे. तर ४१-१०० व १०१-२०० दिवस लागणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण ५.३८ टक्के इतके सारखे असून बरेच दिवस (एक वर्ष) लागणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण १.५४ टक्के आहे. तर ९.२३ टक्के लाभार्थ्यांनी या संदर्भातील माहिती देण्यास नकार दर्शविला असून, या कालावधी बरोबरच

नमूना निवडीतील लाभार्थ्यांना उप-योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव तयार करीत असताना आलेल्या खर्चाची विचारणा केली असता यामध्ये एकूण निवडलेल्या नमून्यातील लाभार्थ्यांना आलेला खर्च येणेप्रमाणे-२६.९२ टक्के लाभार्थ्यांना ५०० ते १००० रूपये इतका खर्च आला आहे. १००१ ते २००० रूपये खर्च आलेले लाभार्थी ३१.५४ टक्के असून ०.७८ टक्के लाभार्थ्यास ५०००-१०,००० रूपये खर्च आला आहे तर ८.४६ टक्के नमूना निवडीतील लाभार्थ्यांनी या संदर्भातील माहिती देण्यास नकार दर्शविला आहे.

आदिवासी उप-योजनेचा लाभ घेण्यापूर्वी लाभार्थ्यांच्या कर्जबाजारीपणाच्या आकडेवारीचे अवलोकन केल्यास असे दिसते की, ३३.८५ टक्के लाभार्थ्यांनी कर्जासंबंधी माहिती देण्यास नकार दर्शविला आहे तर ४३.०७ टक्के लाभार्थ्यांनी सावकारांचे कर्जबाजारी असल्याचे मत नोंदवले असून नातेवाईकांकडून कर्ज घेणाऱ्या आदिवासींचे प्रमाण २६.७६ टक्के इतके आहे. अन्य मार्गाने कर्ज घेणारे लाभार्थी १.५४ टक्के आहेत तर बँकांद्वारे कर्ज घेणारे लाभार्थी जवळपास २७ टक्के इतके आहेत.

किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या मदतीचा उपयोग निवडलेल्या नमून्यातील लाभार्थ्यांपैकी ५५.५८ टक्के लाभार्थ्यांनी ज्या उद्दिष्टांसाठी मदत मिळाली त्याच उद्दिष्टांसाठी त्या मदतीचा उपयोग केला आहे तर ५.३८ टक्के लाभार्थ्यांनी मुलीच्या लग्नासाठी, ४.६२ टक्के लाभार्थ्यांनी मुलाच्या शिक्षणाकरिता घेतलेले कर्ज परत करण्यासाठी आणि दैनंदिन खर्च भागविण्यासाठी २.२१ टक्के लाभार्थ्यांनी या लाभाचा उपयोग केला आहे. उपरोक्त बाबीवर खर्च न करता ८.४६ टक्के लाभार्थ्यांनी या शिवाय अन्य बाबींवर या लाभाचा उपयोग केला असून १२.३० टक्के लाभार्थ्यांनी या संबंधीची माहिती देण्यास नकार दर्शविला आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ९.२३ टक्के लाभार्थ्यांना उप-योजनेचा प्रत्यक्ष लाभच मिळाला नाही. याचा अर्थ असा की, यांची नावे लाभार्थी म्हणून परस्पर दप्तरात नोंदवून लाभ उचलण्याचा प्रकार यंत्रणेकडून झाला असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. केवळ १६.१५ टक्के आदिवासी लाभार्थ्यांना मंजूर झालेली सर्व रक्कम मिळाली आहे. विशेष म्हणजे ३८.४६ टक्के लाभार्थ्यांना मंजूर झालेल्या रक्कमेपेक्षा प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम कमी मिळाली आहे. निवडलेल्या नमून्यातील १३.८५ टक्के लाभार्थ्यांना उप योनजेअंतर्गत प्रत्यक्ष साहित्यच मिळाले असून मंजूर झालेल्या रक्कमेची कुठलीच माहिती नसणाऱ्यांचे प्रमाण २.३१ टक्के इतके आहे तर या संबंधीची माहिती देण्यास नकार देणाऱ्यांचे प्रमाण २० टक्के इतके मोठे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासकीय दप्तरात ज्यांची लाभार्थी म्हणून नोंद असूनही प्रत्यक्ष लाभ न मिळणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण ९.२३ टक्के असून हे प्रमाण आदिवासी उप-योजनेच्या कारभारातील उणीवा आणि अकार्यक्षमता दर्शविते. यावरून आपणास असे म्हणता येईल की, आदिवासी उप-योजनेचा लाभ हा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत न पोहचता तिसऱ्याच कुणाकडे तरी वळतो.

## १.आदिवासी उप-योजनेवरील खर्चाची प्रवृत्ती :

किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनेवर करण्यात आलेल्या खर्चाच्या प्रवृत्तीची आकडेवारी तक्ता क्र. १ मध्ये दिली आहे.

### तक्ता क्र. १
### किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेवरील खर्च

रूपये लाखात

| वर्ष | नियतव्यय | प्रत्यक्ष झालेला खर्च | प्रत्यक्ष खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १९८९-९० | २८०.११ | २९८.७३ | १०६.६५ |
| १९९०-९१ | २८८.४५ | ४५६.७८ | १५८.३५ |
| १९९१-९२ | ४१६.०१ | ७६०.३८ | १८२.७७ |
| १९९२-९३ | ३५४.७८ | ९३७.४८ | २६४.२४ |
| १९९३-९४ | ४५४.९२ | ४२३.४८ | ९३.०८ |
| १९९४-९५ | ५३८.४३ | ४७४.८२ | ८८.१८ |
| १९९५-९६ | १०३७.२६ | ८५२.२७ | ८२.१६ |
| १९९६-९७ | १२६०.३६ | १०६५.१३ | ८४.५० |
| १९९७-९८ | १३६०.१० | १३३२.३४ | ९७.९५ |
| १९९८-९९ | ८०५.१५ | १२५६.२१ | १५६.०२ |
| १९९९-२००० | ८१७.६० | १४८६.१६ | १८१.७७ |
| २०००-२००१ | ६८०.३२ | ७४५.३४ | १०९.५५ |
| २००१-२००२ | ७११.८५ | ४५६.४३ | ६३.४८ |
| २००२-२००३ | ६५३.३७ | २७६.६२ | ४२.३३ |
| २००३-२००४ | ६५३.५४ | २४२.९७ | ३७.१७ |
| एकूण | १०३२१.८१ | ११०६५.०६ | १०७.२० |

स्त्रोत : नांदेड जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना मासिक प्रगती अहवाल १९८९-९० ते २००३-०४

किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेवरील खर्चाच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, १९८९-९० ते २००३-२००४ या काळात नियतव्ययामध्ये सातत्य नसल्याचे पहावयास मिळते. १९८९-९० मध्ये २८०.११ लाख नियतव्यय होते तर यामध्ये वाढ होत जावून १९९७-९८ मध्ये १३६०.१० लाख रूपये वाढल्याचे दिसते. यानंतर नियतव्ययामध्ये घट होऊन २००३-२००४ मध्ये ६५३.५४ लाख रूपयापर्यंत घट झाल्याचे दिसून येते. म्हणून नियतव्ययामध्ये (१९८९-९० ते २००३-२००४) या काळात केवळ २.३३ पटीने वाढ झाली (तक्ता क्रमांक १).

प्रत्यक्ष खर्चाची परिस्थिती ही नियतव्ययापेक्षा वेगळी नाही. १९८९-९० मध्ये रू.२९८.७३ लाख प्रत्यक्ष खर्च होता तर यामध्ये वाढ होऊन १९९९-२००० मध्ये रू. १४८६.१६

लाख इतका झाला. पुन्हा यामध्ये घट होऊन २००३-०४ मध्ये १९८९-९० च्या खर्चापेक्षा कमी म्हणजे रू. २४२.९७ लाख इतका खाली आला. १९८९-९० च्या तुलनेत २००३-०४ मधील प्रत्यक्ष खर्चामध्ये वाढ होण्याऐवजी या काळात ०.९९ पटीने घटच झाली आहे.

१९८९ मध्ये नियतव्ययाच्या १०६.६५ टक्के प्रत्यक्ष खर्च होत होता तर १९९१-९२ व १९९२-९३ मध्ये अनुक्रमे १८२.७७ आणि २६४.२४ टक्के खर्च झाल्याचे दिसते. यानंतर खर्च हा नियतव्ययापेक्षा सतत कमी झाला. २००३-०४ मध्ये तर नियतव्ययाशी प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण हे केवळ ३७.१७ टक्के इतके कमी झाल्याचे पहावयास मिळते. या पंधरा वर्षाच्या काळातील नियतव्ययाशी प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण १२३.७६ टक्के इतके असल्याचे दिसते.

## २. किनवट तालुक्यातील आदिवासी उपायोजनेवरील खर्च :

आदिवासी उप-योजनेवरील खर्चाचे वाटप कशा पध्दतीने झाले याचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे. एक बाब प्रकर्षाने जाणवते ती अशी की, बहुतेक आदिवासी शेती व्यवसायात गुंतलेले असल्यामुळे त्यांच्या शेतीच्या विकासासाठी शासनाने प्राधान्याने खर्च करावयास हवा होता; परंतु आकडेवारीवरून तसे झाल्याचे दिसत नाही.

१९८९-१९९० ते २००३-२००४ या काळात शीर्षनिहाय खर्चाची (तक्ता क्र.२) स्थिती पाहिल्यास असे लक्षात येते की, कृषी व संलग्न सेवांवर १९८९-९० मध्ये प्रत्यक्ष खर्च हा नियतव्ययाच्या ९६.११ टक्के केला जात होता. तर २००३-२००४ या वर्षी हा खर्च ४२.६४टक्के इतका कमी झाला. दरम्यानच्या काळात या विकास शीर्षावरील प्रत्यक्ष खर्चात ०.४४ पटीने घट झाली. या काळात ग्रामीण विकासावरील विशेष कार्यक्रमावर करण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चात मात्र ०.२५ टक्क्याने घटच झाल्याचे दिसते. पाटबंधारे व पूरनियंत्रणावर १९८९-९० मध्ये ९९.३९ टक्के खर्च केला जात होता, २००३-२००४ या वर्षी हा खर्च २.३६ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. या काळात पाटबंधारे व पूरनियंत्रणावरील प्रत्यक्ष खर्चात ०.०२३ पटीने घट झाली आहे. उपरोक्त काळात विद्युत विकास या शीर्षावर केला गेलेला खर्च हा जवळपास स्थिर असल्याचे दिसते.

दुसरी बाब अशी की, जेव्हा आदिवासी शेतकरी सीमान्त शेतकरी बनतो व दुसरा उद्योग शोधतो अशावेळी शासन पूरक उद्योग निर्माण करून त्यांना उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेत समाविष्ट करते. त्यासाठी तरतूदही करावी लागते. परंतु तक्त्यातील आकडेवारी असे स्पष्ट करते की, उद्योगासाठी तरतूद आणि प्रत्यक्ष खर्चात १९८९-९० ते २००३-२००४ या काळात घटच झाली आहे. मात्र या काळात नियतव्ययाशी प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण वाढले असले तरी (१९८९-९० ला १.९६ टक्के होते ते २००३-२००४ मध्ये ३६.६६ इतके झाले आहे.) या काळात १९९२-९३ व १९९९-२००० या दोन वर्षाचा अपवाद वगळता कधीही नियतव्ययाइतका प्रत्यक्ष खर्च या विकास शीर्षावर केला गेला नाही. सामाजिक व सामूहिक क्षेत्रावर केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष खर्चात मोठ्या प्रमाणात कपात झाल्याचे पहावयास मिळते. १९८९-९० ला ८५.१४ टक्के प्रत्यक्ष खर्च केला जात होता तर २००३-२००४ मध्ये हा खर्च २९.१९ टक्के इतका कमी झाला आहे. या काळात सामाजिक व सामूहिक सेवावरील प्रत्यक्ष खर्चामध्ये ०.३४ पटीने वाढ झाल्याचे स्पष्ट होते. एकूणच विकास शीर्षनिहाय खर्चाचे वाटप होत असताना ते विवेकी झाले नाही असेच दिसते. आवश्यक बाबींवर कमी तर कमी महत्त्व असलेल्या

## तक्ता क्र. २

### किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेवरील शीर्षनिहाय खर्च टक्केवारी*

| वर्ष / शीर्ष | कृषी व संलग्न सेवा | ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम | पाटबंधारे व पूरनियंत्रण | विद्युत विकास | उद्योग व खाणकाम | वाहतूक व दळणवळण | समाजिक व सामूहिक सेवा | सरासरी खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८९-९० | ९६.९९ | २३३.५३ | ९९.३९ | १००.०० | १.९६ | ९१.१९ | ८५.१४ | १०१.१६ |
| १९९०-९१ | ४९.६६ | ४३३.८१ | ११०.१० | १००.०० | ४.३० | २००.४६ | ८२.८७ | १४०.९७ |
| १९९१-९२ | ७५.८५ | २७५.८९ | ७८.४४ | १०१.२६ | ९६.८७ | २००.२१ | १०७.५० | १३४.८६ |
| १९९२-९३ | ५२.५३ | ९०२.८४ | ६९.०१ | १००.०० | १००.०० | २८८.८३ | ९५.८६ | २२९.८६ |
| १९९३-९४ | ४२.१८ | ९१.९५ | ६१.०६ | १००.०० | ४८.८० | १०७.३२ | ११४.५६ | ८०.५४ |
| १९९४-९५ | ६१.४९ | ७४.६८ | ७५.०३ | १००.०० | ४७.६६ | ४१.२३ | १५७.३१ | ७९.६३ |
| १९९५-९६ | ६९.७० | ६६.२४ | ८२.६० | १००.०० | ५८.७० | ९६.२६ | ८५.२० | ७९.८१ |
| १९९६-९७ | ४२.४९ | ७८.६८ | ९३.९१ | ७६.६८ | ३१.८५ | १२६.३९ | ८४.८४ | ७६.४१ |
| १९९७-९८ | ९४.३४ | २७०.३९ | ७३.९५ | १००.०० | १७.४१ | १३०.०२ | ५६.२६ | १०६.०५ |
| १९९८-९९ | ७५.६७ | ५०५.३७ | ५४.९२ | १०३.६५ | ९.६७ | १७१.५८ | १२०.८८ | १४८.८२ |
| १९९९-२००० | १०३.३२ | ६२७.०८ | ७७.८५ | १०२.६९ | ११६.१५ | २५०.६५ | ९२.५९ | २०७.१९ |
| २०००-२००१ | ७२.४५ | ५१.६८ | ८७.४४ | १००.०० | ५०.८३ | ४७७.५४ | ७९.७५ | १३१.३८ |
| २००१-२००२ | ५६.६६ | ४६.२९ | ४६.२१ | १००.०० | ६४.२८ | ८९.४१ | ६८.८८ | ६७.४ |
| २००२-२००३ | ४७.०९ | ३६.९६ | ४६.२७ | १००.६४ | ३२.७२ | ५५.८३ | ३६.९१ | ५०.९२ |
| २००३-२००४ | ४२.६४ | ५१.१२ | २.३३ | १००.८३ | ३६.६६ | ४९.६६ | २९.११ | ४५.७८ |
| सरासरी | ६५.५३ | २५०.३० | ७०.५७ | ९९.५८ | ५३.१९ | १५८.४४ | ८६.५२ | ११२.०० |

स्त्रोत : नांदेड जिल्हा वार्षिक आदिवासी उप-योजना मासिक प्रगती अहवाल १९८९-९० ते २००३-०४

टीप : *नियतव्ययाशी प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी.

बाबींवर जास्त अशीच स्थिती निदर्शनास येते (तक्ता क्रमांक २)

### आदिवासी उप-योजनेविषयी लाभार्थ्यांचा अभिप्राय/प्रतिक्रिया :

किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेच्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करीत असताना उपाययोजनेच्या लाभार्थ्यांनी नोंदवलेल्या अभिप्रायातून काही महत्त्वपूर्ण बाबी समोर आल्या आहेत. त्या संक्षिप्तरूपाने येणे प्रमाणे -

१.आदिवासी उप-योजना चांगली असून, योजनेची अंमलबजावणी कागदोपत्री चालते. खऱ्या व गरजू आदिवासींना लाभ दिला जात नाही. उप-योजनेत अधिकारी व पुढारी भ्रष्टाचार करतात.अधिकाऱ्यांच्या बाबतीत अत्यंत वाईट अनुभव असून उप-योजनेचा सविस्तर प्रचार केला जात नाही. कुठल्याही योजनेचा

उद्देश योजना दलाला मार्फत राबवून पूर्ण होत नाही. यामुळे आदिवासींचा विकास हा आहे त्या ठिकाणीच आहे.

२.उप-योजनेचा लाभ योग्य वेळी न मिळाल्याने अपेक्षित लाभ झाला नाही.

३.उप योजनेद्वारे विहीर मिळाली पण मोटर/वीज यंत्र नाही त्यामुळे विहीरीचा फायदा होत नाही.

४.उप-योजनेद्वारे विद्युत पंप मिळाला पण शेतात वीज पुरवठाच नाही

५.उप-योजनेचा फायदा घेण्यासाठी कर्ज काढून अधिकाऱ्यास पैसे दिले त्यामुळे कर्ज फेडण्यासाठी योजनेद्वारे मिळालेले साहित्य विकावे लागले.

६.आदिवासी उप-योजनेत अधिकारी/पुढारी भ्रष्टाचार करतात यामुळे आदिवासींची प्रगती होण्याऐवजी अधोगतीच होत आहे. शासनाने या संदर्भात चौकशी करावी.

**अभ्यासाचे निष्कर्ष :**

१.किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेसाठी करण्यात आलेल्या नियतव्ययापैकी १९८९-९० ते २००३-०४ या पंधरा वर्षाच्या काळात सात वर्ष खर्च १००% किंवा यापेक्षा अधिक राहिला आहे तर अभ्यास काळातील हा खर्च आठ वर्ष १००% पेक्षा कमी राहिला असून २००२-०३ व २००३-०४ या वर्षी अनुक्रमे ४२.३३% व ३७.१७% इतका कमी करण्यात आला. म्हणजेच आदिवासी उप-योजनेवरील खर्चाच्या प्रवृत्तीत कायम चढ-उतार झाले आहेत. असे होणे आदिवासीच्या विकास प्रक्रियेस खीळ बसविणारे आहे.

२.अभ्यास काळात तालुक्यातील आदिवासी उप-योजनेवर खर्च करीत असताना वाहतूक व दळणवळण या विकास शीर्षावर आदिवासी उप-योजनेवरील प्रत्यक्ष खर्चाच्या सरासरी १५८.४४% केला गेला तर ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम या विकास शीर्षावर सरासरी २५०.३०% (सर्वाधिक) करण्यात आला. उर्वरित सर्वच विकास शीर्षावरील प्रत्यक्ष खर्च हा सरासरी १००% पेक्षा कमी केला गेला आहे. यावरून असे म्हणता येईल की, आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी कोणत्या विकास शीर्षावर किती खर्च करणे गरजेचे आहे, याचे नियोजन करण्यात शासन आणि शासकीय यंत्रणा अकार्यक्षम ठरली आहे.

३.तालुक्यातील ५०% आदिवासी लाभार्थी अजूनही निरक्षर असून ३३% आदिवासींचे केवळ प्राथमिक शिक्षण झाले आहे. आदिवासी उप-योजनेद्वारे शिक्षणावर खर्च करूनही आदिवासी निरक्षरतेचे प्रमाण कमी करणे शक्य झाले नाही.

४.तालुक्यातील निवडलेल्या नमून्यातील जवळपास ४% लाभार्थ्यांना आदिवासी उप-योजनेसंदर्भातील कुठलेच ज्ञान नाही तर २५% लाभार्थ्यांना नातेवाईकाकडून उप-योजनेची माहिती मिळाली आहे. १६% लाभार्थ्यांनी स्वत:हून उप-योजनेची माहिती करून घेतली आहे. विशेष म्हणजे शासकीय यंत्रणेकडून उप-योजनेची माहती ४.६१% लाभार्थ्यांना मिळाली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, उप-योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा अपयशी ठरली आहे. आदिवासी उप-योजनेचा लाभ घेण्यासाठी दाखल करावयाच्या प्रस्तावास मोठ्या प्रमाणात वेळ आणि खर्च करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले असून ५० रूपया पासून १० हजार रूपयापर्यंत खर्च येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर प्रस्ताव मंजूर होण्यासाठी १० दिवसापासून ते एक वर्षाचा अवधी लागत असल्याचे अभ्यासात आढळून आले आहे.

५.आदिवासी उप-योजनेच्या लाभार्थ्यांचा प्रस्ताव कमी वेळात मंजूर होण्याऐवजी वाजवीपेक्षा जास्त वेळ लागणे हे योजनेच्या अंमलबजावणीतील अपयश तर आहेच शिवाय यंत्रणा अकार्यक्षम असल्याचे लक्षण दर्शविणारे आहे.

६.किनवट तालुक्यातील नमूना निवडीतील ४४% आदिवासींनी वर्षाकाठी ५१ ते १०० दिवस रोजगार प्राप्त होतो. तर ३०% आदिवासी लाभार्थ्यांना

वर्षातून १०१ ते १५० दिवस रोजगार उपलब्ध होतो. या रोजगाराच्या मोबदल्यात दिली जाणारी मजूरीही अल्पच असल्याचे दिसून आले. ६२% लाभार्थ्यांना दिवसाकाठी रू. ४१ ते ५० इतकी मजूरी प्राप्त होते तर ३५% आदिवासींना केवळ रू. १० ते ४० पर्यंतच मजूरी मिळते. यावरून असे दिसून येते की रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना आणि एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमावर नियतव्ययापेक्षाही मोठ्या प्रमाणात अतिरिक्त केला जाणारा प्रत्यक्ष खर्च नेमकेपणाने कुणाच्या रोजगारासाठी खर्च केला जातो, हा प्रश्न पडतो. म्हणून या शीर्षावर होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा अपव्ययच झाला असे म्हणावे लागेल.

७.आदिवासी उप-योजनेच्या माध्यमातून आदिवासींना मंजूर झालेली रक्कम आणि प्रत्यक्ष मिळालेली रक्कम यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक आहे. विशेष म्हणजे ९% लाभार्थ्यांची शासकीय दप्तरात लाभार्थी म्हणून नोंद आहे, परंतु त्यांना प्रत्यक्ष लाभ मात्र मिळाला नाही, याचा अर्थ असा होतो की, आदिवासी उप-योजनेचा लाभ हा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहचतच नाही. यावरून आदिवासी उप-योजनेची अंमलबजावणी सदोष दिसून येते.

८.किनवट तालुक्यातील आदिवासी खेड्यात अजूनही आरोग्याच्या सोयीचा, पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा सोयीचा अभाव आहे. आदिवासी खेड्यात पिण्याच्या पाण्याची दारूण अवस्था आजही आहे. त्यांना नाल्याचे, विहीरीचे, शेत तळ्यातील पाणी पिण्यासाठी वापरावे लागते. या योजनेतील उप-योजनेअंतर्गत आदिवासी खेड्यातील स्वच्छता व पाणी पुरवठ्यावर बऱ्यापैकी खर्च होऊनही स्वच्छता आणि पाणी पुरवठ्याची खेड्याची दुर्दशा काय सांगते? एवढा खर्च करूनही आदिवासींना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळू नये यापेक्षा दुर्दैव कोणते.

**संदर्भ :**


१.तेगमपुरे मारोती, किनवट तालुक्यातील आदिवासी उप-योजनेचे मूल्यमापन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (अप्रकाशित शोध प्रबंध) २००५, पृ.क्र. ४

२.वाघमारे जनार्धन, सामाजिक न्याय संकल्प आणि सिध्दी, डॉ. लुलेकर प्रल्हाद (संपा.) जातक 'दत्ता भगत गौरव ग्रंथ', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २००५, पृ.क्र. २५.

३.वर्मा आर.सी., भारतीय जमाती-काल, आज आणि उद्या, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, २००३, पृष्ठ क्र.१.

४.तत्रैव (तेगमपुरे मारोती) पृष्ठ क्र. ४.

५.तत्रैव, पृ.क्र. ७.

६.संझगिरी प्रभाकर, मानवाची कहानी, मुंबई श्रमिक संघ, मुंबई, १९९९, पृ.क्र. ८०.

७.तत्रैव (तेगमपुरे मारोती)

८.गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २०००, पृ.क्र. ११

९.तत्रैव (तेगमपुरे मारोती) पृष्ठ क्र. ५

१०.Sen A.K., Poverty, Inequality and Unemployment, Economic and political weekly, Mumbai, Augurt 1975, p.12.

११.दांडेकर आणि रथ, भारतातील दारिद्र्य, साठे प्रकाशन, पुणे, १९७३, पृ.क्र. २४.

१२.गारे गोविंद (संपा.), आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान पुणे, १९९८, पृ.क्र. १०.

१३.तत्रैव (तेगमपुरे मारोती), पृ.क्र. ९४.

१४.तत्रैव (गारे गोविंद, आदिवासी विकास योजना)

१५.तत्रैव, पृ.क्र. ११

१६.तत्रैव (तेगमपुरे मारोती), पृ.क्र. ११४

१७.गारे गोविंद, भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृति, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९३, पृ.क्र. ११.

१८.तत्रैव (तेगमपुरे मारोती), पृ.क्र. ६०-६९.

# पीएच्. डी. प्रबंधाचा सारांश
# 'अर्थकारणाचे स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रतिबिंब काही निवडक कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास

**सौ.तेजस्विनी बी. मुडेकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कमला कॉलेज,कोल्हापूर.
मोबा.९४२२५८२३८५

## प्रस्तावना :

अर्थशास्त्र म्हणजे जीवनाच्या सामान्य व्यवहारात गुंतवलेल्या मानव समाजाचा अभ्यास होय. त्यात मानवी कल्याणाच्या भौतिक साधनांची प्राप्ती व त्याचा उपयोग यांच्याशी अत्यंत निगडित असलेल्या वैयक्तिक व सामाजिक प्रयत्नांचे विवेचन केले जाते. एका बाजूने तो संपत्तीचा अभ्यास होय. तर दुसऱ्या व अधिक महत्त्वाच्या बाजूने तो मानवाच्या अध्ययनाचा एक भाग होय. मानवाच्या आर्थिक व्यवहाराचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो असे मत डॉ. मार्शल यांनी १८९० मध्ये प्रसिध्द केलेल्या 'Principles of Economics' या ग्रंथात अर्थशास्त्राची व्याख्या करताना व्यक्त केले आहे.

मानवाचा आर्थिक व्यवहार हा मानवी प्रवृत्तीवर अवलंबून असतो आणि साहित्य हे ही मानवी प्रवृत्तीचे, मानवाच्या अंतर्मनात चाललेल्या भावभावनांचे प्रदर्शित असे रूप असते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, परिस्थितीत होणारे बदल मानवाच्या प्रवृत्तीत बदल घडवून आणतात आणि असे बदल साहित्यातून टिपले जातात. मानवाचे आर्थिक जीवन हे साहित्यात प्रतिबिंबित होताना दिसते. हे प्रतिबिंब सर्वच राष्ट्रांतील साहित्यात पडलेले दिसते. म्हणजेच साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबंध आहे.

## साहित्य आणि समाज :

साहित्य आणि समाज यांच्यातील अत्यंत निकटच्या संबंधाचा वस्तुनिष्ठ अभ्यास सर्वप्रथम फ्रान्समध्ये 'मादाम स्ताईल' या विदुषीने केला. इ.स. १८०० मध्ये प्रसिध्द झालेल्या त्यांच्या 'Dela literature consideree danses reports aves les institution socialses' ग्रंथ समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीने केलेल्या साहित्याभ्यासाचा मानदंड ठरतो. १९ व्या शतकातील हेगेल या

अध्यात्मवादी जर्मन तत्वज्ञाने मांडलेल्या विरोध विकासाबद्दलच्या विचारांचा कार्ल मार्क्स यांनी स्वीकार केला. विरोध विकासी पध्दत म्हणजे परस्परविरोधी विचारांच्या प्रक्रियेतून नवीन अधिक विकसित विचारतत्त्व उदयास येणे. विचार, निसर्ग किंवा समाज यांच्यामधील परस्पर विरोध हा भावी प्रगतीकरिता अपरिहार्य आहे. साम्यवादी जीवन दर्शनाचे प्रणेते कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स यांनी साहित्याचा स्वतंत्र व समाननिरपेक्ष असा विचार केला नाही. समाज व साहित्य यांचा घनिष्ठ संबंध असतो, असे मार्क्स व एंगल्सचे मत होते. एंगल्सने साहित्याचा इतिहास हा समाजाच्या इतिहासाशी म्हणजेच समाजाच्या आर्थिक विकासाशी संबंधित असतो हे फ्रान्स आणि जर्मनी यांच्या उदाहरणावरून दाखवून दिले. साहित्याच्या स्वरूपामध्ये होणारे विविध प्रकारचे बदल हे समाजामध्ये होणाऱ्या बदलानुषंगाने होतात अशी मार्क्सची भूमिका होती. प्लेखानोव्ह या रशियन समीक्षकाने 'भौतिकवादाचा इतिहास' या विषयावर लिहिलेल्या निबंधात कलानिर्मिती आणि कला विकास यांची समाज सापेक्षता आग्रहाने मांडली. साहित्य निर्मिती आणि साहित्य विकास यांची समाज सापेक्षता लेनिनने-टॉलस्टॉयच्या साहित्यकृतीत तत्कालीन समाजव्यवस्थेचे प्रतिबिंब पडते. हा मुद्दा पुन:पुन्हा मांडून पटवून दिला. मॅक्झिम गोर्की या जागतिक कीर्तीच्या ललित लेखकाने साहित्य आणि समाजजीवन यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध मान्य केला आहे.

या विदेशी विद्वानांच्या प्रमाणेच श्री. रा. ग. जाधव यांनी 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ' या पुस्तकात साहित्याची समाजनिष्ठता दाखवून दिली आहे. साहित्याचा प्रवास हा समाजाच्या प्रवाहाबरोबर सुरू असतो. डॉ. रवींद्र ठाकूर यांनी 'साहित्य समीक्षा आणि संवाद' या पुस्तकात सामाजिक बदलांची चाहूल इतरांपेक्षा सर्जनशील कलावंतांना आधी लागते असे विचार व्यक्त केले आहेत. अशाप्रकारे साहित्य आणि समाज एकमेकांशी अत्यंत निगडित असतात आणि साहित्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

### समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेल्या विदेशी व देशी साहित्यकृती

प्रत्येक देशामध्ये लिहिलेले साहित्य हे त्या त्या देशातील समाजजीवन, महत्त्वाच्या सामाजिक, आर्थिक राजकीय घटना यांचे प्रतिबिंब असते. उदाहरणादाखल अनेक देशी आणि विदेशी साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृतींचा उल्लेख करता येईल ज्यामध्ये त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक वास्तवाचे विवेचन आहे. शेक्सपियर (Timon of Athens), बाल्झाक (पिझंट), एमिल झोला (जर्मिनल), स्टेन बॅक (ग्रेस ऑफ द राथ), भा.वि.वरेरकर (धावता धोटा), ग.त्र्यं. माडखोलकर (मुक्तात्मा, चंदनवाडी), वि. स. खांडेकर (उल्का, पांढरे ढग).

अशाच प्रकारे १९४७ नंतरही मराठी कादंबरीचे लेखन करणारे अनेक कादंबरीकार आहेत; ज्यांनी अनेक आर्थिक प्रश्न हाताळले आहेत.

### कालखंडाची निश्चिती :

संशोधन विषयाची निवड करताना एका विशिष्ट कालखंडाची निश्चिती केली आहे. तो कालखंड म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंड इ. स. १९४७ ते २००१. कालखंडाची निश्चिती केल्यानंतर त्या कालखंडाचे वर्गीकरण १०-१० वर्षामध्ये करून त्या प्रत्येक दशकामध्ये विवाद्य ठरलेल्या व

संशोधन विषयाशी संबंधित असणाऱ्या कादंबऱ्यांची निवड मराठी साहित्याच्या इतिहासाचा अभ्यास करून व तज्ञांशी चर्चा करून केलेली आहे.

**अभ्यास पध्दती :**

उपरोक्त विषयात संशोधन करताना पूर्णत: ग्रंथालयाचा वापर केला आहे. तसेच निवडक समीक्षक (श्री. रा. ग. जाधव, श्री. म. द. हातकणंगलेकर, डॉ. श्री. गंगाधर पाणतावणे), मराठी वाड्मयाचे अभ्यासक (डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. जे. बी. शिंदे) यांच्या बरोबर विचारविनिमय करून विषयाच्या गाभ्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास विषयाच्या मर्यादा :**

अभ्यासासाठी फक्त १९४७ ते २००१ असा स्वातंत्र्योत्तर कालखंड निवडलेला असून या कालखंडातील काही निवडक लेखकांच्याच आर्थिक प्रश्नांशीच संबंधित असणाऱ्या कादंबऱ्या व आत्मचरित्रे यांची निवड करण्यात आली आहे.

आर्थिक बाबींची विभागणी प्रमुख पाच गटात केली आहे.

१. दारिद्र्य २. बेकारी ३. श्रमिकांची पिळवणूक ४. कामगार संघ ५. औद्योगिकरणातील विकृती

**आर्थिक बाबी व संबंधित साहित्य विषयक विश्लेषण**

**१.दारिद्र्य :** दारिद्र्य ही आर्थिक व सामाजिक घटना असून ते एक वास्तव आहे. ही समस्या जटील असून ती पुरातन आहे. 'दारिद्र्य' या संकल्पनेला अनेकविध आयाम आहेत. ही संकल्पना केवळ उत्पन्न आणि उपभोगाशी निगडित नसून ती आरोग्य, शिक्षण व मनोरंजन या बाबींशी निगडीत आहे.

**दारिद्र्याची व्याख्या :**

दारिद्र्य म्हणजे योग्य पध्दतीचे अन्न, निवारा यांचा अभाव. ही अशी स्थिती आहे की त्या व्यक्तीस सुयोग्य पध्दतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही.

**दारिद्र्याचा साहित्यिक अविष्कार :**

अर्थशास्त्रात जे दारिद्र्याचे निकष मानले जातात त्याचा विचार करता मराठी साहित्यात कादंबरीकारांनी पुढील निकषांचा ऊहापोह आपल्या कादंबरीत केल्याचे आढळून येते. या कादंबऱ्यांमधून दारिद्र्य विषयक आकडेवारी नसली तरी ही समस्या तितक्याच समर्थपणे वाचकांसमोर मांडली आहे. साहित्यिक परिभाषेतून समस्येची तीव्रता व तिचे विदारक स्वरूप त्यांनी स्पष्ट केले आहे.

**अ)** दारिद्र्याच्या पहिल्या निकषात उपासमार, अन्नाचा अभाव, पुरेशा व पौष्टिक आहाराची कमतरता, निकृष्ट आहाराचे सेवन, अन्न मिळण्यातील अनियमितपणा, भूक, अधाशीपणा, अन्न मिळविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष या सर्व बाबींचा समावेश होतो. उध्दव शेळके यांनी 'धग' कादंबरीत, जयवंत दळवी यांनी 'चक्र' कादंबरीत अशा दारिद्र्याचे वर्णन केले आहे. झोपडपट्टीतील लोकांची अन्न मिळविण्याची 'धडपड', तसेच मधुमंगेश कर्णिक यांनी 'माहीमची खाडी' या कादंबरीत महानगरातील झोपडपट्टीतील दारिद्र्याचे वर्णन केले आहे. रा.रं. बोराडे हे आपल्या 'पाचोळा' कादंबरीत ग्रामीण भागातील व्यावसायिकांच्या दारिद्र्याचे चित्रण करतात. पारंपारिक व्यवसाय मागे पडल्याने अशा व्यावसायिकांची आर्थिक स्थिती हलाखीची बनली आहे. दया पवार यांनी 'बलुतं' या कादंबरी रूपाने प्रसिध्द केलेल्या आत्मकथनात दलित समाजाच्या वेदनाबरोबरच त्यांचे दारिद्र्य व्यक्त केले आहे. लक्ष्मण माने यांनी 'उपरा' मध्येही कैकाडी समाजाची उपासमार, अन्नासाठीची वणवण

चितारली आहे. खरकट्या पत्रावळीवरील उष्टे अन्न जमा करण्यासाठी कुत्री जमा व्हायच्या आत धडपड करायला लागायची असे अनेक उल्लेख आढळतात. मधुमंगेश कर्णिक यांनी 'भाकरी आणि फूल' कादंबरीत ग्रामीण भागातील एका दलित कुटुंबाच्या दारिद्र्याचा आलेख काढला आहे. शरणकुमार लिंबाळे यांनी 'अक्करमाशी' या आत्मचरित्रात ग्रामीण दारिद्र्याचे मूर्तिमंत चित्र उभे केले आहे. जनावरांच्या शेणातील दाणे धुवून त्याचे पीठ करून त्याच्या भाकरी केल्याचा उल्लेख यात आढळतो. नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' मध्ये मांगांच्या ओटीत कायमची भूक टाकली आहे, हे वास्तव मांडले आहे. तर जयवंत दळवी यांनी 'बाजार' मध्ये शहरी दारिद्र्याचे वर्णन केले आहे.

**ब)** दारिद्र्याचा दुसरा निकष वस्त्राची कमतरता, उघडे- नागडेपणा, लज्जारक्षणापुरतेही कपडे न मिळणे. मधुमंगेश कर्णिक यांनी 'भाकरी आणि फूल' मध्ये खेड्यात अनेकदा वृध्द व्यक्तींना अंगभर कपडे मिळत नाहीत, हे वास्तव चितारले आहे . नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' मध्ये, जयवंत दळवी यांनी'बाजार' मध्ये याच प्रकारचा उल्लेख केला आहे.

**क)** दारिद्र्याचा तिसरा निकष म्हणजे राहण्याच्या व आरोग्याविषयक सोयींचा अभाव. जयवंत दळवी यांच्या 'चक्र' मध्ये मिळेल ते साहित्य जमवून उभा केलेला निवारा दर्शविला आहे. अर्धनग्नस्थितीत फुटपाथावरच नळाखाली स्त्रिया आंघोळ करतात. मधुमंगेश कर्णिक यांनी 'माहीमची खाडी' या कादंबरीत माहीमच्या खाडीत समुद्राच्या लाटांचा मारा झेलत उभ्या असलेल्या झोपडपट्टीचे चित्रण केले आहे. दया पवार यांच्या 'बलुतं' मध्ये तसेच 'बाजार' मध्ये जयवंत दळवी यांनी अत्यंत गलिच्छ वस्तीत, तसेच फुटपाथावर लोक गुजराण करतात, याचे वर्णन केले आहे. जयवंत दळवी यांच्या 'चक्र'कादंबरीत दारिद्र्यामुळे योग्य औषधोपचारा अभावी पंडुरोग, बाळंतरोग, कडकी, मुडदूस यांचे साम्राज्य झोपडपट्टीत असते, असे स्पष्ट केले आहे. मधुमंगेश कर्णिक यांनी 'माहीमची खाडी' मध्ये झोपडपट्टीत पावसाळ्याबरोबर येणाऱ्या देवी रोग, तापाची साथ, बाळंतरोग, गुप्तरोग यांचा उल्लेख केला आहे. नामदेव कांबळे त्यांच्या 'राघववेळ' मध्ये योग्य औषधोपचाराअभावी सीतारामाच्या वडिलांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले आहे.

**ड)** दारिद्र्याचा चौथा निकष शिक्षण सुविधेचा अभाव. उध्दव शेळके यांच्या 'धग' मध्ये रघूला शाळेची पुस्तके नाही म्हणून त्याला वर्गातून हाकलून दिले जाते, असा उल्लेख आढळतो. 'माहीमची खाडी' मध्ये मधुमंगेश कर्णिक यांनी सकिनाच्या तोंडी झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांनी शाळा किताब असले शब्द काढू नयेत. खुदा सजा करतो, असे वाक्य टाकले आहे. लक्ष्मण माने यांनी 'उपरा' मध्ये गावोगाव भटकणाऱ्या कुटुंबाच्या मुलांची शिक्षणाची होणारी आबाळ चित्रीत केली आहे. नामदेव कांबळेंनी 'राघववेळ' मध्ये दारिद्र्यामुळे शिक्षणाची होणारी आबाळ वर्णन केली आहे.

## २.बेकारी

'बेकारी' हा समाजाचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न. अनेक आर्थिक प्रश्नांमध्ये बेकारीच्या प्रश्नाला विशेष महत्त्व आहे आणि या प्रश्नाची तीव्रता जर दिवसेंदिवस वाढत असेल तर समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने ही अधिक गंभीर बाब होऊ शकते. वाया जाणारी श्रमशक्ती आर्थिक विकासाच्या मार्गातील अडसर ठरते.

### बेकारीची व्याख्या

केन्स जे. एम- 'प्रचलित वेतनदराला रोजगार शोधणारा श्रमिकांचा एकूण पुरवठा श्रमिकांची जी एकूण मागणी आहे त्यापेक्षा अधिक असेल तर अनैच्छिक बेकारी निर्माण होते.'

### बेकारीचा साहित्यिक अविष्कार :

काही कादंबरीकारांनी बेकारी या आर्थिक प्रश्नाला आपल्या कादंबरीमधून स्पर्श केला आहे. उध्दव शेळके यांनी 'धग' कादंबरीत 'मोसमी बेकारी' चे चित्रण केले आहे. ग्रामीण भागात हंगामाच्या काळात शेतमजूरांची मागणी वाढते व हंगाम संपताच त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळते याचे वर्णन या कादंबरीत आहे. लक्ष्मण माने यांनी 'उपरा' आत्मकथनामध्ये पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या कैकाडी जमातीचे दुःख समाजासमोर मांडले आहे. अनेक वेळेत त्यांना कामाविना राहावे लागते याचा उल्लेख कादंबरीत आढळतो. एक काम सुटल्यानंतर दुसरे काम मिळेपर्यंत बेकारीची भयावह अवस्था ज्याला अर्थशास्त्रीय भाषेत घर्षणात्मक बेकारी म्हणतात. अशा शहरी भागातील बेकारीचे प्रत्ययकारी चित्रण ह.मो.मराठे यांच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत आढळते. जयवंत दळवी यांनी आपल्या 'बाजार' मध्ये रोजगाराच्या शोधार्थ मुंबईत गेलेल्या 'देऊ' या कोकणातील तरूण मुलाची नोकरीचा शोध कसा घ्यायचा हेही माहीत नसल्याने होणारी तगमग चितारली आहे. अर्थव्यवस्थेत एक रोजगार सुटल्यामुळे दुसऱ्या रोजगाराच्या शोधात असणारे सद्य:स्थितीत बेकार असणारे लोक आढळतात. याचे वर्णन या कादंबरीत आढळते. प्रभाकर पेंढारकर यांनी 'सुधा' या नायिकेलाही 'अरे 'संसार संसार' या कादंबरीत अशा बेकारीला सामोरे जावे लागते अशी व्यस्था मांडली आहे. भाऊ पाध्ये यांनी 'डोंबाऱ्याचा खेळ' या कादंबरीत पोलाद उद्योगातील बेकारी स्पष्ट केली आहे.

मधु मंगेश कर्णिक यांनी 'माहीमची खाडी' या कादंबरीत झोपडपट्टीतील तरूणांच्या ऐच्छिक बेकारीचे चित्रण केले आहे. अयोग्य शिक्षणव्यवस्थेने निर्माण होणारी 'सुशिक्षितांची बेकारी' ह. मो. मराठी यांनी 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत नायकाच्या बेरोजगारीच्या रूपाने मांडली आहे. 'उपरा' मध्ये लक्ष्मण माने आपल्या काही काळ भोगलेल्या बेकारी विषयीची अवस्था मांडतात.

'भाकरी आणि फूल' मध्ये मधु मंगेश कर्णिक ग्रामीण भागातून नोकरीच्या शोधार्थ मुंबईत आलेल्या एस. एस. सी. झालेल्या दलित तरूणाच्या बेकारीची व्यथा मांडतात. 'संधिकाल' मध्ये मधु मंगेश कर्णिक यांनी एस. के. हे कादंबरीतील एक ध्येयवादी व्यक्तिमत्त्वाचे पण एम. ए. होऊनही नोकरी मिळत नसल्याने शिकवण्या घेत आहे असा उल्लेख केला आहे. दुष्काळामध्ये निर्माण झालेल्या बेकारीचे चित्रण व त्यामुळे शेतकऱ्यांची परवड 'दुस्काळ' मध्ये दादासाहेब मोरे मांडताना दिसतात.

वरील कादंबरीकारांनी रोजगाराच्या अशाश्वतीचे दुःख, बेकार व्यक्तीची अगतिकता अत्यंत प्रभावीपणे मांडली आहे. बेकारीमुळे तरूण अनैतिक व्यवसायांकडे वळतात, तर कांही आत्मघातास प्रवृत्त होतात तर कांही क्रूरतेकडे वळतात याचेही चित्रण वर उल्लेखलेल्या कादंबऱ्यांमधून आढळते.

### ३.श्रमिकांची पिळवणूक :

श्रमाच्या पिळवणूकीचा विचार करत असताना श्रमाच्या आर्थिक पिवळणूकीचा किंवा शोषणाचा जसा विचार करावा लागतो तसाच श्रमिकांवर केल्या जाणाऱ्या इतर अन्यायाचा विचार करणे अत्यावश्यक ठरते. आर्थिक पिळवणूकी बरोबरच विनाकारण कामावरून काढून टाकणे, इतर श्रमिकांपेक्षा अधिक काम सांगणे, बढती रोखणे, रजेत कपात करणे, सतत दंड करणे या पध्दतीनेही कामगारांचे शोषण केले जाते.

**स्त्री श्रमिकांचे शोषण :**

केवळ स्त्री म्हणून श्रमिकांवर अन्याय केला जातो, तिची पिळवणूक केली जाते.

**श्रमिकांच्या पिळवणूकीचा साहित्यिक अविष्कार :**

भाऊ पाध्ये यांनी 'डोंबाऱ्याचा खेळ' या कादंबरीत विनाकारण कामगाराला कामावरून काढून टाकणे, संघटनेशी संबंध ठेवल्याने कामावरून कमी करणे, बदली करणे, रजेत कपात करणे, दंड करणे, शारीरिक स्वरूपाचा अन्याय करणे, सस्पेंड करणे, जेवणाची सुट्टी कमी करणे यासारख्या अन्यायाचा ऊहापोह केला आहे. या कादंबरीत वेन्स्ले कंपनीतील कामगारांवर केला जाणारा अन्याय चित्रित केला आहे. खाजगी कंपन्यांमध्ये कागारांना कामावरून केव्हाही कमी करण्याची धमकी दिली जाते. तसेच अयोग्य ठपका ठेवून कामावरून काढून टाकले जाते. अयोग्य प्रकारचे काम करून घेणे, कामगारांची फसवणूक केली जाते, असा उल्लेख ह. मो. मराठे आपल्या 'सॉफ्ट वेअर' या कादंबरीत करतात. संजीव खांडेकरांनी 'अशांतपर्व' मध्ये कामगाराची सेवा खंडित करून त्याला कायम नोकरीची ऑर्डर दिली जात नाही याचे विवेचन केले आहे. तसेच कामगारांसाठी काही अन्यायकारक मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जातात; त्याचा उल्लेख आढळतो. मधुमंगेश कर्णिक यांच्या 'सनद' कादंबरीत 'मिस चौबल' या प्रामाणिक स्त्री अधिकाऱ्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न केला जातो हे दुःख मांडले आहे.

**स्त्री श्रमिकांचे शोषण :**

साहित्यात वर्णिलेल्या शोषणाची दोन विभागात विभागणी करता येते.

अ)शहरी भागातील नोकरदार स्त्रियांचे शोषण

ब) ग्रामीण भागातील स्त्रिया, शेतमजूर स्त्रियांचे शोषण

ह. मो. मराठे यांनी 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत शिक्षण संस्थेचा सचिव नायकाच्या पत्नीला नोकरीवर ठेवण्यापूर्वी लैंगिक अपेक्षेच्या पूर्तीची मागणी करतो, असा उल्लेख आढळतो. ह.मो. मराठे यांच्या 'सॉफ्टवेअर' मध्ये कार्यालयीन कर्मचारी महिला कर्मचाऱ्यांची छेड काढतात. कंपनीचा मालक अरूणाचलम् हा मिसेस गांधी या महिला कर्मचाऱ्याला स्वतःबरोबर ऑफिसच्या कामासाठी बाहेरगावी येण्याची विनंती करतो. तसेच पार्टीच्या निमित्ताने स्वतःच्या घरीच मुक्कामाला रहा असे सुचवितो. याच कादंबरीत पत्नीचे सौंदर्य हे पतीच्या पगारवाढीचा निकष ठरू शकतो, ही बाब मांडली आहे. ह.मो. मराठे यांनी आपल्या 'मार्केट' या कादंबरीत तनुजा या आपल्या सेक्रेटरीला ऑफिसच्या कामासाठी बाहेरगावी नेऊन बॉस बलात्कार करतो या बाबीवर प्रकाश टाकला आहे. याच कादंबरीत नोकरी करणाऱ्या स्त्रीकडे पहाण्याचा कलुषित दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. लैंगिक छळाचे पर्यवसन प्रचंड मानसिक ताण, रजेत वाढ, आत्महत्या या गोष्टीत होते असाही उल्लेख वर उल्लेखलेल्या कादंबऱ्यात केला आहे.

ग्रामीण भागातील मजूर स्त्रियांवरही सावकार, जमीनदार, मालकवर्ग, अन्नदाता लैंगिक अत्याचार करतात याचा उल्लेख कादंबऱ्यात आढळतो. टोपलीभर अन्नासाठी स्त्रिया आपले शील देत असत असा उल्लेख दया पवार यांच्या 'बलुतं' मध्ये आढळतो. रस्त्यावर काम करणाऱ्या मजूर मुलीचा मुकादमाकडून विनयभंग केला जातो ही व्यथा दादासाहेब मोरे 'दुस्काळ' या कादंबरीत मांडतात. गरजे पोटी महार स्त्रीला आपल्या मुलीची झालेली विटंबना विसरावी लागते .तसेच शिल्लक राहिलेली मजूरी मागितली म्हणून स्त्रीची विटंबना केली जाते असा स्पष्ट उल्लेख मधु मंगेश कर्णिक

आपल्या 'भाकरी आणि फूल' मध्ये करताना आढळतात. पायलीभर ज्वारीसाठी देशमुख हरणीवर अत्याचार करतो असा उल्लेख नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' मध्ये आहे. या लैंगिक शोषणाची गरीब स्त्रियांकडून कुठेही वाच्यता केली जात नाही. अन्याय सहन केला जातो. अन्याय करणारे करतच राहतात याचे अत्यंत विदारक चित्रण वर उल्लेखलेल्या कादंबऱ्यांमधून केले आहे.

**४.कामगार संघ :**

औद्योगिक कामगारांनी स्वत:चे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या संघटनेला कामगार संघ असे म्हटले जाते. कामगार संघाची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे कठीण आहे. **जी.डी. एल. कोल** – 'कामगार संघ ही एक किंवा अनेक धंद्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांनी स्थापन केलेली संघटना असून कामगारांच्या रोजच्या कामाच्या संदर्भात सभासदांच्या आर्थिक हितसंबंधांचे सरंक्षण व संवर्धन करणे हे कामगार संघाचे प्रमुख कार्य असते.'

**कामगार संघाचा साहित्यिक अविष्कार :**

काही मराठी कादंबरीकारांनी कामगार संघ विषयक विश्लेषण केले आहे.

भाऊ पाध्ये यांनी 'डोंबाऱ्याचा खेळ' कादंबरीत कामगार संघ, कामगारांच्या तक्रारी ऐकून त्यांचे निवारण करतात, महागाईवाढीच्या प्रश्नाचा विचार, मागण्यांच्या मान्यतेसाठी मोर्चा, साप्ताहिकाचे प्रकाशन, लेबर ऑफिसरद्वारे मॅनेजरशी चर्चा, कामगारांसाठी बौध्दिक, कामगार प्रशिक्षण, राजकीय पक्षांच्या वार्षिक अधिवेशनास उपस्थिती, सामुदायिक वाटाघाटी, कामगार संघाकडून उभारले जाणारे संपाचे हत्यार, संप काळातील कामे, वर्गणीविषयी उदासीनता या सर्व बाबी पोलाद कारखान्यातील कामगार संघटनेसंदर्भात मांडल्या आहेत. 'अशांतपर्व' मध्ये संजीव खांडेकरांनी सार्वजनिक क्षेत्रातील भरपूर नफा मिळवणाऱ्या रासायनिक कारखान्यात आधुनिकीकरणामुळे कामगारांवर जी बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे, त्या परिस्थितीला तोंड देण्याच्या दृष्टीने कामागार संघटनांकडून केल्या जाणाऱ्या हालचाली स्पष्ट केल्या आहेत. 'सॉफ्टवेअर' या कादंबरीत ह.मो. मराठे कामगार संघ वेतनवाढीची मागणी मालकांपुढे कशी मांडतात, सामुदायिक वाटाघाटी, वाटाघाटी फिसकटणे या बाबी प्रभावीपणे मांडताना दिसतात. मधुमंगेश कर्णिक यांनी संपकाळात कामगारांचे होणारे हाल 'सनद' मध्ये चित्रित केले आहेत. संपकाळातील सरकारची धोरणे मांडली आहेत. 'संधिकाल' मध्येही त्यांनी कामगार कुटुंबांची संपाने होणारी वाताहात अत्यंत प्रभावीपणे मांडली आहे.

**५.औद्योगिकरणातील विकृती :**

औद्योगिकरणामुळे अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडून येतात. अर्थव्यवस्थेतील वापरलेल्या साधनसामग्रीचा पुरेपूर वापर होऊ लागतो. उत्पादन प्रक्रियेत भांडवलाचा वापर वाढतो. उद्योगांचे महत्त्व वाढत जाते. उद्योग मुख्यत: शहरी भागात असल्याने लोकसंख्येचे स्थलांतर ग्रामीण भागातून शहरी भागात होते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत औद्योगिकरणास अधिक महत्त्व आहे.

**औद्योगिकरणाच्या व्याख्या :**

पॉल. एम. स्वीज – औद्यागिकरण म्हणजे नवीन उद्योगाची स्थापना किंवा उत्पादनाची निर्मिती होय.

**शहरीकरण :**

औद्योगिकरणाच्या प्रक्रियेबरोबरच शहरीकरणाची प्रक्रिया घडून येऊ लागते. शहरीकरण या संकल्पनेशी आधुनिकीकरण , औद्योगिकरण ,

नूतनीकरण, विकसीकरण इ. शब्द जोडले गेलेले आहेत.

लोकसंख्या वाढ, रोजगाराचा शोध, चांगल्या राहणीमानाची आशा, शिक्षण व विकासाच्या संधी, कर्तृत्वास वाढ, औद्योगिकरण, दळणवळणांच्या सोयीत वाढ असे अनेक घटक शहरीकरणाच्या वाढीस जबाबदार असतात.

**शहरीकरणाच्या समस्या :**

शहरांच्या विस्ताराबरोबरच शहरीकरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या -- व्यसनाधीनता, मद्यपान, वेश्यावृत्ती, जुगार, भिकारीवृत्ती, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, घरांची टंचाई व गलिच्छ वस्त्या, प्रदूषण इ. तसेच शहरीकरणाने नवी संस्कृती उदयास येते. या बाबींचे हुबेहूब चित्रण अनेक कादंबरीकार करतात.

**औद्योगिकरणाच्या विकृतीचा साहित्यिक अविष्कार :**

'पडघवली' मध्ये गो. नि. दांडेकरांनी एका नष्ट होऊ घातलेल्या खेडयाचे शब्दचित्र मांडले आहे. तर 'पाचोळा' मध्ये नव्या तंत्रज्ञानाने ग्रामीण कारागिरांचा ऱ्हास दर्शविताना एका शिंप्याची व्यथा मांडली आहे .मधुमंगेश कर्णिक यांनी 'सनद' मध्ये सार्वजनिक महामंडळातील जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यास पडलेल्या शहरी संस्कृतीचा भुलभुलय्या शब्दांकित केला आहे. ह.मो.मराठेंच्या 'मार्केट' मधील एस. के. कुलकर्णी चैन, विलास, भोगलोलुपता यात रममाण होणाऱ्या शहरी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. मधु मंगेश कर्णिक 'सनद' मध्ये औद्योगिक संस्कृतीतील नव्या नितिनियमांचा उल्लेख करतात. या संस्कृतीत स्त्रिया बॉसकडून एखादे काम करवून घेण्यासाठी आपल्या स्त्रीत्वाचा वापर करतात, असे दाखले ह. मो. मराठे 'मार्केट' मध्ये देतात. जयवंत दळवी 'चक्र' मध्ये, मधुमंगेश कर्णिक 'माहीमची खाडी' मध्ये झोपडपट्टीतील रोगराई, वेश्यावृत्ती, व्यसनाधीनता, अनैतिक धंदे यांचे अनेक दाखले देतात. भ्रष्टाचार, लाचलुचपत, फसवणूक, वशिलेबाजी या बाबींचे उल्लेख शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'क्षिप्रा' मध्ये डॉ. भाल पाटील यांच्या 'वस्ती वाढते आहे,' डॉ. रा. रं. बोराडे यांच्या 'चारापाणी' मध्ये, विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांच्या व्यथा मांडणारी जी 'झाडा-झडती' कादंबरी लिहिली आहे ती मध्ये सापडतात. भाऊ पाध्ये 'वैतागवाडी' मध्ये घरांच्या टंचाईची महानगरातील गंभीर समस्या प्रभावीपणे मांडतात, तर 'अरे संसार संसार' मध्ये प्रभाकर पेंढारकर मुंबईसारख्या महानगरातील जागेच्या टंचाईचे अत्यंत मार्मिक चित्रण करतात.या महत्त्वांच्या आर्थिक प्रश्नांबरोबरच दुष्काळ, प्रदूषण, धरणग्रस्तांच्या समस्या यांसारख्या कांही अनुषंगिक आर्थिक प्रश्नांचे प्रतिबिंब कादंबरीत पडल्याचे आढळते. दादासाहेब मोरे यांनी आपल्या 'दुस्काळ' या कादंबरीत मान्सूनच्या पावसाअभावी निर्माण झालेल्या क्लेशदायक दुष्काळाचे प्रभावी वर्णन केले आहे. रा. रं. बोराडे यांनी 'चारापाणी' मध्ये कोरड्या दुष्काळाने हवालदिल झालेला शेतकरी चितारला आहे. 'झाडा-झडती' मध्ये विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांचे नुकसान भरपाईचे प्रश्न, पुनर्वसनाच्या ठिकाणच्या समस्या यांसारखे प्रश्न शब्दांकित केले आहेत. गो.नि. दांडेकरांच्या 'पडघवली' मध्ये व रा. रं. बोराडेंच्या 'चारापाणी' मध्ये वृक्षतोड, जंगलसंपत्तीचा ऱ्हास यांसारखे पर्यावरण प्रदूषणविषयक प्रश्न हाताळले आहेत. अशा पध्दतीने अनेक बाबींचे अत्यंत प्रभावीपणे चित्रण साहित्यात केले आहे. त्या समस्यांचे गांभीर्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात हे कादंबरीकार निश्चितच यशस्वी झाले आहेत.

**निष्कर्ष :**

साहित्य आणि समाज यांचा अत्यंत घनिष्ठ

संबंध असून समाजातील बदल हे साहित्यात टिपले जातात. निवडक कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करता असे आढळले की निवडलेल्या कादंबऱ्यांमध्ये मानवी जीवनातील विविध आर्थिक प्रश्नांचे प्रतिबिंब पडले आहे. ही भूमिका अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या मूळ चौकटीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कमी अधिक प्रमाणात बहुतेक सर्वच कादंबऱ्यांत या ना त्या महत्त्वपूर्ण आर्थिक परिस्थितीचे किंवा समस्येचे मर्मभेदी व साक्षात् चित्रण आढळले. एवढेच नव्हे तर कविता, नाटक, लघुनिबंध , चरित्रे, आत्मचरित्र आणि ऐतिहासिक दस्ताऐवज यात देखील वेगवेगळ्या पध्दतीचे अर्थकारणाचे प्रतिबिंब आढळते अशी ठाम भूमिका मांडणे समर्थनीय ठरेल. आंतरविद्याशाखीय व्यासंग आणि संशोधनाचे ते एक नवे क्षेत्र यातून विकसित होत आहे.

(संशोधकाने जे एफ. पाटील (मुख्य मार्गदर्शक) व रवींद्र ठाकूर (सहमार्गदर्शक) यांच्या मार्गदर्शनाखाली 'अर्थकारणाचे स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रतिबिंब: काही निवडक कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शिवाजी विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी प्राप्त केली आहे त्या पीएच्.डी. प्रबंधाचा हा सारांश)

## निवेदन

खालील आजीव सभासदांचे एप्रिल-जून २००८ चे पाठविलेले अंक प्रमुख संपादकांकडे परत आलेले आहेत. तरी संबंधित आजीव सभासदांनी आपले नवीन पत्ते संपादकांकडे पाठविण्यासंबंधी सहकार्य करावे.त्यानंतर त्या सभासदांना बदललेल्या पत्त्यावर अर्थसंवादचे पुढील अंक पाठविण्यात येतील.

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| १ | ६ | श्री.तळवळकर गोविंद |
| २ | २२ | श्री.गाडगीळ गंगाधर गोपाळ |
| ३ | २५ | श्री.देशपांडे विश्वनाथ विनायक |
| ४ | ३५ | श्री.वाकणकर बिंदू माधव |
| ५ | ४५ | श्री.दांडेकर अशोक शंकर |
| ६ | ५६ | प्राचार्य कौण्डिण्य एम्. व्ही. |
| ७ | १३२ | प्रा.मानकर विजयकुमार गजानन |
| ८ | १४३ | प्रा.जोशी श्रीकांत कालीदास |
| ९ | १७६ | प्रा.गिरासे गजेंद्रसिंग ठाणसिंग |
| १० | १७८ | प्रा.उपदेव विनायक वासुदेव |
| ११ | १८१ | प्रा.परांजपे रमेश वासुदेव |
| १२ | १८५ | प्रा.अष्टेकर शांताराम |
| १३ | २०३ | प्रा.शहा रमेश बाबुलाल |
| १४ | २४९ | श्रीमती जोशी कालिका दिनानाथ |
| १५ | २७९ | प्रा.तराले प्रल्हाद गोविंदराव |
| १६ | ३२१ | प्रा.फरील नरेंद्र विश्वनाथ |
| १७ | ३३९ | सौ.एकबोटे नंदिनी वि. |
| १८ | ३६६ | प्रा.देशपांडे अतुल रा. |
| १९ | ३७८ | प्रा.कान्हेरे रंगनाथ भी. |

| अ. क्र. | सभासद क्रमांक | आजीव सभासद नांव |
|---|---|---|
| २० | ४१४ | प्रा.निजसुरे पदमावती सखाराम |
| २१ | ४२० | सौ.प्रयाग माधवी |
| २२ | ४९८ | प्रा.कस्तूरे आशा |
| २३ | ५११ | प्रा.सौ.श्रीवास्तव नलीनी |
| २४ | ५७१ | श्री.भिलवडे अरविंद श्रीपाल |
| २५ | ५९३ | श्री.छापरवाल शांतीलाल बिरदीचंद |
| २६ | ६०६ | डॉ.सौ.सावंत मिनाक्षी दि. |
| २७ | ६५२ | प्रा.देवरे नानाजी वामन |
| २८ | ६५३ | प्रा.सवने सुरेश बापूराव |
| २९ | ६६२ | प्रा.बोधले आमोगसिध्द चैत्राम |
| ३० | ६६६ | श्री.ओक जयंत काशिनाथ |
| ३१ | ६६७ | डॉ.सौ.केळकर किर्ती |
| ३२ | ६९८ | प्रा.आठवले पि.यु. |
| ३३ | ७१३ | प्रा.तोडमल आय.ए. |
| ३४ | ७५४ | प्रा.डॉ.कप्तान संजय |
| ३५ | ८४६ | श्री.गोवंडे प्रकाश का. |
| ३६ | ८६० | प्रा.कोंडेकर उमाकांत भास्करराव |
| ३७ | १०३२ | प्रा.शिंदे सुनिल श्रीपतराव |
| ३८ | १२५९ | प्रा.झोटिंग शरद वामन |

**प्रमुख संपादक -जगन्नाथ पाटील**

# अर्थ शब्दांची वाट पाहे

**जे.एफ्. पाटील**
कोल्हापूर.

श्री.शि.ना.माने यांनी अर्थसंवादच्या एप्रिल-जून २००८ च्या अंकामध्ये दोन 'अर्थां 'च्यासाठी दोन नवीन मराठी शब्द गट दिले आहेत. त्यांनी संबंधित शब्दांच्या माध्यमातून घटनांच्याबद्दल (Phenomenon) जे विवेचन केले आहे, ते संबंधित इंग्रजी संकल्पना नेमक्या पध्दतीने वाचकांना कळू शकतील, या दृष्टीने अतिशय परिणामकारक आहे. याठिकाणी विशिष्ट शास्त्रीय विषयाची परिभाषा तयार करताना शक्यतो एका स्वतंत्र किंवा एका संयुक्त शब्दाने अर्थ व्यक्त होईल असा दुसऱ्या भाषेतील पर्यायी शब्द देणे गरजेचे आहे. श्री.माने यांनी Sub-prime lending या शब्दांचे जे विवेचन केलेले आहे, त्यावरून त्यांनी दिलेला प्रतिशब्द किंबहुना प्रतिशब्द रचना "प्रस्थापित नियमांना दुय्यम लेखणारा बेबंद कर्जपुरवठा" असे दिले आहेत. (नियमांना ऐवजी निमयांना असे मुद्रित झाले आहे.) अर्थ समजण्याच्या दृष्टीने हे सहा शब्द योग्यच आहेत. परंतु त्यातून संकल्पनात्मक प्रतिशब्द तयार होत नाही. एकूण अर्थ लक्षात घेता माझ्या मते 'निकृष्ट कर्ज' किंवा 'बेजबाबदार कर्ज' असे शब्द अधिक योग्य ठरतील. खरे तर एका शब्दात अर्थ व्यक्त करण्यासाठी जाणीवपूर्वक 'निकर्ज' असा शब्द रूढ करता येईल. 'नि' या पूर्व विशेषणाने निकृष्ट, निर्लज्ज, निष्काळजी असे अर्थ ध्वनित करता येतात. मराठी मध्ये कुकर्म, कुचाळकी असे शब्द आहेत. अर्थात या ठिकाणी निच्यापुढे विसर्ग नाही हे कालांतराने रूढ होईल याच पध्दतीने 'बेकर्ज' असाही शब्द वापरता येईल.

श्री.माने यांनी Agflation असा दुसरा शब्द या सदरासाठी निवडला आहे. त्यांनी या विवेचनात Agflation या शब्दरचनेतून जे अनेक अर्थ किंवा अर्थछटा ध्वनित होतात, त्याचे अतिशय प्रभावी विवेचन केले आहे. पण सुटसुटीत प्रतिशब्द देण्याऐवजी 'कृधान्य किंमत वृध्दी' असा पारिभाषिक पर्याय सुचविलेला आहे. एकूण अर्थ लक्षात घेता 'अन्नभाव वाढ' असा शब्द प्रयोग अधिक सोपा ठरू शकेल असे वाटते. कदाचित 'कृभाववाढ' असाही प्रयोग करता येईल.

'अर्थ शब्दांची वाट पाहे' या निमित्ताने प्रचलित आर्थिक प्रश्नावर अत्यंत मर्मग्राही स्पष्टीकरण देण्याचा श्री.शि.ना.माने यांचा सातत्याने चाललेला हा उपक्रम अभिनंदनीय व अनुकरणीय आहे.

## 'ग्रंथ परीक्षण' - १
## Octroi

**लेखक एम.बी. सप्रे**
पुणे, २००८
पृष्ठसंख्या २६८, किंमत : रू.४५०/-

**मंजूषा मुसमाडे.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
पुणे.

### प्रस्तावना :

ऑक्ट्रॉय म्हणजे जकातीसारख्या वादग्रस्त व गुंतागुंतीच्या विषयावर लेखकाने सविस्तर प्रकाश टाकला आहे. पुस्तकाची विभागणी पाच प्रकरणात केलेली आहे.

पहिल्या प्रकरणात ऑक्ट्रॉयसंबंधी घटनात्मक तरतूदींचा ऊहापोह केलेला आहे. दुसऱ्या प्रकरणात प्रामुख्याने पुणे महानगरपालिकेच्या जकात धोरणाची व कायदेशीर बाबींची चर्चा आहे. तिसरे प्रकरण पुणे महानगरपालिकेच्या जकात वसुली व अंदाजपत्रकातील घटकांविषयी माहिती देते.

पुस्तकाचे मुख्य आकर्षण जकातीच्या वादग्रस्त अंगासंबंधी चर्चा करणारे चौथे व पाचवे प्रकरण आहे. चौथ्या प्रकरणात जकात निर्मूलनाची विविध अंगाने चर्चा केलेली आहे. जकातीला पर्याय ठरतील अशा उत्पन्न मार्गांची माहिती सविस्तरपणे दिली आहे. पुस्तकाचे पाचवे प्रकरण जकातीच्या पर्यायी मार्गांचे टीकात्मक परीक्षण करते. पुस्तकाच्या शेवटी पुरवणी सूची व संदर्भसूची सविस्तर दिलेली आहे.

पुस्तकाचा मुख्य उद्देश जकातीचे समर्थन करणे व जकातनिर्मूलनाला विरोध दर्शविणे हा आहे. लेखकाच्या मते हे पुस्तक अशा प्रकारचा पहिला प्रयत्न आहे.

### जकात-संज्ञा व इतिहास :

लेखकाने Octroi संज्ञेचा उगम व इतिहास यावर रोचक माहिती

दिली आहे. Octroi शब्दाला पर्यायी संज्ञा म्हणून प्रवेश कर (entry tax) ही संज्ञा योग्य नाही हेही नमूद केले आहे. मोगल काळात व ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात लागू असलेला Octroi ही संज्ञा मूळ Octroyer म्हणजे to grant या शब्दापासून उगम पावली व त्याला चुंगी, मोहतार्ता, धरत, टोल, शहरकर, बाजारकर, बंदरकर, सीमा कर(terminal tax) अशा अनेक नावांनी ओळखले जाई. सुरूवातीला केवळ बंदरांपुरता मर्यादित असणारा हा कर रेल्वेच्या उदयाबरोबर विस्तारत गेला. एक महत्त्वपूर्ण उल्लेख असा आहे की, १९३५ च्या भारत सरकार कायद्यात Octroi ऐवजी cess ही संज्ञा वापरण्यात आलेली होती. त्यानंतर आजतागायत Octroi किंवा जकात हेच नाव प्रचलित आहे.

**महानगरपालिकेचे अंदाजपत्रक स्वरूप :**

स्थानिक शासन संस्थांच्या अंदाजपत्रकाचे स्वरूप व जकातीचे स्थान यावर लेखकाने सविस्तर चर्चा केलेली आहे. स्थानिक शासनाच्या अंदाजपत्रकाचे स्वरूप कौटुंबिक अंदाजपत्रकाप्रमाणे असते. त्यात कर्जांचे स्थान अत्यल्प असते. त्यामुळे वरच्या पातळीवरील शासनाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे त्यांना लाभ व अधिकार नसतात. मर्यादित उत्पन्न मार्गामुळे (मर्यादित कर व तुटीचा अर्थभरणा व परकीय कर्जांचा अभाव) जकातीसारख्या उत्पन्न मार्गाचे महत्त्व वाढते. वसुलीच्या दृष्टीने सर्वात प्रथम क्रमांक व निम्म्यापेक्षाही अधिक उत्पन्न (५१%) मिळवून देणारी जकात काढून टाकल्यास स्थानिक शासनांचे अंदाजपत्रक व व्यवस्थापन कोलमडून पडेल; हे पुणे महानगरपालिकेच्या नमूना अभ्यासावरून स्पष्ट होते.

केवळ विकास प्रकल्पांसाठीच कर्ज मिळण्याच्या तरतूदीमुळे बहुतेकवेळा महानगरपालिकांचा कारभार स्वअर्जित उत्पन्नावरच चालतो. पुणे व मुंबई महानगरपालिकांची तुलना करून लेखकाने दाखवून दिले आहे की मुंबई शासनावर प्रचंड प्रमाणात कर्जांचा भार आहे. महानगरपालिकांची कर्जे राज्य शासनाकडून मंजूर व्हावी लागतात. हा नियम मुंबई महानगरपालिकेला लागू नसल्याने असे झाले असावे. त्याचबरोबर मुंबईसारख्या मोठ्या शहरांतील विकासकामांची व्याप्ती प्रचंड असल्याने कर्जेही मोठ्या प्रमाणात काढावी लागत असणार असा अंदाज बांधता येतो.

या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेची मर्यादित कर्जेही अल्प विकासकामांचीच पावती आहे का असा संशय घेण्यास वाव मिळतो.

**पर्यायी निकष :**

जकाती बंद करून त्याऐवजी इतर पर्यायी उत्पन्न मार्ग स्वीकारावेत ही चर्चा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. किंबहुना जकातीपेक्षाही अधिक विचारविनिमय पर्यायी मार्गांवर झालेला आहे. मात्र, पुस्तकात उल्लेखल्याप्रमाणे केवळ व्यावहारिक बाजूनेच हा विचार केला गेला आहे. पर्यायी मार्गांची सैध्दांतिकदृष्ट्या मांडणी केली गेलेली नाही. त्यामुळे जकात निर्मूलन व समर्थन हा विषय अतिव्याप्त व गुंतागुंतीचा बनला आहे.

पर्यायी मार्गांची आवश्यकता ही चर्चा एप्रिल २००५ पासून राज्य शासनाचा मूल्यवर्धित कर (VAT) लागू झाल्याने अधिक जोरात होत आहे. त्यामुळे लेखकाने जकातीच्या पर्यायी मार्गांविषयीची चर्चा VAT पूर्व व VAT नंतर अशा दोन भागात मांडली आहे.

VAT पूर्व काळातील पर्यायी मार्गांची चर्चा प्रामुख्याने वेळोवेळी नेमलेल्या समित्यांच्या शिफारशीतून केली आहे. बहुतेक समित्यांचा रोख जकातीच्या मूळ संकल्पनेवर नसून वसुलीच्या सदोष

पध्दतीवर आहे. वेळखाऊपणा, वस्तूंची मोडतोड, अकार्यक्षमता, लाचलुचपत, परताव्यातील दिरंगाई, अधिकारांचा गैरवापर याबरोबरच जकातीचे अवगामी स्वरूप हे दोष दुर्लक्षिता येण्याजोगे नाहीत. वसुलीच्या अनाकर्षक पध्दतीमुळे करबुडवेपणाही मोठ्या प्रमाणात चालतो. गोदामांचे स्थान जकात हद्दीबाहेर दाखवणे, जकात चुकवून माल आणणे यासाठी अनेक क्लृप्त्या वापरल्या जातात. विशेषत: पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नवीन गावांचा समावेश झाल्याने ही समस्या वाढली आहे.

हे टाळण्यासाठी VAT पूर्व काळात टोल, उलाढाल कर, प्रवेश कर अतिरिक्त विक्री कर इत्यादी मार्ग सुचवले जात तर VAT च्या अंमलबजावणीनंतर अनेक राज्यांनी जकाती बंद करून राज्य शासनाकडून VAT वसुलीचा वाटा स्वीकारणे सुरू केले आहे. महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांत मात्र अजूनही Octroi चालू आहे. VAT व्यतिरिक्त Cess व्यवसाय कर अतिरिक्त संपत्ती कर अशा अनेक पर्यायी मार्गांची शक्यता निरनिराळ्या समित्यांनी तपासून पाहिली. १९८७ च्या कसबेकर समितीने प्रवेश कराची शिफारस केली होती. घरपट्टी वाढवणे, राज्यांच्या VAT मधील वाटा, मोटार स्पिरीट कर अशा अनेक मार्गांनी जकातीची भरपाई होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

लेखकाने २००६-०७ च्या पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक अभ्यासातून मांडले आहे की जकातीच्या एकूण ५४०० कोटी रू. उत्पन्नांपैकी अर्धे म्हणजे २७०० को.रू. इतर मार्गांनी भरून निघतील. उर्वरित उत्पन्न अंशत: जकातीद्वारे मिळू शकेल.

## सारांश :

लेखकाच्या मते सर्वच पर्यायी मार्ग सदोष आहेत. सध्याच्या वित्तीय परिस्थितीत जकात निर्मूलन व पर्यायी मार्ग पर्याप्त ठरू शकत नाहीत.

थोडक्यात, हे पुस्तक जकातीसारख्या बहुचर्चित व वादग्रस्त मुद्यावर सांगोपांग चर्चा घडविते. लेखकाच्या मते ज्या राज्यांनी जकात बंदी केली ती आर्थिक कारणांपेक्षा इतर घटकांच्या प्रभावामुळे केली. त्यामुळे जकातीला आजवर खराखुरा पर्याय सापडलेला नाही. जकातीचे महत्त्वपूर्ण स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न पुस्तकाद्वारे झाला आहे.

## बलस्थाने :

जकातीसारख्या वादग्रस्त मुद्यावर स्वतंत्र पुस्तक असणे स्तुत्य ठरते. लेखकाने नवीन करतत्त्व शोधून काढल्याचा दावा केला आहे. ही सैध्दांतिक भर हे या पुस्तकाचे प्रमुख योगदान ठरेल. त्यामुळे शासकीय वित्तव्यवहारांच्या अभ्यासात नवीन आयामाची भर पडेल.

पुस्तकाचे आकर्षक स्वरूप, वेधक व ओघवती भाषाशैली व वादग्रस्त अभ्यासाविषयाची शास्त्रशुध्द मांडणी यामुळे हे पुस्तक लक्षवेधी ठरते. पुस्तकाच्या व्यावहारिक व सैध्दांतिक योगदानामुळे हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षक, स्थानिक शासनसंस्थांतील कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी यांच्याबरोबरच राजकीय नेत्यांनाही दिशादर्शक ठरेल असे वाटते.

मनोगतात लेखकाने आणखी दोन नव्या विषयांवर (नवीन करतत्त्व व नवीन कर) पुस्तके लिहिण्याचा विचार व्यक्त केला आहे. आगामी पुस्तकाबद्दल वाचक-अभ्यासकांच्या मनात कुतूहल व उत्सुकता जागविण्याचे काम या पुस्तकाने निश्चितपणे केले आहे.

***

## ग्रंथपरिक्षण - २
## अर्थशास्त्राच्या अपसामान्य आकाशवाणीचे भाष्यकार अर्थशास्त्रज्ञ लेविट

Freakonomics : A Rogue Economist Explores the Hidden Side of Everything, Steven D. Levitt and Stephen J. Dubner, Penguin Books Ltd., 2006, PP. XV + 320, Price : f 2.99

**शि.ना.माने,**
भूतपूर्व अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद.
दूरध्वनी - (०२१६२) २३११३९

### प्रास्ताविक :

अर्थशास्त्रातील एका चर्चासत्रात पुढील उदाहरणाच्या सहाय्याने अर्थशास्त्राची व्याख्या करण्यात आली. तीन बलूनयात्री आकाशात फेरफटका मारत होते. एका अज्ञात बेटावर बलूनयात्रींचे यान घिरट्या घेऊ लागले. अचानकपणे त्या बेटावर उतरल्यानंतर बलूनयात्रींनी जिज्ञासेपोटी बेटावरील एका व्यक्तीला पुढील प्रश्न विचारला, ''आम्ही कोठे आहोत?'' बेटावरील व्यक्तीने ताबडतोब पुढील उत्तर दिले : ''तुम्ही बेटावरील बलूनमध्ये आहात.'' त्यानंतर एका बलूनयात्रीने पुढील टोमणा मारला. ''ती व्यक्ती अर्थशास्त्रज्ञ असली पाहिजे. जे उघड किंवा सुव्यक्त आहे तेच तिने सांगितले. आपणास जे माहित नाही त्याचे तिने स्पष्टीकरण केलेच नाही. '' ही गोष्ट सांगण्याचा हेतू हा की पुष्कळदा अर्थशास्त्र जे उघड दिसते त्याचेच स्पष्टीकरण करते. लेविट यांचा आग्रह आहे की प्रत्येक दडलेल्या गोष्टीचे साधार स्पष्टीकरण अर्थशास्त्रज्ञाने केले पाहिजे. संपत्ती, पैसा, बाजार, जी.डी.पी. यांविषयी विपुल लिखाण झाले. त्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव टाकणाऱ्या लिंग, लिंग लाभांश, ठकविणे, गुन्हा, गर्भपात, देणगी, मादक द्रव्य, मदिरा सेवन, नाच, भ्रष्टाचार इत्यादी गोष्टींविषयी तपास करण्याची आज गरज आहे. त्याच भूमिकेतून 'फ्रीकॉनॉमिक्स' (Freak म्हणजे विचित्र, अपसामान्य) शब्दाची शीर्षकात निवड केली आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे प्रमुख शीर्षक आहे 'फ्रीकॉनॉमिक्स' व दुय्यम शीर्षक आहे 'दी रोग इकनॉमिस्ट एक्सप्लोअर्स दी हिडन साईड ऑफ एव्हरीथिंग.' रोग शब्दाचा येथे अभिप्रेत अर्थ आहे खोडकर. मनी व मार्केट यांच्या पलीकडे न जाणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांची खोडी काढण्याचा त्यांचा (लेविट) हेतू दिसतो. अर्थशास्त्रावर ग्रंथ लिहिताना एक रूढ संकेत ठरला आहे. सर्वसाधारणपणे

बेकारी, भावफुगवटा, दारिद्र्य व संपत्तिचे उत्पादन यांचे त्यात विश्लेषण यावयालाच हवे. परंतु अर्थशास्त्राला इतके शुष्क ठरविण्याइतपत ती एक अंतिम वस्तू व तयार माल (finished product) असू शकत नाही. अर्थशास्त्राच्या प्रस्तुततेविषयी भाष्य करताना सॅम्युअलसन त्यांच्या ''इकनॉमिक्स'' ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात : ''कारण एकदाच उत्पादित अंतिम वस्तू, चिरंतन टिकणारे संकलित लिखाण यांचे सांकेतिक शहाणपण (जे चुकीचे व फसवे असते) आपल्या अर्थशास्त्रात नसते- परंतु क्रांती, स्वातंत्र्य, कार्यदक्षता (efficiency) आणि आदर्श समाजासाठीची अखंडित जिज्ञासा यांच्याविषयीच्या महान मंथनाची सामग्री आपणाकडे जरूर आहे.''[१] अशा प्रकारे, १९७३ मधील सॅम्युअलसन यांच्या सूचक प्रतिपादनाचे तीन दशकानंतर वास्तवात रूपांतरण करण्याचे श्रेय एकमात्र तरूण अर्थशास्त्रज्ञ लेविट यांच्याकडे जाते. नवप्रवर्तनशील समाजात कारखान्यात एकदा उत्पादित अंतिम वस्तू त्याच स्वरूपात चिरंतन टिकत नाही. प्रस्तुत ग्रंथात हाताळलेले विषय अर्थशास्त्राला कुपथ्य असण्याचे कारण नाही. मात्र एकच अट आहे. स्वत: लेविट म्हणतात त्याप्रमाणे संबंधित विषयांचे विश्लेषण वस्तूनिष्ठ आधारसामग्रीवर (data) आधारित हवे.

ग्रंथ परीक्षणाकडे वळण्यापूर्वी आणखी एक खुलासा. या खळबळजनक ग्रंथाचे प्रमुख लेखक स्टीव्हन डी. लेविट यांना २००३ मध्ये अमेरिकन इकनॉमिक असोसिएशनचे जॉन बेट्स क्लार्क पदक प्रदान करण्यात आले. दर दोन वर्षांनी सर्वोत्तम अमेरिकी तरूण अर्थशास्त्रज्ञांना (४० वर्षांखालील) हे पदक प्रदान केले आहे. 'कनिष्ठ नोबेल' अशी या पदकाची ओळख आहे. ग्रंथाची पहिली आवृत्ती अमेरिकेत प्रसिध्द झाली. सुधारित व वाढविलेली आवृत्ती २००६ मध्ये प्रसिध्द झाली. या आवृत्तीचे लेखकद्वय आहेत स्टीव्हन डी. लेविट व स्टीफन जे डबनर.

ग्रंथ दोन भागात विभागण्यात आला आहे. पहिल्या भागात सहा प्रकरणे आहेत. दुसऱ्यात एप्रिल ०५ ते ऑगस्ट ०६ मध्ये न्यूयॉर्क टाईम्स मॅगेझीनमध्ये प्रसिध्द झालेल्या लेखांचा समावेश आहे. अर्थातच, दुसऱ्या भागाचे स्वरूप पहिल्यापेक्षा निराळे आहे. काही लेखांत पहिल्या भागातील विषयांची पुनरूक्ती झाली आहे. म्हणून परीक्षणात दुसऱ्या भागाचा समावेश केला नाही.

**दृष्टिकोन :**

ग्रंथाची सुरूवात सहलेखक डबनर यांच्या 'स्पष्टीकरणात्मक टिपणाने' झाली आहे. त्यात डबनर म्हणतात की लेविट अर्थशास्त्राकडे एक 'विद्यानिष्ठ (academic) जग म्हणून पहात नाहीत. अर्थशास्त्राकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन शुध्द 'न्यायनिवाडा करणाऱ्या अन्वेषकाचा' (forensic investigator) आहे. (पृ.X) थोडक्यात, ॲडॅम स्मिथ यांच्याप्रमाणे 'जग ही एक कर्मशाळा आहे' (The world is workrshop) या दृष्टिकोनातून ते पहात नाहीत.

अर्थशास्त्राची प्राथमिक व्याख्या करताना लेविट म्हणतात विविध''प्रश्नांची उत्तरे प्राप्त करण्यासाठीची उत्कृष्ट साधने(tools)असणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय.''(पृ. X) या संदर्भात लेविट यांची एकच खंत आहे. ती म्हणजे अशा प्रश्नांची टंचाई. प्रश्नच निर्माण होत नाहीत, तर त्यांची सोडवणूक कोण करणार? त्यांच्यापासून सुटका कशी होणार?अर्थशास्त्र हे प्रश्न सोडविणारे शास्त्र आहे, हा एक गोड गैरसमज आहे. ते प्रश्न सोडविणाऱ्या साधनांचा पुरवठादार असणे यातच अर्थशास्त्राची लक्षणीयता दडलेली आहे. प्रश्न सोडविणारे शास्त्र व प्रश्नांची सोडवणूक करणाऱ्या

साधनांचा पुरवठादार यातील सूक्ष्म फरकाची उपेक्षा झाल्यामुळेच 'खिन्न शास्त्र' (dismal science) असा शिक्का अर्थशास्त्रावर मारण्यात आला. दुसऱ्या शब्दात, जग हा शेक्सपीअर यांचा रंगमंचही नाही व स्मिथ यांची कर्मशाळाही नाही. ती आहे प्रश्नांची सोडवणूक करणाऱ्या साधनांची लेविट यांची प्रयोगशाळा.

आतापर्यंतच्या चर्चेत लेविट यांचा अर्थशास्त्रविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट झाला. त्या अनुषंगाने त्यांनी सहा प्रकरणात विचारलेल्या व आतापर्यंत अर्थशास्त्राला कुपथ्य ठरलेल्या प्रश्नांचा मागोवा घेणे सोपे झाले आहे. तेव्हा आता प्रकरण १ कडे वळू.

'वॉट डू स्कूल टीचर्स अँड सुमो रेस्लर्स हॅव इन कॉमन?' हे या प्रकरणाचे प्रश्नार्थक शीर्षक आहे. मागे आपण उल्लेख केल्याप्रमाणे प्रश्नांची टंचाई ही लेविट यांची खंत आहे. म्हणूनच शिक्षक व जपानमधील सुमो खेळाडू यांच्यातील ठकविण्याच्या (cheating) सामाजिक व भिन्न वैशिष्ट्यांचा तपास करण्यासाठी त्यांनी हेतूत: हा प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी लेविट यांच्या अर्थशास्त्राच्या प्रगत व विस्तारित व्याख्यांचा उल्लेख करू. लेविट म्हणतात : ''मूलत: अर्थशास्त्र हे प्रोत्साहनांचा (incentives) अभ्यास आहे. लोकांना हवी असलेली किंवा गरज असलेली वस्तू लोक कशी मिळवितात, विशेषत: दुसऱ्या लोकांना तीच वस्तू किंवा तिची गरज असते तेव्हा'' (पृ.१६) या व्याख्येला पुरवणी जोडताना लेविट म्हणतात : ''प्राथमिक दृष्टिकोनातून अर्थशास्त्र जर प्रोत्साहनांशी संबंधित शास्त्र आहे, तर – सुदैवाने – त्या प्रोत्साहनांना लोक कसा प्रतिसाद देतात त्याचे मापन करणाऱ्या सांख्यिकी साधनांशी देखील संबंधित ते शास्त्र आहे.'' (पृ. २४). मात्र त्यासाठी गरज आहे आधारसामग्रीची. अशाप्रकारे, समाजातील बऱ्या-वाईट घटनांचे/प्रश्नांचे परिमाणीकरण (quantification) करण्यावर लेविट विशेष जोर देतात. पाठीमागे उल्लेखित लेविट यांचा दृष्टिकोन(त्यांची अर्थशास्त्राची प्राथमिक व्याख्या) व वरील प्रगत किंवा विस्तारित व्याख्या यांच्या मर्यादेत या प्रकरणाचा विचार करू.

प्रकरणाचा प्रमुख विषय आहे 'ठकविणे'. कोण कोणाला ठकवितो? व का? त्यामागील प्रेरणा कोणती? ठकविण्याविरूध्द परावर्तके (disincentives) कोणती? ती किती प्रमाणात यशस्वी होतात?

'ठकविणे ही मनुष्याची सुरूवातीपासूनची क्रिया आहे : कमी कष्टात जास्त लाभ मिळवणे' (पृ.२०) तो त्याचा स्वभाव नाही. परंतु तो त्याच्या प्रयासाचा (endeavour) एक भाग आहे. लेविट यांना कौटिल्य यांच्या अर्थशास्त्र ग्रंथाविषयी माहिती आहे किंवा नाही याविषयीची आम्हाला माहिती नाही. परंतु दोघांच्या ग्रंथातील बऱ्याच अंशी सामायिक घटकाचा येथे संदर्भ देण्याचा मोह अनावर होतो. 'मनुष्याणां वृत्तिरर्थ ।' अर्थ म्हणजे इच्छा करणे, अनुकूल अर्थ. म्हणजेच मनुष्याला जगण्यासाठी अनुकूल वस्तू. ही मनुष्याची वृत्ती आहे, स्वभाव नव्हे. मुळात मनुष्य वाईट नसतो. त्याला वाईट बनावे लागते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे कमी कष्टात जास्त लाभ या ठकविण्याच्या वृत्तिमुळे शिक्षक व सुमो खेळाडू या चांगल्या व्यक्तींना वाईट गोष्ट करण्याची प्रोत्साहने मिळतात. शिक्षकांच्या बाबतीत लेविट व डबनर यांनी नोंदवलेल्या पुढील काही प्रोत्साहनांचा उल्लेख करू. नेमणूक, बढती, जादा पगारवाढ, अनुदाने, उत्तरपत्रिका तपासणी, उत्तरपत्रिका बदलणे, गुण वाढविणे, प्रश्नपत्रिका फोडणे, परीक्षार्थींना उत्तरे लिहिण्यासाठी जादा वेळ देणे, चाचणीवर जोर देऊन अध्यापन करणे (teach

to the test), इत्यादी. नक्त परिणाम? विद्यार्थ्यांच्या युक्तिवाद करण्याच्या व विषयावर मंथन करण्याच्या क्षमता (abilities to argue and reason) सुधारण्याऐवजी शाळेचा अंकीय निकाल फुगविणे.

सुमो स्पर्धा म्हणजे जपानची प्रतिष्ठा. त्या स्पर्धेतील काही (सर्व नव्हे) खेळाडू देखील ठकविण्याच्या प्रेरणेने मोहित होतात. उत्तेजक द्रव्यांचे सेवन, पंचांशी संधान, दोन प्रतिस्पर्धी खेळाडूंचे परस्पर साटे-लोटे (quid pro quo), संगनमत (collusion) व विशेष म्हणजे ही सर्व अवैध कृत्ये दडपली जाणे. नक्त परिणाम? अशा घोटाळ्यांना वरून उत्तेजन/प्रोत्साहन मिळाल्यामुळे आधारसामग्री/पुरावा दडपल्यामुळे ते घोटाळे राजरोसपणे चालू रहातात. परंतु स्वत: उदाहरणाने स्पष्ट करणाऱ्या लेविट व डबनर यांचा असा दावा आहे की आजपर्यंत जगात असा एकही प्रश्न निर्माण झाला नाही की जो संकल्पन (design) व प्रोत्साहन/परावर्तक योजनेच्या माध्यमातून सोडविता येत नाही, (पृ.१६) मात्र एकच अट आहे. ती म्हणजे समस्यापूर्ती करणारी संकल्पने, आधारसामग्री, मूलभूत पायऱ्या, प्रक्रिया, नियमावली (algorithm), इत्यादींची बांधणी व कार्यवाही करण्यासाठी संबंधितांना जास्त स्वातंत्र्याची गरज आहे. ज्यावेळी व ज्या ठकविण्याच्या प्रकारात त्या स्वातंत्र्याचा अभाव असतो त्यावेळी ठकविण्याचा अपराध संरक्षित रहातो.

या प्रकरणाच्या प्रश्नार्थक शीर्षकास लेखकद्वयांनी दिलेल्या उत्तराचा सारांश पुढे दिला आहे.

शिक्षकांच्या ठकविण्याची आधारसामग्री उपलब्ध होऊ शकते. त्याचा तपासही करता येतो. फैसला होतो. परंतु सुमो स्पर्धासंबंधीचे ठकविणे दडपले जाते. कारण त्यात सत्ताधीश व मोठी रक्कम गुंतलेली असते. म्हणूनच त्या ठकविण्यास 'व्हाईट कॉलर चीटिंग' असे संबोधले जाते. त्या संबंधात लेखक 'एन्रॉन' चा उल्लेख करतात. आपण 'बोफोर्स' व 'शवपेट्या' यांचा उल्लेख करू.

अखेरीस लेखकांनी विचारलेल्या एका महत्त्वाच्या प्रश्नाविषयी दोन शब्द. प्रश्न हा आहे : सुमो खेळाडू व शिक्षक ठकवितात म्हणून अवघी मानवता सार्वत्रिकपणे भ्रष्ट आहे, असे आपण गृहीत धरावे काय? (पृ.४१). पुढे लगेच लेखक म्हणतात की या प्रश्नाचे उत्तर पॉल फेल्डमन यांच्या ब्रेडरोल्स (bagels) या व्यवसायात दडले आहे. आणि फेल्डमन यांचा हा व्यवसाय एन्रॉनपेक्षा एका बाबतीत निराळा आहे. तो कसा? एन्रॉनच्या सत्ताधीशांनी कोणाची चोरी केली, हा प्रश्न निरूत्तरित राहतो. कारण? एन्रॉनचा आरोपी शोधून सापडत नाही. मात्र ब्रेडरोल्स व्यवसायाशी संबंधित आरोपी सहजपणे सापडतो. तो दुसरा कोण नसून दस्तुरखुद्द फेल्डमनच आहेत. ते कसे? त्याविषयीची संक्षेपात हकीगत (गोष्ट नव्हे) अशी : फेल्डमन एक स्वप्नाळू व आदर्शनिष्ठ गृहस्थ आहेत. जगाला भूक मुक्त करणे, हा त्यांचा ध्यास आहे. निव्वळ नफ्यासाठी व्यवसाय त्यांना मान्य नाही. परिव्ययाच्या ९०-९५ टक्के विक्रीला ते चालवून घेतात. दररोज सकाळी ते ब्रेडरोल्सच्या पेट्या ठराविक उपहारगृहात पोहोच करतात. त्या पेट्यांना जोडूनच विक्रीची रक्कम परस्पर जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सायंकाळी पेट्या व विक्रीसाठीच्या पिशव्या गोळा करण्यासाठी ते स्वत: उपहारगृहांना भेटतात. ब्रेडरोल्सची विक्री व विक्रीची रक्कम यांचा मेळ लागत नाही. त्याविषयी अर्थशास्त्रज्ञ मित्राशी ते चर्चा करतात. आता विक्रीची रक्कम गोळा करण्यासाठी एक सुधारणा केली जाते. दुसऱ्या दिवसापासून ब्रेडरोल्सच्या पेट्यांना जोडलेल्या

कुलूपबंद लाकडी पेट्यांची व्यवस्था केली जाते. पैसे टाकण्यासाठी प्रत्येक पेटीला छिद्र पाडले जाते. ग्राहकाने पेटीत पैसे टाकावयाचे व ब्रेडरोल्सचे सेवन करावयाचे. आता फेल्डमन यांना विचित्र अनुभव आला. पूर्वी ब्रेडरोल्सच्या बाबतीत काही ग्राहक ठकवत होते. आता पैशाची एखादी-दुसरी पेटीच गायब होऊ लागली. ठकविण्याच्या दरात २-३ टक्के वध-घट चालूच राहिली. परत फेल्डमन यांनी त्यांच्या अर्थशास्त्रज्ञ मित्राबरोबर चर्चा केली. अर्थशास्त्रज्ञ मित्राने असा सल्ला दिला की अर्थशास्त्र व नीतिशास्त्र यांच्यात फरक असतो. ब्रेडरोल्स किंवा विक्रीशी संबंधित उपलब्ध आधारसामग्रीचा आदर करावयाचा नसेल, तर फेल्डमन यांनी त्यांचा व्यवसाय बंद करावा. अर्थातच, फेल्डमन यांना तो सल्ला आवडला नाही. परंतु त्यांना तो सल्ला का आवडला नाही? या प्रश्नाचे लेखकांनी पुढील उत्तर दिले : फेल्डमन ग्राहकांच्या ठकविण्याच्या उपलब्ध आधार सामग्रीपेक्षा त्या ग्राहकांच्या प्रामाणिकपणाविषयीच्या (ठकविण्याचा व्यत्यास) स्वत:च्या वैयक्तिक (भलत्याच) निष्कर्षावर जास्त विसंबून राहिले. (पृ.४५)स्पष्ट शब्दात सांगावयाचे तर त्यांच्यातील ॲडॅम स्मिथ यांचा 'बेकर' जागा झाला. परंतु फेल्डमन यांनी बेकरच्या स्वहितापेक्षा स्वत:चा वैयक्तिक लोकहितवाद पसंत केला. फेल्डमन यांची हकीगत येथे संपली. परंतु स्वहित व लोकहित यांच्याविषयीचा स्मिथ यांच्यापासून लेविट यांच्यापर्यंत अधून-मधून उसळी मारणारा वाद संपला नाही. काय आहे तो वाद?

## कार्पेट अधिक...... काय?

ज्यावेळी वाद सपंत नाही त्यावेळी तडजोडीचा एक पर्याय उरतो. 'दी कॉर्पोरेशन' बोधपटातील रे अंडरसन या पात्राच्या मुलाखतीची येथे आठवण झाल्याशिवाय रहात नाही. 'इंटरफेस' ही एक विख्यात कंपनी आहे. ती कार्पेटचे उत्पादन करते. उत्पादन म्हटले की प्रदूषण येते. ती कंपनी चांगल्या माणसांना वाईट काम करण्यास भाग पाडते, असे मानणारा एक पक्ष आहे, परंतु हा अर्धसत्य आरोप कंपनीचे बॉस अंडरसन अमान्य करतात. त्यावेळच्या अंडरसन यांच्या मुलाखतीतील बचावाचा सार पुढे दिला आहे : होय, माझी कंपनी प्रदूषणात भर घालते. परंतु कपडे उतरून लगेच मी प्रदूषण नियंत्रणाच्या लोकधर्माचे कपडेही परिधान करून प्रदूषण नियंत्रणाचा सक्रीय कार्यकर्ता म्हणून कार्य करतो. त्याकडे दुर्लक्ष होवू नये. सार संपला. त्या पात्राच्या बचावातून पुढील संदेश मिळतो.

तुम्हाला प्रदूषण नष्ट करावयाचे असेल, तर कंपनी बंद करता येणार नाही. तुम्हाला कार्पेटही नको व कंपनीही नको, हा आततायीपणा आहे. तुम्हाला कार्पेट नको असेल तर दुसऱ्या १००० लोकांना (तुमच्यापेक्षा एक हजार पटीने जास्त) ते हवे. तुमची निवड कार्पेट कंपनी विषयी असू शकत नाही. तुमची निवड कार्पेट कंपनी अधिक... काय? पुरती मर्यादित आहे. कार्पेट कंपनी अधिक अंडरसन? किंवा कार्पेट कंपनी अधिक प्रदूषण? या निवडीच्या संबंधातील 'कैद्यांच्या उभयापत्तिच्या' (Prisoners' dilemma) परिस्थितीत कार्पेट कंपनी अधिक अंडरसन, हा कमीत कमी हानिकारक पर्याय उरतो. तुमच्या निवडीच्या स्वातंत्र्यावरील तुम्हाला ही मर्यादा वाटेल. परंतु दुसऱ्या १००० लोकांचा विचार करूनच तुम्हाला पुढे जावयाचे आहे. निरपवाद (absolute) स्वातंत्र्य ही चीज अस्तित्वात नाही.

ताठरपणाला मुरड घालून स्वहित व लोकहित यांच्या सबंधात कमीत कमी हानिकारक तोडगा फेल्डमन यांनाही शक्य आहे.

आता आपण प्रकरण ३ कडे वळू. 'माहितीशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट शक्तीशाली

नाही, ही या प्रकरणाची परिकल्पना (hypothesis) आहे. त्याचबरोबर माहितीच्या दुरूपयोगाइतकी विध्वंसक दुसरी गोष्ट नाही, हा या प्रकरणाचा संदेश आहे. अमेरिकेतील गुलामगिरी ही माहितीच्या अभावाची निशाणी आहे, हे लेखकांनी सोदाहरण स्पष्ट केले आहे .आज माहिती हे इंटरनेटचे चलन (पृ. ६१) मानले जाते. आणि ते डॉलर किंवा रूपयापेक्षा जास्त आश्वासक वाटते. माहिती असलेल्या व्यक्तीकडून ती हवी असलेल्या व्यक्तीकडे तिचे संक्रमण करणारे माध्यम म्हणजे इंटरनेट. इंटरनेटचे हे सरळ व समर्पक वर्णन आहे. एका दिवसाने जुनी असलेल्या व विक्री करावयाच्या नव्या कोऱ्या गाडीविषयी (lemon) मालकाकडे जेवढी माहिती असते तेवढी ती संभवनीय ग्राहकाकडे नसते .माहिती विषयीच्या अर्थशास्त्राच्या परिभाषेत 'माहिती असममिती' (information asymmetry) या नावाने ही संज्ञा परिचित आहे. एका दिवसाने जुनी असलेली नवी कोरी (?) गाडी १/४ किंमतीला विकली जाते, तर तिच्या बरोबरची एक वर्षाची जुनी गाडी ३/४ किंमत मिळवून देते. कारण? एका दिवसात उपलब्ध माहिती व वर्षात उपलब्ध माहिती यांच्याविषयीच्या विश्वसनीयतेतील फरक.

लेखकांनी दुसरे उदाहरण म्हणून अमेरिकेतील विमा किंमतीचा(हप्ता) उल्लेख केला आहे. भारतातील विमा किंमतीच्या बाबतीत देखील तोच अनुभव आहे. इंटरनेटपूर्व विमा कंपन्यांची संख्या मर्यादित होती. इंटरनेटनंतर डझनभर नव्या कंपन्या निर्माण झाल्या, स्पर्धा वाढली, हप्ता रक्कमेत घट झाली.

**माहिती व वृध्दी :**

इंटरनेटचा प्रभाव केवळ वस्तू व सेवांच्या किंमतीपुरता मर्यादित नसतो. त्यांच्या पलीकडील व जास्त महत्त्वाच्या वृध्दीवरही इंटरनेटचा दूरगामी परिणाम घडतो. प्रस्तुत प्रकरणात किंमतीप्रमाणेच वृध्दीवरील चर्चा अपेक्षित होती. येथे ही नोंद करून ''हॉऊ डू मोबाईल फोन्स प्रमोट ग्रोथ?''[३] या भारतीय संदर्भातील एका ताज्या अभ्यासाचा सारांश दिल्याशिवाय चर्चा पूर्ण होऊ शकत नाही.

दक्षिण भारतातील केरळच्या उत्तर समुद्र किनाऱ्यावरील विविध मच्छीमंडयांत मासे विकणाऱ्या कोळी बांधवांना १९९७ पर्यंत भ्रमणध्वनीची माहिती नव्हती. तोपर्यंत इंधनचलित नावांच्या सहाय्याने ते मासे पकडत. सर्वच मच्छीमार अनपेक्षितपणे विपुल मासे पकडत. सर्वांचाच हा सर्वसाधारण अनुभव होता. समुद्रकिनाऱ्यावरील एका मच्छीमंडईत मागणीपेक्षा पुरवठा जास्त होत होता. माशांच्या किंमती पडत. जी गोष्ट एका मंडईची तीच कमी-जास्त प्रमाणात सर्वच मंड्यांची. परंतु माशांची विक्री होईपर्यंतच्या सकाळी ६ ते ८ या दोन तासांच्या मर्यादेत एका मंडईतील कोळ्यांना दुसऱ्या मंडईतील मासे-मागणी-पुरवठा-किंमती यांच्याविषयी माहिती मिळू शकत नसे. अशा परिस्थितीत किनाऱ्यावरील एक मंडईतील मासे पकडणाऱ्यांच्या पुढे एका जवळच्या मंडईत जाऊन तेथे आपल्याकडील शिल्लक/वाढीव मासे विकण्याचा एक पर्याय उपलब्ध होता. परंतु किनाऱ्याच्या खालच्या बाजूकडील मच्छीमारांनी मासे पकडले नसतील कशावरून? तसेच इंधनचलित नावेतून इतके अंतर कापणे खर्चिक होते. शिवाय, सूर्योदयाच्या आसपास दोन तास मंडई चालू असते. त्यानंतर तेथे गेल्यास ग्राहक मिळण्याची खात्री नाही. माहितीच्या अशा अनिश्चित परिस्थितीत शिल्लक मासे परत समुद्रात फेकून देण्याशिवाय मच्छीमारांना गत्यंतर नव्हते. परंतु १९९७ पासून तेथील मच्छीमार भ्रमणध्वनीचा वापर करू लागले. अनिश्चितता संपली. आता भ्रमणध्वनींमुळे मच्छीमारांना दुसऱ्या

मंडईतील (किनाऱ्यावरील २५-३० कि.मी. अंतरावरील) आवश्यक माहिती क्षणार्धात मिळू लागली. दोन मंडईतील अंतर संपले. विक्री न झालेले मासे परत समुद्रात फेकून देण्याचे संकट टळले. माशांच्या किंमतीतील दोलायमानता संपुष्टात आली. 'एक बाजार-एक किंमत' नियम लागू झाला. माहितीपूर्ण, कार्यदक्ष बाजाराचा ग्राहक व विक्रेते यांना फायदा मिळाला. सरासरी किंमत ४ टक्क्यांनी घटली. मच्छीमारांना सरासरी नफा ८ टक्क्यांनी वाढला. हे सर्व माहिती क्रांतीमुळे घडले.

माहिती हे इंटरनेटचे शक्तीशाली व आश्वासक चलन असले, तरी त्याचा दुरूपयोगही तेवढाच विध्वंसक असतो. 'एन्रॉन' हे त्याचे एक नमूनेदार उदाहरण आहे. प्रकरण १ मधील चर्चेच्या संदर्भात आपण त्याचा उल्लेख केला. येथे त्याची पुनरूक्ती करण्याचे कारण नाही.

**प्रश्नचिन्ह :**

प्रकरण ३ 'सांकेतिक किंवा संकेतमान्य शहाणपणावर (conventional wisdom) जोर देते. लेविट यांच्यापूर्वी या संज्ञेला स्पर्श करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांमध्ये सॅम्युअलसन, गालब्रेथ व वेब्लन यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. अलीकडील काळात जोसेफ स्टिगलिट्झ व कृगमन चुकीच्या व मतलबी प्रशासनिक आर्थिक धोरणाविरूध्द वारंवार आवाज उठवत असतात. परंतु मनी, मार्केट, दारिद्र्य व जी.डी.पी. यांच्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या संकेतमान्य अर्थशास्त्रापुढे प्रश्नचिन्ह उभे करण्याचे श्रेय लेविट यांच्याकडे जाते. आर्थिक प्रश्न व अर्थशास्त्रापुढील प्रश्नचिन्ह यांच्यात फरक आहे. आपण परीक्षणाच्या सुरूवातीला सांकेतिक शहाणपणाचे उदाहरण म्हणून सॅम्युअलन यांच्या 'एकदाच उत्पादित अंतिम वस्तूसारखे' अर्थशास्त्राला समजणे कसे चूक आहे, ते स्पष्ट केले. गालब्रेथ यांच्या शब्दांत (ज्यांचा लेविट यांनी उल्लेख केला आहे) सांकेतिक शहाणपण सत्याचा सोयीशी संबंध जोडते. अमेरिका असो अगर भारत, जी.डी.पी. तील वाढीचा विकास किंवा जीवनमानातील सुधारणेशी सरसकट संबंध जोडणे हा संकेतमान्य शहाणपणाचाच एक भाग आहे.

सांकेतिक शहाणपणाचा पोकळपणा स्पष्ट करताना लेविट व डबनर म्हणतात : ''लोकांना खरोखरच ज्या गोष्टीची काळजी वाटते तिच्यापुढे तुम्ही जर प्रश्नचिन्ह उभे केले आणि लोकांना आश्चर्याचा धक्का देणारे उत्तर तुम्हाला मिळाले- म्हणजे तुम्ही जर सांकेतिक शहाणपणाचा बुरखा फाडला, तर तुमच्यासारखे भाग्यवान तुम्हीच.''(पृ.७९)

प्रकरण ४ चे शीर्षक आहे ''व्हेअर हॅव ऑल दी क्रिमिनल्स गॉन?'' गर्भपात व गुन्हा यांचा परस्पर संबंध काय? - सहसंबंध? किंवा कार्यकारण? १९९० पर्यंतच्या १५ वर्षात अमेरिकेत गुन्ह्यांचे प्रमाण वाढत जावून अखेरीस ते सर्वाधिक ८० टक्के का झाले? त्यानंतर त्यात घसरण का झाली? त्याचे अमेरिकी जीवनावर कोणते परिणाम झाले? विधिगत (legalised) गर्भपातामुळे जन्म टळलेल्या मुलाची एरवी दारिद्र्यात जगण्याची सरासरी ५० टक्के तयारी असते, या अनुमानाचा आधार कोणता? विधिगत गर्भपातातील घटीला लेविट व डबनर यांच्यासारखे अर्थशास्त्रज्ञ खाजगी 'निर्हेतुक लाभ' (unintended benefit) समजतात. मान्य. परंतु त्या घटीमुळे खाजगी दुःखाचे सामाजिक कल्याणात रूपांतरण होते याची बैजिक तर्कसंगति कशी लावता येईल? सामाजिक कल्याणासाठी 'दुसरे मार्क्स' व 'दुसरे गांधी' ही किंमत पर्याप्त म्हणून स्वीकारावयाची काय?

लेखकांनी या प्रकरणात भडीमार केलेल्या डझनभर प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी तीन-चार

डझन अभ्यासांचे संदर्भ दिले आहेत. कष्ट, ध्यास व व्यासंग यांच्याशिवाय हे शक्य होणे नाही. परंतु त्याचबरोबर लेखकांच्या काही मूळ प्रश्नांतून (वर सुरूवातीला उल्लेखित) काही उपप्रश्न (वर अखेरीस उल्लेखीत) निर्माण होतात. निव्वळ युक्तिवाद म्हणून त्यांची नोंद करण्याचे साहस करून (प्रश्नकर्त्यांना प्रश्न विचारण्याचे प्रोत्साहन खुद्द लेखकांनीच देवून ठेवले आहे.) आता पुढील प्रकरणांचा (प्रकरण ५ व प्रकरण ६) विचार करू.

प्रकरण ५ ''वॉट मेक्स अ परफेक्ट पेरेंट?'' या प्रश्नाचा तपास करते. मुलांचे शिक्षण व भवितव्य यांच्या दृष्टिकोनातून आई-वडील किती महत्त्वाचा कार्यभाग (role) पार पाडतात? आणि ६ वे प्रकरण (परीक्षणाच्या दृष्टिने अखेरचे) आई-वडीलांच्या आपल्या मुलांकडून अपेक्षांची चर्चा करते.

एका बाजूला मूल कुटुंबाच्या आनंदाचे प्रतीक आहे. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला महागडे शिक्षण व अटळ स्पर्धा ध्यानात घेवून आज त्याच्या सुरक्षित भवितव्यासाठी कोणत्या अभ्यासक्रमासाठी किती गुंतवणूक करावयाची, हे आई-वडिलांच्या चिंतेचे एक कारणही आहे. एक सुरूवात म्हणून मुलासाठी पुस्तके खरेदी करणे व त्याच्या वाचन चाचणीतील (reading test) गुण यांच्यातील संबंध काय? या प्रश्नाचे लेखकांनी पुढील उत्तरे दिले.पालकांनी स्वत: पुस्तके खरेदी केल्यामुळे मुलांच्या वाचन चाचणीत त्यांना जास्त गुण मिळाले असे ठामपणे म्हणता येत नाही. परंतु पुस्तकांची खरेदी व वाचन चाचणी यांच्यात निश्चितपणे सहसंबंध (correlation) आहे. (पृ.१६०) म्हणजे जास्त गुणांसाठी पुस्तके हा एकच घटक कारणीभूत नसतो. त्यांच्यासह दुसरे घटकही कार्य करतात. माझ्या मित्राला काल सर्पदंश झाला आणि ताबडतोब तो मरण पावला. हे आहे कार्यकरण नातेसंबंधाचे (causal relation) उदाहरण. मग वरील दोन चलांच्या बाबतीत कार्य करणारे दुसरे घटक कोणते? त्या संदर्भात लेखकांनी एका ब्रिटिश व दोन अमेरिकी अशा तीन अभ्यासांचा दाखला दिला आहे.

अभ्यासात दत्तक आई-वडिल, त्यांची दत्तक मुले व त्यांचे रक्ताचे आई-वडिल यांचा समावेश होता. दत्तक आई-वडिल त्यांच्या दत्तक मुलांच्या रक्ताच्या आई-वडिलांपेक्षा जास्त तीक्ष्ण (smarter), जास्त शिकलेले व जास्त श्रीमंत होते. परंतु दत्तक आई-वडिलांचा त्यांच्या दत्तक मुलांच्या शाळेतील गुणांकनावर अल्प परिणाम दिसला. दत्तक मुलांचे मूल्यांकन सुमार होते. म्हणजे दत्तक आई-वडिलांचा त्यांच्या दत्तक मुलांवर जो काही प्रभाव पडला त्यावर जीवशास्त्राने/प्रजननशास्त्राने मात केली. (पृ. १६२). दुसऱ्या शब्दात, जैविक किंवा जनुकीय घटकाचा तौलानिक सहप्रभाव (सह शब्द अधोरेखित) जास्त होता.

अनुभवाधिष्ठित अर्थशास्त्रात सहसंबंधाच्या आधारे अचूक निष्कर्ष काढणे लेविटसारख्या अनुभवनिष्ठ अर्थशास्त्रज्ञांच्या पुढील एक मोठे आव्हान आहे.

अखेरच्या प्रकरण ६ मध्ये आई-वडिलांच्या मुलांकडूनच्या अपेक्षांवर जोर देण्यात आला आहे. आणि ते स्वाभाविक आहे. त्या अपेक्षांचा आविष्कार मुलांच्या नामकरणात होतो.याचा अर्थ असा नव्हे की 'विजय' नावाचा मुलगा जीवनात कधीच पराभव पत्करत नाही. आई-वडिलांनाही त्याची जाण असतेच. लेखकांची किमान अपेक्षा इतकीच की जास्वंदीला गुलाब या नावाने संबोधले म्हणून जास्वंदी थोडीच गुलाब होणार आहे? याचा विसर न व्हावा. लेखकांच्या शब्दात, "Would a Roshanda by Any Other Name Smell as Sweet?"

## समारोप :

एरवी अर्थशास्त्राला कुपथ्य असणारे नव-नवीन विषय हाताळून लेविट व डबनर यांनी अर्थशास्त्राच्या सीमा विस्तारण्यास निश्चितच हातभार लावला. त्यांनी एकदाच उत्पादित अंतिम वस्तूच्या स्वरूपातील अर्थशास्त्रातील संकेतमान्य शहाणपणाचा पोकळपणा समर्थपणे सिध्द केला. आणि अर्थशास्त्राला साचेबंद चौकटीच्या बाहेर आणले. अर्थशास्त्र हे प्रश्न सोडविणारे शास्त्र नसून प्रश्नांची सोडवणूक करणाऱ्या साधनांचा (tools) पुरवठा करणे यातील अर्थशास्त्राची लक्षणीयता त्यांनी सोदाहरण स्पष्ट केली. पूर्वी पिगु यांनी अर्थशास्त्राच्या स्वरूपाच्या संदर्भात 'साधन पेटी' (tool box) हा शब्दप्रयोग केला होता. परंतु पिगुच्या अर्थशास्त्राची एक साचेबंद चौकट ठरली होती. आणि हे विधान करण्याचे आपण आज साहस करतो त्याचे पूर्ण श्रेय 'फ्रीकॉनॉमिक्स'कडे जाते.

त्यांनी अर्थशास्त्राच्या सीमा विस्तारल्या यात अमान्य करण्यासारखे काही नाही. कारण 'फ्रीकॉनॉमिक्स' हा त्यांचा आरसा आहे. परंतु त्या सीमा आकस्मिकपणे वाढल्यामुळे त्या 'तेजोमेघसदृश'[४] (nebulous) व अंधुक झाल्या अशी टीका केली जाते. आणि ती मान्य करावयाला हवी. वस्तुस्थिती ही आहे की हा सीमाविस्तार आकस्मिक आहे. अवकाळी पडलेल्या पावसामुळे असावध शेतकऱ्यांची जशी तारांबळ उडते तशी आर्थिक पंडितांची तारांबळ उडाली खरी.

कारागृहातील कैद्यांच्या निवासाच्या काळातील वाढीमुळे गुन्ह्यात घट होते, असा दोन चलांतील सहसंबंध लेखकांनी स्पष्ट केला. या सहसंबंधावर काही अर्थशास्त्रज्ञांनी टीका केली आहे. त्यांचा निष्कर्ष असा आहे की कारागृहांचे कारागृह सुधारशाळांत रूपांतरण करूनही गुन्ह्यांच्या प्रमाणात लक्षणीय घट होते. परंतु त्यामुळे कारागृहातील कैद्यांचा निवास वाढविणारे लेखकांचे चल चूक म्हणता येत नाही. वस्तुस्थिती ही आहे की सहसंबंधावरील अवलंबन हीच अनुभवाधिष्ठित अर्थशास्त्रावरील एक मर्यादा आहे. असो.

ही टीका ध्यानात घेवूनही एक गोष्ट स्वीकारायला हवी. एक उदयोन्मुख तारा म्हणून लेविट यांनी त्यांचे अर्थशास्त्रात स्थान निश्चित केले आहे.

## संदर्भसूची

N.B. : Unless notified otherwise, the numbers into the brackets of the text of the article indicate the page numbers of the book under review

1. Samuelson Paul A., Economics (9th edition), McGraw Hill, 1973, P.VII.
2. 'Clinically insane',The Economic Times, May 21,2004, the material was first published in the Economist in may 2004.
3. Robert Jensen's Paper : 'The Digital Provide', Published in the Economist (Economics focus) under the caption'How do the mobile phones promote Growth?' May 12-18-2007
4. Cox Simon(ed.), Economics: Making S... of the Modern Economy, The Economist Books Ltd., in Association With The Pofile Books Ltd.,2007,P.303.